CMYK



संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांचा आज प्रकट दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक १०४ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# राज्यभरात शिवजन्मोत्सव उत्साहात

## ● शिवनेरी किल्ल्यावर मुख्य शासकीय सोहळा, अभिवादनासाठी शिवप्रेमींची हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १९ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवरायांचा जन्म जिथे झाला त्या शिवनेरी गडावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्रिमंडळातील अनेक सदस्यांच्या उपस्थितीत जन्मोत्सवाचा मुख्य शासकीय सोहळा सुरु झाला आहे.

सर्व मान्यवर व असंख्य शिवभक्त बालशिवाजी आणि जिजामातेच्या प्रतिमेला अभिवादन करण्यासाठी एकत्र आले आहेत. पारंपरिक रीतीने पाळणा हलवण्याचा कार्यक्रम पार पडला. तर सायंकाळी ५ वाजता महाआरती तर ६ वाजता त्यांच्या जीवनावरील विविध पैलूंचे दर्शन घडवणारी भव्य शोभायात्रा निघेल. गडाच्या पायथ्याशी जुन्नरमध्ये छत्रपतींच्या जीवनावरील महानाट्याचा प्रयोग, संगीत रजनी, कुस्ती स्पर्धा, मर्दानी खेळ, फायर शो, बैलगाडा शर्यतीही होत आहे.



### छत्रपती शिवरायांच्या किल्ल्यांवर अतिक्रमण राहणार नाही - फडणवीस

छत्रपती शिवाजी महाराज केवळ योद्धे नव्हते, तर ते उत्तम प्रशासक होते. पर्यावरण, जलसंवर्धन, जंगल संवर्धन यासह वेगवेगळ्या प्रकारचे व्यवस्थापन या सर्व व्यवस्थापन शास्त्राचे गुरू हे छत्रपती शिवराय होते. त्यामुळे आदर्श राजा होते. त्यांना आपण जाणता राजा म्हणतो. आपल्या राजांनी स्वत:साठी काहीच केले नाही. आपले संपूर्ण आयुष्य रयतेच्या कामी लावले. म्हणूनच या श्रीमंतयोगाची राजाची आठवण आपण ठेवतो. छत्रपती शिवरायांचे किल्ले आमच्यासाठी कुठल्याही मंदिरापेक्षा मोठे आहेत. या किल्ल्यांचे संवर्धन झाले पाहिजे, या दृष्टीने सातत्याने आपण काम करत आहोत, त्यातील अडचणी दूर करत आहोत. स्वराज्याची राजधानी रायगडावर अनेक कामे सुरू केलेली आहेत. शिवाजी महाराजांच्या सर्व किल्ल्यावरील अतिक्रमणे काढून टाकण्याचा निर्णय आपण घेतला आहे. काहीही झाले तरी किल्ल्यांवर अतिक्रमण राहणार नाही. त्यासाठी टास्कफोर्स देखील तयार केला आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. आजपासून ५ वर्षांनी छत्रपती शिवरायांचा ४०० वा जन्मोत्सव आपण साजरा करणार आहोत. त्यानिमित्त आपण या शिवनेरीवर आल्यानंतर इथल्या मातीमध्ये आपल्याला स्वराज्याची जी स्फूर्ती मिळते, जे तेज मिळते, ते तेज घेऊन महाराष्ट्राची सेवा करण्याकरता आम्ही सर्व लोक या ठिकाणी येत असतो. ज्या काळात संपूर्ण भारतात अनेक राजे रजवाडे हे मुघलांचे मंडलिकत्व स्वीकारून त्या ठिकाणी नतमस्तक होते, अशा काळात आई जिजाऊंनी छत्रपती शिवरायांना घडवले आणि सांगितले, मराठी मुलखामध्ये ज्याप्रकारे अनाचार, अत्याचार चाललेला आहे. या मुलखाला त्यातून स्वराज्याकडे नेण्याची जबाबदारी शिवबा तुझी आहे. छत्रपती शिवरायांनी हातात तलवार घेतली. १८ पगड जातीच्या लोकांना एकत्र केले. मावळ्यांची फौज तयार केली. देव देश आणि धर्माची लढाई सुरू केली आणि खऱ्या अर्थाने स्वराज्य स्थापन करून पहिल्यांदा भारताचा आत्मअभिमान जागृत करण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### वर्ल्ड हेरीटेजसाठी ११ किल्ल्यांचा युनोस्कोकडे प्रस्ताव - उपमुख्यमंत्री शिंदे

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांवर जेव्हा जेव्हा येतो, तेव्हा नवीन ऊर्जा आणि प्रेरणा मिळते. महाराष्ट्रातील गड-किल्ले हे शिवरायांच्या आणि मावळ्यांच्या पराक्रमाचे साक्षीदार आहे. देशात आणि विदेशातही या गड-किल्ल्यांची लोकप्रियता आहे. हे गड-किल्ले दगड मातीचे असले, तरी त्यांच्यात शिवरायांनी आणि हजारो मावळ्यांनी प्राण फुंकले आहेत. हे गड-किल्ले इंजिनिअरिंग मार्बल आहेत. महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांचा प्रस्ताव जागतिक ऐतिहासिक वारसा स्थळासाठी युनेस्कोकडे गेला आहे. यामध्ये शिवनेरी किल्ला सुद्धा आहे. गड-किल्ल्यांवर येणाऱ्या शिवप्रेमींना, पर्यटकांना सुविधा मिळायला पाहिजेत, यासाठी पर्यटनाला उद्योगाचा दर्जा दिला आहे, असे एकनाथ शिंदे यांनी शिवनेरी किल्ल्यावर शिवजन्मोत्सव सोहळ्यात बोलताना सांगितले. हिंदू धर्मात साडेतीन मुहूर्तांना महत्त्व आहे. परंतू, शिवप्रेमींसाठी या साडेतीन मुहूर्तांपैकी शिवजन्माचा मुहूर्त सर्वात अनमोल आहे. जिथे गवताला भाले फुटतात ती ही शिवनेरीची भूमी आहे. महाराष्ट्र धर्म जिथे जागला ती ही भूमी आहे. रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत या महाराष्ट्राच्या विकासासाठी आम्ही संघर्ष करत असतो. शिवछत्रपतींच्या तलवारीने कोरून काढलेले स्वराज्य आपल्याला मिळाले आहे.

### शिवनेरीच्या संवर्धनासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही - अजित पवार

सामर्थशाली योद्धा कसा असावा, आदर्श शासनकर्ता कसा असावा, प्रजाहित दक्ष आणि युगप्रवर्तक जाणता राजा यांना मनाचा मुजरा करतो. अनेक शिवप्रेमी शेकडो वर्षांपासून शिवनेरी किल्ल्यावर महाराजांना अभिवादन करण्यासाठी येत असतात. महायुती सरकारमध्ये काम करताना शिव-शाहू-फुले-आंबेडकरांची विचारधारा आपल्याला पुढे घेऊन जायची आहे. आपण राज्य सरकारच्या वतीने सातत्याने शिवनेरीच्या परिसरात अनेक चांगली कामे करण्याचा प्रयत्न केला. राज्यातील अनेक किल्ल्यांसाठी सरकारने लक्ष घातलेले आहे. महाराष्ट्रातील गड-किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची खऱ्या अर्थाने दौलत आहेत. हे गड-किल्ले आपले शक्तिस्थान, स्फुर्ती स्थान आहेत. त्यामुळे या गड-किल्ल्यांचा विकास करण्यासाठी महायुतीकडून विशेष प्रयत्न सुरू आहेत. शिव जन्मभूमी शिवनेरीच्या जतन आणि संवर्धनासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू द्यायची नाही, हा शब्द मी अर्थमंत्री या नात्याने देतो, असे पवार म्हणाले.



सोलापूर : शिवजयंतीनिमित्त बुधवारी शहरातून निघालेल्या मिरवणुकीचे ड्रोनच्या सहाय्याने टीपलेले नयनरम्य छायाचित्र. (सौजन्य केवल तिवारी)

---

## महत्त्वाचे

### मुख्य निवडणूक आयुक्तपदी ज्ञानेशकुमार आरूढ

**नवी दिल्ली :** देशाचे २६वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेशकुमार यांनी आज सूत्रे स्वीकारली. हरयाणाचे मुख्य सचिव डॉ. विवेक जोशी यांची ज्ञानेशकुमार यांच्या जागेवर देशाचे निवडणूक आयुक्त म्हणुन नियुक्ती करण्यात आली. राजीवकुमार १८ फेब्रुवारीला निवृत्त झाल्यामुळे त्यांच्या जागेवर १९८८च्या केरळ तुकडीचे आयएएस अधिकारी ज्ञानेशकुमार यांची नवे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. २६ जानेवारी २०२९ पर्यंत त्यांचा कार्यकाळ राहणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेशकुमार यांच्या कार्यकाळात २०२९ ची लोकसभा निवडणूक होणार नसली, तरी राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतिपदासह २१ राज्यांतील विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह तसेच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा समावेश असलेल्या समितीने ज्ञानेशकुमार यांची मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून निवड केली.



### इंडियाज गॉट लेटेंट प्रकरणी ५० सेलिब्रिटींना समन्स

**मुंबई :** इंडियाज गॉट लेटेंटच्या एका भागात यू ट्युबर रणवीर अलाहाबादिया याने केलेल्या वक्तव्यावरून सुरू झालेला गदारोळ अद्याप संपलेला नाही. त्यामुळे नाराजीचे वातावरण आहे. या प्रकरणात पोलिसांनी अलाहाबादिया आणि समय रैना या दोघांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. मागील काही दिवसांपासून अलाहाबादिया गायब आहे. त्याच्या मुंबईतील घराला कुलुप आहे. याच प्रकरणात राज्याच्या सायबर सेलने ५० सेलिब्रेटींना समन्स बजावला आहे. पोलिसांनी समन्स बजावलेल्यांपैकी पाच जणांचा जबाब नोंदविण्यात आला आहे. महाराष्ट्र सायबर सेल सध्या इंडियाज गॉट लेटेंटच्या सर्व भागांची तपासणी करीत आहे. यू ट्युबवरील कार्यक्रमासाठी पैसा नेमका कोणत्या मार्गाने येत होता आणि कसा वापरला जात होता, याचाही पोलिस तपास करीत आहेत.

### युक्रेनसोबत चर्चा करण्यास रशिया तयार

**मॉस्को :** मागील तीन वर्षांपासून सुरू असलेल्या रशिया-युक्रेन युद्धबंदीसाठी सौदी अरबची राजधानी रियाध येथे अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो आणि त्यांचे रशियन समकक्ष सर्गेई लावरोव्ह यांच्यात नुकतीच बैठक पार पडली. त्यानंतर रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी युक्रेनच्या अध्यक्षांसोबत चर्चा करण्यास रशिया तयार असल्याची टिप्पणी केली. पेस्कोव्ह यांनी प्रसार माध्यमांना माहिती देताना सांगितले की, सौदी अरबमध्ये झालेल्या चर्चेमुळे व्लादिमिर पुतिन आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात लवकरच प्रत्यक्ष बैठक होऊ शकते. रशिया युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्याशी चर्चा करण्यास तयार आहे. अमेरिका आणि रशियाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी एकत्र बसून शांतता चर्चेची रूपरेषा तयार केली.

---

# रेखा गुप्ता होणार दिल्लीच्या मुख्यमंत्री

## आज शपथविधी सोहळा

**नवी दिल्ली, १९ फेब्रुवारी-**

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून आज रेखा गुप्ता यांची निवड करण्यात आली. गुरुवारी रामलीला मैदानावर आयोजित ऐतिहासिक अशा समारंभात त्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. रेखा गुप्ता यांच्यासोबत सात सदस्यीय मंत्रिमंडळाचाही शपथविधी होणार आहे. रेखा गुप्ता या शालिमार बाग मतदारसंघातून विजयी झाल्या असून, त्या भाजपा महिला मोर्चाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष आहेत. रेखा गुप्ता या दिल्लीच्या चौथ्या व भाजपाच्या दुसऱ्या महिला मुख्यमंत्री ठरणार आहेत.

दिल्लीचा नवा मुख्यमंत्री निवडण्यासाठी भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक आज सायंकाळी दिल्ली प्रदेश भाजपाच्या पंडित पंत मार्गावरील कार्यालयात झाली. या बैठकीला भाजपाचे ४८ आमदार उपस्थित होते. नेता निवडीच्या या बैठकीला केंद्रीय निरीक्षक म्हणून भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद तसेच केंद्रीय मंत्री ओ. पी. धनकड प्रामुख्याने उपस्थित होते. दिल्ली प्रदेश भाजपाचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा तसेच दिल्लीतील भाजपाचे सातही खासदार या महत्त्वपूर्ण बैठकीला उपस्थित होते. भाजपा विधिमंडळ पक्षाच्या नेत्या म्हणून रेखा गुप्ता यांचे नाव प्रवेश वर्मा यांनी सूचवले, तर आशिष सूद आणि वीजेंद्र गुप्ता यांनी त्याला अनुमोदन दिले.





भाजपा विधिमंडळ पक्षाच्या नेत्या म्हणून रेखा गुप्ता यांच्या नावाची केंद्रीय निरीक्षक रविशंकर प्रसाद यांनी अधिकृत घोषणा केल्यानंतर बैठकीला उपस्थित भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. भाजपाच्या प्रदेश कार्यालयाबाहेर मोठ्या संख्येत उपस्थित भाजपा कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंद साजरा केला. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाने ७० पैकी ४८ जागा जिंकत इतिहास घडवला तसेच आपला २७ वर्षांचा सत्तेचा वनवास दूर केला. रामलीला मैदानावर गुरुवारी दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्याचा शपथविधी होणार आहे. नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना मुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांना शपथ देतील. या ऐतिहासिक प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजाथसिंह, गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री तसेच भाजपा नेते उपस्थित राहणार आहेत.

### दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री

रेखा गुप्ता या दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री ठरल्या आहेत. भाजपा नेत्या सुषमा स्वराज या दिल्लीच्या पहिल्या मुख्यमंत्री होत्या. त्यानंतर काँग्रेसच्या शीला दीक्षित दुसऱ्या आपच्या आतिशी या तिसऱ्या मुख्यमंत्री ठरल्या होत्या. सध्याच्या स्थितीत रेखा गुप्ता या भाजपाच्या एकमेव महिला मुख्यमंत्री असून, देशातील त्या दुसऱ्या महिला मुख्यमंत्री ठरल्या आहेत.

### केजरीवाल, आतिशींना निमंत्रण

भाजपाशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे. भाजपाच्या मित्रपक्षांचे मुख्यमंत्रीही यावेळी उपस्थित राहणार आहेत. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि आतिशी यांनाही या शपथविधी समारंभासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

---



## जी-२० साठी जयशंकर जाणार आफ्रिकेला

**नवी दिल्ली, १९ फेब्रुवारी-**

जी-२० परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होण्यासाठी परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर २० फेब्रुवारीपासून दक्षिण आफ्रिकेच्या दोन दिवसीय दौऱ्यावर जाणार आहेत. या बैठकीत ते काही द्विपक्षीय बैठका घेण्याची शक्यता आहे. दक्षिण अफ्रिका सध्या प्रभावशाली गटाचे अध्यक्ष आहे. जयशंकर २० आणि २१ फेब्रुवारीला दक्षिण आफ्रिका प्रजासत्ताकचे आंतरराष्ट्रीय संबंध आणि सहकार मंत्री रोनाल्ड लामोला यांच्या निमंत्रणावरून या बैठकीत सहभागी होण्यासाठी जोहान्सबर्गला भेट देणार आहेत. या बैठकीतील मंत्र्यांचा सहभाग जी-२० देशांसोबत भारताचा संबंध मजबूत करेल आणि या महत्त्वाच्या मंचावर ग्लोबल साऊथचा आवाज बळकट करेल, अशी अपेक्षा आहे.

---

# भारताला मिळणारा निधी अमेरिकेकडून रद्द

## विदेशी मदतीत कपातीच्या आदेशावर ट्रम्प यांची स्वाक्षरी

**वॉशिंग्टन, १९ फेब्रुवारी-**

भारतातील लोकशाही मजबूत करणे आणि मतदारांची संख्या वाढावी यासाठी अमेरिकेकडून दिली जाणारी २.१ कोटी डॉलर्सची आर्थिक मदत रद्द करण्याच्या आदेशावर बुधवारी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली.

एलन मस्क यांच्या नेतृत्वाखालील सरकारी कार्यक्षमता विभागाला (डीओजीई) त्यांनी तसा आदेश दिला आहे. भारताची आर्थिक वाढ आणि उच्च शुल्क लक्षात घेता अशा आर्थिक मदतीची भारताला आवश्यकता नसल्याचे ट्रम्प यांनी त्यांच्या समाज माध्यम खात्यावर संदेश लिहित स्पष्ट केले. त्यांनी यात म्हटले की, व्यापक बजेट फेरबदलाच्या योजनांचा भाग म्हणून विदेशी मदत निधीत ७.२३ कोटी डॉलर्स कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. मला भारत आणि त्यांच्या पंतप्रधानांबद्दल खूप आदर आहे; परंतु आपण मतदारवाढीसाठी २.१ कोटी डॉलर्स का देत आहोत? भारत आपल्या तुलनेत जगातील सर्वांत जास्त कर आकारणाऱ्या देशांपैकी एक आहे, असे कार्यकारी आदेशांवर स्वाक्षरी केल्यानंतर ट्रम्प म्हणाले. रद्द केलेले सर्व खर्च हे अनावश्यक खर्च कमी करण्याच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग होते असेही ते म्हणाले.

### संजीव संन्याल यांची टीका

पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सदस्य अर्थशास्त्रज्ञ संजीव संन्याल यांनी अमेरिकेच्या या भूमिकेवर टीका केली आहे. ते म्हणाले, भारतात मतदारांची संख्या सुधारण्यासाठी खर्च केलेले २.१ कोटी अमेरिकन डॉलर्स आणि 'बांगलादेशातील राजकीय परिस्थिती मजबूत करण्यासाठी २.९ कोटी डॉलर्स कोणाला मिळाले, हे जाणून घ्यायला आवडेल.

---

# 'महाकुंभाने दिला भारतीय अर्थव्यवस्थेला बूस्टर

## तीन लाख कोटींहून अधिक उलाढाल शक्य

**नवी दिल्ली, १९ फेब्रुवारी**

प्रयागराज येथे १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान आयोजित महाकुंभमध्ये सुमारे ६० कोटी भाविक येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, या ४५ दिवसांत या माध्यमातून तीन लाख कोटी रुपयांहून अधिक उलाढाल होण्याचा अंदाज आहे. अंदाजानुसार, व्यापाराच्या अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक हालचाली झाल्या आहेत.

प्रामुख्याने आदरातिथ्य आणि निवास, अन्न आणि पेये, वाहतूक आणि लॉजिस्टिक, धार्मिक कपडे, पूजा साहित्य आणि हस्तकला तसेच इतर अनेक वस्तू, कापड, कपडे आणि इतर ग्राहकोपयोगी वस्तू, आरोग्य सेवा आणि कल्याण क्षेत्र, धार्मिक देणग्या आणि इतर धार्मिक कार्यक्रम, प्रसारमाध्यमे, जाहिरात आणि मनोरंजन, पायाभूत सुविधा विकास आणि नागरी सेवा, दूरसंचार, मोबाईल, एआय तंत्रज्ञान, सीसीटीव्ही कॅमेरे आणि इतर तांत्रिक गॅझेट्सचा वापरातही मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या.

### इतरही ठिकाणी रोजगार

प्रयागराजव्यतिरिक्त १५० किलोमीटरच्या परिघात वसलेल्या इतर शहरे आणि गावांनाही महाकुंभामुळे मोठ्या प्रमाणात व्यावसायिक लाभ मिळाला आहे, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला प्रचंड चालना मिळाली आहे. यामुळे स्थानिक आर्थिक घडामोडींनाही मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. महाकुंभ ऐतिहासिक सोहळा ठरणार असून, केवळ धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातूनच महत्त्वाचा नसून, राष्ट्रीय आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी देईल. याचा भारताच्या व्यावसायिक आणि सांस्कृतिक परिदृश्यावर सकारात्मक परिणाम होईल.

---

## शरद पवार-संजय राऊत आज एकाच मंचावर

**नवी दिल्ली :** एका पुस्तक प्रकाशनानिमित्त शरद पवार आणि संजय राऊत गुरुवारी एकाच मंचावर येणार आहेत. साहित्य संमेलनाच्यानिमित्ताने एकनाथ शिंदे यांना दिलेल्या पुरस्कारावरून संजय राऊत यांनी शरद पवारांविषयी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर हे दोन्ही नेते प्रथमच एका व्यासपीठावर येत आहेत.

दिल्लीतील पत्रकार नीलेशकुमार कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'संसद भवन ते सेंट्रल व्हिस्टा' या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. या कार्यक्रमाला लोकसभेचे माजी सभापती शिवराज पाटील हेदेखील उपस्थित राहणार आहेत. ■

---

# यापुढे पराभवाची जबाबदारी तुमची

## काँग्रेस अध्यक्ष खडगे यांनी पदाधिकाऱ्यांना बजावले

◆ **नवी दिल्ली, १९ फेब्रुवारी**

आगामी निवडणुकांमध्ये पक्षाचा पराभव झाल्यास प्रभारी, सरचिटणीस आणि पदाधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल अशा शब्दांत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी बजावले. यावेळी त्यांनी मतदार याद्यांमधील घोळ आणि निवडणूक आयुक्तांच्या निवडीवर आक्षेप घेत देशाच्या सरन्यायाधीशांवर विश्वास नसल्याचा आरोप भाजपावर केला.



इंदिरा भवन येथील काँग्रेस मुख्यालयात खडगे यांनी सरचिटणीस आणि राज्य प्रभारींची बैठक घेतली. यावेळी पक्षाचे नेते राहुल गांधी आणि प्रियांका वढेरा यांच्यासह अनेक काँग्रेस नेते सहभागी होते. बैठकीला संबोधित करताना खडगे म्हणाले, आगामी काळात काँग्रेसशासित राज्यांमध्ये निवडणुका होणार असून, त्याची तयारी आतापासूनच करावी. पक्षाच्या वैचारिक धोरणासंदर्भात एकनिष्ठ नसलेल्यांपासून सावध राहावे लागेल. राज्यातील संघटनात्मक पुनर्बांधणी आणि भविष्यातील निवडणुकांची तयारी करण्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. आगामी निवडणुकांमध्ये पक्षाचा पराभव झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी राज्यातील प्रभारी, पदाधिकारी आणि सरचिटणीसांवर असेल.

काँग्रेसला मतदान करणाऱ्यांची नावे वगळली जाणे आणि त्यांचे मतदान केंद्र बदलण्याचा प्रकार मागील निवडणुकांमध्ये पाहायला मिळाला. भाजपाच्या इशाऱ्याने हा प्रकार निवडणूक आयोगाकडून केला जातो, याला पायबंद बसायला हवा, असेही खडगे म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

---

# देशातील २० राज्यांत पावसाचा इशारा

◆ **नवी दिल्ली, १९ फेब्रुवारी**

बुधवारी देशातील २० राज्यांत पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, दिल्ली, बिहार, झारखंडमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मध्यप्रदेशाच्या पूर्व भागात दोन दिवसांनी पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम भोपाळ, इंदूर आणि जबलपूरमध्येही दिसून येतो. मंगळवारी तत्पूर्वी, राज्यातील बहुतेक शहरांमध्ये दिवसाचे तापमान ३० अंशापेक्षा जास्त राहिले. तर भोपाळमध्ये ३२.२ अंश आणि इंदूरमध्ये ३१.५ अंश तापमानाची नोंद झाली.

राजस्थानमधील तापमान ४ अंशांनी कमी झाले आहे. राजस्थानातील १० जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. २० फेब्रुवारी रोजी हवामान अंशतः सारखेच राहील.

पश्चिमी विक्षोभ आणि चक्रवाती परिस्थितीमुळे, मध्यप्रदेशातील हवामानाचा नमुना पुन्हा बदलला आहे. मंगळवारी ग्वाल्हेर-चंबळमध्ये पाऊस पडला, तर भोपाळ, इंदूर-उज्जैनमध्ये उष्णतेचा परिणाम दिसून आला. ◂(वृत्तसंस्था)

---

# आज श्रींचा प्रकट दिन; विदर्भ पंढरीत भक्तांचा मेळा

## लाखो वारकऱ्यांनी शेगाव दुमदुमले

◆ **शेगाव, १९ फेब्रुवारी**

अवघ्या महाराष्ट्रातील भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या विदर्भाची पंढरी शेगाव येथील संत गजानन महाराज यांचा आज माघ शु. ७, २० फेब्रुवारी रोजी प्रकट दिन सोहळा मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहाने संत गजानन महाराज संस्थानात साजरा होत आहे. यानिमित्त शेकडो वारकरी व दिंड्या दाखल झाल्याने भक्तांचा मेळा जमला आहे.

विशेष म्हणजे, संस्थानने या सर्व वारकरी, भाविक आणि भक्तांची सोय उत्तमप्रकारे केली आहे. संस्थानचे या बाबतीत असलेले व्यवस्थापन आजही सर्व ठिकाणी चर्चेचा विषय राहिला आहे.

संत गजानन माउलींचा १४७ वा प्रकट दिन सोहळा १३ ते २० फेब्रुवारीपर्यंत संत गजानन महाराज संस्थानमध्ये अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने साजरा होत आहे. या भक्तिसंगमात न्हाऊन घेण्यासाठी महाराष्ट्र, मध्यप्रदेशच्या दूरच्या ठिकाणावरून भक्त पायी दिंड्या घेऊन गजानन माउलीच्या प्रकट स्थळाचे आणि समाधीचे दर्शन घेऊन स्वतःला धन्य करीत आहेत. दररोज अशा दिंड्या-पालख्यांच्या आगमनाने आणि टाळ-मृदुंगाच्या मंजुळ स्वरांनी आणि अभंगांनी संत नगरी दुमदुमत आहे.



श्रींच्या प्रकट दिनानिमित्त मंदिरावर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई

२० फेब्रुवारीच्या प्रकट दिन सोहळ्यात भक्तांनी आनंदाने आणि शिस्तीने सहभागी व्हावे तसेच श्रींच्या समाधीचे दर्शन आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संत गजानन महाराज संस्थान शेगांवच्या वतीने करण्यात आले आहे. उत्सवानिमित्त होणाऱ्या गर्दीचे नियोजन करण्यासाठी समाधी दर्शन, मुखदर्शन, पारायण हॉल महाप्रसादाचा लाभ एकेरी मार्गाने घ्यावा, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### क्रेडाई महाराष्ट्राच्या उपाध्यक्षपदी सोलापूरचे शशिकांत जिड्डीमनी, प्रफुल्ल तावरे अध्यक्ष


प्रफुल तावरे   शशिकांत जिड्डीमनी

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
बांधकाम व्यावसायिकांची राज्यस्तरीय शिखर संघटना क्रेडाई महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी बारामती येथील प्रफुल तावरे तर उपाध्यक्षपदी सोलापूरचे शशिकांत जिड्डीमनी यांची निवड करण्यात आली आहे.पुणे येथे झालेल्या सर्वसाधारण सभेत २०२५-२७ या कालावधीकरिता राज्य कार्यकारिणी निवड करण्यात आली आहे. सचिवपदी अहिल्यानगरचे आशिष पोखरना यांना संधी देण्यात आली. मावळते अध्यक्ष प्रमोद खैरनार, सतीश मगर, छाननी समितीचे अनंत राजेगावकर, राजीव पारेख व राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील फुरडे तसेच सर्व सदस्यांनी नव निर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. नवनियुक्त कार्यकारी मंडळाचे व नवनिर्वाचित उपाध्यक्षांचे सोलापूरचे अध्यक्ष अभय सुराणा व सभासदांनी त्यांचे अभिनंदन केले.



### राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्षपदी सुरेश सावंत

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) सामाजिक न्याय विभाग तालुका दक्षिण सोलापूर अध्यक्षपदी सुरेश शेकप्पा सावंत यांची निवड करण्यात आली असून निवडीचे पत्र खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते पुणे येथे देण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने पुण्यात आयोजित बैठकीत सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनील मगरे, आमदार शिवाजी गर्जे, मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे, महेश शिंदे, ॲड. गोरक्षनाथ लोखंडे, आमदार लहु कानडे, सोलापूर शहराध्यक्ष राजाभाऊ बेळ्ळेनवरु, कार्याध्यक्ष अनिल बनसोडे, शरद गायकवाड यांच्या उपस्थितीत नियुक्तीचे पत्र देण्यात आले.



### बटरफ्लाय स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
श्री सिद्धेश्वर शिक्षण मंडळ संचलित, बटरफ्लाय इंग्लिश मिडियम स्कूल येथे विज्ञान प्रदर्शन पार पडले. यावेळी आर्किटेक्चर कॉलेजचे प्राचार्य निरंजन संगावार, मुख्याध्यापिका डॉ. रश्मी कुंभार, मुख्याध्यापिका रश्मी पुरवत उपस्थित होत्या. या प्रदर्शनाची संकल्पना भारतीय परंपरा आणि त्यामागील विज्ञान यावर आधारित होती. यामध्ये भारतीय संस्कार, योगसाधना, ऐतिहासिक वास्तू व सण उत्सव यांचा समावेश होता. प्रदर्शन यशस्वितेसाठी शिक्षिका साधना पाटील, माधवी जॉर्ज, वृषाली गडहिरे, अपर्णा कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.



### महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नूतन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे नूतन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा सन्मान आज मुंबई येथे सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तथा प्रसिद्ध प्रमुख सातलिंग शटगार, गणेश अवधूत व चंद्रकांत रेड्डी यांनी सर्वोदय मंडळ मुंबई येथे भेट घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना श्री सपकाळ म्हणाले की महाराष्ट्रातील विभाग वाईज जिल्हा दौरा होणार असून महाराष्ट्र काँग्रेसची स्थिती आणि माहिती घेऊन काँग्रेस पक्षाचे संघटना बांधणी करणार आहे. यावेळी महात्मा गांधीजी यांच्या विचाराचे व काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
श्री मल्लिकार्जुन हायस्कूल, हत्तुरे नगर येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे व पर्यवेक्षक रमेश दिंडोरे, मारुती माने, बसवराज कोरे यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी समृद्धी सुतार, ऋतुजा कुचेकर, स्नेहा कोन्हाळी, अनुराधा तिकोंडे, साक्षी सगर, तुषार शिंदे, समर्थ जांभळे, कोमल सन्नके, सृष्टी हळके या विद्यार्थ्यांनी प्रशालेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी शिक्षकांमधून अनिलकुमार गावडे, अनिता हौदे, मारुती माने, संतोष स्वामी, पर्यवेक्षक रमेश दिंडोरे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास भारत राऊत, अण्णाराया तुप्पद, गंगाराम घोडके, दत्तात्रय आगरखेड, परमेश्वर चांदोडे, बाबुराव कलशेट्टी, अमरनाथ कदारे उपस्थित होते. प्रास्ताविक अनिता हौदे, सूत्रसंचालन प्रतीक्षा वरनाळ यांनी केले. रमेश आगवणे यांनी आभार मानले.

# रेशनकार्डधारकांची ई-केवायसी महिनाखेरपर्यंत १०० टक्के पूर्ण होणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या आदेशानुसार रेशनधान्य घेणाऱ्या लाभार्थ्यांची ई केवायसीची प्रक्रिया मागील काही महिन्यापासून सुरु करण्यात आली आहे. या उपक्रमात शहरातील रेशनकार्डधारकांचे ७३ टक्के ई-केवायसी पूर्ण करण्यात आल्याची माहिती शहर अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली तर जिल्ह्यातील रास्त भाव धान्य दुकानदारांनी ७० टक्केपर्यंत ई-केवायसी केली असून, येत्या महिनाखेरपर्यंत १०० टक्के ई-केवायसी पूर्ण करण्याच्या सुचना आढावा बैठकीद्वारे दिल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली. शासनाच्या आदेशानुसार रेशन व्यवस्थेत अधिक पारदर्शकता आणली जात आहे. वन नेशन, वन रेशन उपक्रम सुरु करतानाच, पात्र लाभार्थ्यांनाच धान्य देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ई पॉस मशीनमुळे रेशन व्यवस्थेतील गैरप्रकार थांबला गेला आहे. ईकेवायसी प्रक्रियेमुळे यात अधिक पारदर्शकता निर्माण होत आहे. ई-केवायसीची प्रक्रिया राबविताना अनेक तांत्रिक अडचणी समोर आल्या, मात्र या उपक्रमात सातत्य ठेवल्याने शहर व जिल्ह्यातून सरासरी ७० टक्केपर्यंत ई-केवायसी पूर्ण झाली आहे आणि येत्या महिनाखरेपर्यंत ई-केवायसी १०० टक्के पूर्ण करण्याचा संकल्प शहर अन्नधान्य वितरण अधिकारी आणि जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी केला आहे. त्या अनुषंगानेच सर्व ११ तालुक्यातील अधिकारी आणि दुकानदारांना सक्त सुचनाही दिल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी सांगितले.

**तालुकावाईज झालेली ई-केवायसी अशी**
आजतागायत बार्शी तालुक्यात ७०.८८ टक्के ई-केवायसी झाली असून, करमाळा ६६.७४, माढा ६८.३०, माळशिरस ७०.९९, मंगळवेढा ६४.३७, मोहोळ ७१.८९, पंढरपूर ७६.६२, उत्तर सोलापूर ६६.५२, दक्षिण सोलापूर ६८.९०, अक्कलकोट ६६.१२ तर सांगोला ७३.७८ टक्के ई-केवायसी झाली असून, जिल्हाभरात ७०.१२ टक्के ई-केवायसी झाली आणि अजून २९.८८ टक्के राहिली असून, याची पूर्तता येत्या महिनाखेर होणार आहे.
**-संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर**



# गालिबची कविता ही मानवी अस्तित्वाची खरी अभिव्यक्ती : बशीर परवाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
मिर्झा गालिब हे उर्दू साहित्यातील एक प्रतिष्ठित कवी आहेत. त्यांच्या कवितेत मानवी अस्तित्वाची खरी अभिव्यक्ती आहे. मुगलांनी भारताला तीन गोष्टी दिल्या, एक म्हणजे उर्दू भाषा, दुसरे म्हणजे मिर्झा गालिब आणि तिसरे म्हणजे ताजमहाल. गालिब हे केवळ भारतातीलच नाही तर जगातील सर्व भाषांचे महान कवी आहेत, असे गालिबच्या महानतेवर बशीर परवाज बोलत होते.

बज़म-ए-गालिब, सोलापूर ही सोलापूर शहरातील एक महत्त्वाची संस्था आहे, जी उर्दू भाषा आणि साहित्याच्या विकास, संवर्धन आणि प्रसारासाठी सतत प्रयत्नशील आहे. दरवर्षी गालिबच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक साहित्यिक कार्यक्रम आयोजित केला जातो. यावर्षी प्रसिद्ध गायक अतुल बेले यांच्या सुंदर रचनेत नवा-ए-गालिब या शीर्षकाखाली गझल आणि अजमत गालिबची एक संध्याकाळ आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात अतुल बेले यांनी मिर्झा गालिब यांच्या गझलांना उत्तम प्रकारे सादर केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालक कवी आसिफ इक्बाल म्हणाले की, सोशल मीडियावर गालिबच्या नावाने जी शायरी आहे ती गालिबची शायरी नाही. कोणत्याही क्षुल्लक शायरीला गालिबची शायरी म्हणतात, तर गालिबची कविता विचार आणि तत्वज्ञानाची कविता आहे. ज्याची भाषा आणि अभिव्यक्तीचा दर्जा उच्च आहे.

या कार्यक्रमात मीर अफजल मीर, डॉ. हारून रशीद बागबान, डॉ. अब्दुल रशीद शेख, प्रा. इसाक मुजावर, मोईज सिराज अहमद, अब्दुल मन्नान शेख, ॲड. अब्दुल रशीद अर्शद, अब्दुल शुकूर शऊर, शफी कॅप्टन, मुहम्मद हुसैन बक्षी आणि हेमकिरण पत्की उपस्थित होते. संयोजक इरफान कारीगर यांनी आभार मानले.

# रासेयो शिबिरातून व्यक्तिमत्त्वाचा विकास

## संतोष पाटील महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात ज्ञानाधिष्ठित शिक्षणाबरोबर कौशल्याधिष्ठित शिक्षण घेतल्यास रोजगाराचे प्रश्न मिटतात. विद्यापीठाच्या इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून उद्योग सुरू करता येतो. त्या माध्यमातून प्रगती साधता येईल. राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिरातून व्यक्तिमत्त्व विकास घडण्यास मदत होते. स्वयंसेवकांनी स्वावलंबी होत प्रगती साधली पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणात रासेयोला दोन क्रेडिट दिल्याने त्याचा गुणवत्ता वाढीसाठीही उपयोग होऊ शकतो, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले. ते बसवनगर येथे संतोष पाटील महाविद्यालयाच्या रासेयो श्रम संस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सी. जी. हविनाळे होते. या वेळी संस्थेचे सचिव एम. डी. कमळे, सुराज्य भवनचे सचिव बलभीम वारे, माजी सरपंच आनंद देशमुख, प्र. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. सी. जी. हविनाळे म्हणाले, विद्यार्थ्यांनी कष्टाची सवय लावून घेतली पाहिजे. नैतिकता जपून व्यक्तिमत्वाचा विकास साधला पाहिजे. युवकांनी व्यसनाधीनतेपासून दूर राहावे. त्यामुळे आरोग्य सुदृढ राहील. शरीराबरोबर मनाची मशागत करण्यासाठी वाचन संस्कृती वाढवली पाहिजे. वेगवेगळी पुस्तके वाचल्यास माणूस विचार समृद्ध होतो. सुराज्य भवनचे सचिव बलभीम वारे म्हणाले, विद्यार्थीदशेत मुलांनी अध्यात्माकडे वळले पाहिजे. शाकाहाराने आरोग्य आणि मन सुदृढ राहते. शिक्षणाला भक्तीचे अधिष्ठान ठेवल्यास प्रगती होईल. चांगले विचार आणि कृती ठेवल्यास व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल दिसून येतात.

यावेळी कु. सदफ शेख व सिध्दाराम तरडे या शिबिरार्थीनी अनुभव कथन केले. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. एच. एल. जाधव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. एस. ए. निंबर्गी यांनी करून दिला. प्रा. बी.एस.कोरे यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार प्रा विजय साळवे यांनी मानले.

# डिफेक्स आयडिया स्पर्धेत प्रकल्पांचे सादरीकरण

## एबीव्हीपी आयोजित विभागीय स्पर्धेत १७४ संघ आणि एक हजार विद्यार्थ्यांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
देशातील विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण संशोधन आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि सृजन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरावरील डिफेक्ट: २०२५ स्पर्धेचा सोलापूर विभागीय आयडिया प्रेझेंटेशन राऊंड पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सोमवारी पार पडला. यामध्ये १७४ हून अधिक संघ आणि एक हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होत आपल्या प्रकल्पाचे सादरीकरण केले. विद्यापीठातील इनोव्हेशन, इनक्युबेशन सेंटरच्या सहकाऱ्याने सदरील स्पर्धा पार पडल्या.

अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, कृषी, पर्यावरण, ऊर्जा, आरोग्य, औद्योगिक विकास, समाजोपयोगी संशोधन आणि स्टार्टअप यासारख्या विविध क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण आणि सृजनशील कल्पना विद्यार्थ्यांनी सादर केल्या. यातील काही प्रकल्प सामाजिक समस्यांवर प्रभावी उपाय शोधणारे होते, तर काही संकल्पना उद्योजकतेला चालना देणाऱ्या होत्या. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी स्पर्धेच्या ठिकाणी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कल्पनांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले.

प्रारंभी या स्पर्धेचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव योगिनी घारे, डिफेक्स स्पर्धेचे संयोजक संकल्प फळदेसाई, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, इनोव्हेशन आणि लिंकजेसचे संचालक प्रा. विकास पाटील, डिपेक्सच्या दिपिका गिलबिले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आता या स्पर्धेतील निवडक संघ पुढील टप्प्यासाठी पात्र ठरल्या असून, त्यांना अंतिम फेरीपूर्वी विशेष मार्गदर्शन सत्रे दिली जाणार आहेत. सोलापूर विभागात सादर झालेल्या अनेक संकल्पना नवउद्योजकतेला चालना देणाऱ्या आणि 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' या सारख्या राष्ट्रीय अभियानांना बळकटी देणार आहेत.

# पालिकेच्या प्लॉग रनने दिला स्वच्छतेचा कृतिशील संदेश

## शहरातील विविध १२ मार्गावरून उचलला कचरा; ६ हजार विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
महापलिकेच्या घनकचरा विभागाच्या वतीने मंगळवारी सकाळी ७ ते ९ वाजता शहरातील विविध १२ ठिकाणाहून काढलेल्या प्लॉग रन (धावता धावता कचरा उचलणे)च्या माध्यमातून स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणाचा कृतीशील संदेश देण्यात आला. यामध्ये विविध ७० शाळांमधील सुमारे ६ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



सोलापूर महापालिकेच्या वतीने लोकसहभागातून शहराचे स्वच्छता सौंदर्य अबाधित राखण्याचा प्रयत्न म्हणून हा प्लॉग रन काढण्यात आला. विविध शाळा परिसरात आणि १२ मार्गांवरून हा प्लॉग रन सकाळी ७ वाजता काढण्यात आला. स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर, स्वच्छतेसोबत प्लास्टिक मुक्त - कचरामुक्त सोलापूर आदी घोषणांनी परिसर दणाणून सोडला. विविध घोषणांचे फलक घेऊन विद्यार्थी सहभागी झाले होते. विविध मार्गावरून चालता चालता आणि धावता धावता विद्यार्थी व शिक्षकांनी रस्त्यावरील कचरा संकलन केला. यामध्ये विविध शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक, राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी, स्काऊट गाईड तसेच संत निरंकारी संस्थेचे सदस्यही सहभागी झाले होते. या प्लॉग रनचा समारोप महापालिकेतील इंद्रभुवनसमोर सकाळी ९ वाजता करण्यात आला. यावेळी आ. सुभाष देशमुख, महापालिका आयुक्त शितल तेली - उगले, अतिरिक्त आयुक्त रवी पवार, संदीप कारंजे, उपायुक्त तैमुर मुलाणी, मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीश पंडित, मनीषा मगर , कृष्णा पाटील, सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे आदींसह झोन अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गायले. सुमारे ४ हजार ८०० विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. प्लास्टिक मुक्त सोलापूर साठी नाटिका सादर करण्यात आली. सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी केले. सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांनी आभार मानले. याप्रसंगी माझी वसुंधरा प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे उपस्थित होते.

**स्वच्छतेची जबाबदारी प्रत्येकाने पार पाडावी : आ. सुभाष देशमुख**

सोलापूर महापालिका प्रशासनाने स्वच्छतेसाठी जनजागृतीचा कृतिशील उपक्रम स्तुत्य आणि कौतुकास्पद आहे. विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी आपापला परिसर, घर व शहरात स्वच्छता राखण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. माझं शहर कसं दिसावं याची काळजी प्रत्येकाने घ्यावी, असे आवाहन यावेळी आ. सुभाष देशमुख यांनी केले.

**स्वच्छता ही सवय झाली पाहिजे : तेली- उगले**

यावेळी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले म्हणाल्या, देशात स्वच्छतेमध्ये सोलापूर शहराचा ६३ वा नंबर लागतो. ही गोष्ट भूषणावरह नाही. सिंगापूरसह जगातील काही शहरात चांगली स्वच्छता आहे. तिथे मोठ्या प्रमाणात दंड आकारला जातो. तिथे नियमात तडजोड केली जात नाही मात्र आपल्याकडे स्वच्छता पाळण्याचे सांगावे लागते. स्वच्छता ही सवय झाली पाहिजे. आपले शहर स्वच्छ ठेवले पाहिजे. विद्यार्थी, नागरिक, कर्मचारी यांनी आपले घर परिसर व शहर स्वच्छतेसाठी जागृती केली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

**प्लॉग रनमुळे कचरा उचलून कचरापेटीत टाकण्याची सवय लागेल : रवी पवार**

शहरातील नागरिकांनी स्वतःच्या ज्याप्रमाणे चालणे किंवा



धावणे महत्त्वाचे असते, त्याचप्रमाणे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी चालताना अथवा धावताना रस्त्यावर पडलेला कचरा उचलून कचरापेटीत टाकण्याची सवय लागण्यासाठी या प्लॉग रनचे आयोजन करण्यात आले होते. महापालिकेकडून शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येते असे सांगून प्लॉग रनचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले.

**या मार्गावरून प्लॉग रन**

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सरस्वती चौक मार्गे इंद्रभवन, दत्त चौक ते सिद्धेश्वर प्रशाला मार्गे इंद्रभवन, डीआरएम कार्यालय ते महात्मा गांधी पुतळा ते डफरीन चौक मार्गे इंद्रभवन, व्हीआयपी चौक ते एम्प्लॉयमेंट चौक ते इंद्रभवन, सात रस्ता ते रंगभवन चौक ते इंद्रभवन, विजापूर वेस ते सिद्धेश्वर प्रशाला ते इंद्रभवन, गेंट्याल चौक ते पाथरूट चौक ते इंद्रभवन, भैय्या चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते इंद्रभवन, सोलापूर ग्रामीण हेडक्वार्टर ते सिव्हिल चौक ते रंगभवन चौक ते इंद्रभवन, पूनम गेट ते रंगभवन चौक ते इंद्रभवन, राजेंद्र चौक ते पोटफाडी चौक ते इंद्रभवन, गांधीनगर कॅम्प शाळा ते पोटफाडी चौक ते इंद्रभवन आदी मार्गावरून हा रन काढण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शिवजयंती विशेष

# जय शिवाजी, जय भारत पदयात्रा उत्साहात



## छत्रपती शिवाजी महाराजांच्या जय जयकाराने जि.प. परिसर दुमदूमला

### जिल्हाधिकारी, सीईओंनी केले पालखीचे सारथ्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी म हाराजांच्या जय जयकाराने परिसर दुमदूमलाछत्रपती शिवाजी महाराज कि जयजय भवानी व जय शिवाजी चेगजरानं जिल्हा परिषदेचे छत्रपती शिवाजी उद्यान दुमदुमून गेले. जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात शिवजयंती म ोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

जिल्हा परिषदेच्या वतीने आज छत्रपती शिवाजी उद्यान शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले.या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, अभियंता संतोष कुलकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, जिल्हा जल व्यवस्थापन अधिकारी पारसे, मराठा सेवा संघाचे शाखाध्यक्ष अविनाश गोडसे, कास्ट्राईब संघटनेचे अरूण क्षिरसागर, अधिक्षक अनिल जगताप, चंद्रकांत होळकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, कर्मचारी महासंघाचे दिनेश बनसोडे, पतसंस्था क्रमांक १ चे चेअरमन डॉ. माने, चेतन वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती . जय जय महाराष्ट्र माझा हे राज्यगीत घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### जिल्हाधिकारी, सीईओंनी नेली खांद्यावरून पालखी

''जय शिवाजी, जय भारत'' पदयात्रा या उपक्रमांतर्गत सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने नवीन जिल्हाधिकारी कार्यालय ते रंगभवन उद्यान येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत पदयात्रा काढून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद व सिईओ कुलदीप जंगम यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा ठेवले पालखीला खांदा देऊन पालखी वाहून नेली. संभाजी आरमार च्या वतीने या पालखी सोहळ्याचे आयोजन करणेत आले होते. या प्रसंगी युवा नेते मनिष देशमुख, संभाजी आरमारचे श्रीकांत बापू डांगे, संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी (तात्या) वाघमोडे उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस आयुक्त राजकुमार, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर, निवासी उप जिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, प्रांताधिकारी सदाशिव पडदूने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, शिंक्षणाधिकारी कादर शेख, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, शिवछत्रपती पुरस्कार विजेते हाजी मलंग नदाफ, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांच्यासह प्रशासनातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज पुतळयापर्यंत हजारो विद्यार्थी, नागरिक जय शिवाजी जय भारत पदयात्रेत सहभागी झाले होते.

### जिल्हाधिकारी कार्यालय ते रंगभवनपर्यंत पदयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५वी जयंती जयंतीनिमित्त नवीन जिल्हाधिकारी कार्यालय ते रंगभवन चौकातील श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानापर्यंत जय शिवाजी, जय भारत पदयात्रा काढण्यात आली.

या पदयात्रेत सहभागी जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी- कर्मचारी, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, नागरिक, पालक, पत्रकार यांनी जय भवानी जय शिवाजी या घोषणा देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वातंत्र्य, समानता आणि न्यायाचा विचारधारेला पुढे नेऊन समाजात एकता आणि राष्ट्रीय ऐक्य भावना निर्माण करण्याचा संदेश दिला.

या पदयात्रेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी कुलदीप जंगम, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी विणा पवार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संतोषकुमार देशमुख, प्रांताधिकारी सदाशिव पडदुने, तहसीलदार श्रीकांत पाटील, तहसीलदार निलेश पाटील यांच्यासह अन्य सर्व संबंधित विभागाचे अधिकारी कर्मचारी व मान्यवर नागरिक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी हिरवा झेंडा दाखवून जय शिवाजी, जय भारत पदयात्रेचा शुभारंभ केला. तसेच स्वतः या पदयात्रेत सहभागी झाले. ही यात्रा नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता चौक मार्गे, रंगभवन चौकातील श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानापर्यंत आली. श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.तत्पूर्वी नियोजन भवन येथील कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. प्रारंभी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी जय शिवाजी जय भारत पदयात्राच्या आयोजनाच्या उद्देश सांगितला. यावेळी क्रीडा क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींचे यावेळी स्वागत करण्यात आले. तसेच काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांनाही म ान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील शौर्य गीतांचे गायन झाले. तसेच शाहीरांनी पोवाड्याच्या माध्यमातून शिवछत्रपतींचा इतिहास सर्वांसमोर म ांडला. यावेळी शिवछत्रपती यांचा पाळणा कार्यक्रम झाला. शालेय विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाचे सादरीकरण झाले. अनेक विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोशाख परिधान केलेला होता तसेच मावळे झालेले विद्यार्थी हे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. शालेय विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य व विचार यावर भाषण केले.



### पदयात्रेचे मुस्लिम ब्रिगेडकडून पुष्पवृष्टीने स्वागत



यापदयात्रेचे मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्या वतीने शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान आणि मुस्लिम मावळ्यांनी १०० किलो फुलांची पुष्पवृष्टी करुन स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या पदयात्रेत माजी महापौर आरिफ शेख, छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष म शफीक रचभरे कॅप्टन शफीक, मुबीन सय्यद, अल्ताफ लिंबूवाले,मराठा सेवा संघाचे राम गायकवाड अविनाश गोडसे, मुस्लिम ब्रिगेडचे राजू हुंडेकरी , मौलाना इरफान,बशीर सय्यद, हारुण शेख, जावेद बद्दी, तन्वीर गुलजार, रिजवान शेख सर, कादर भागानगरी, कय्युम मोहळकर, रिजवान दंडोती, तन्वीर शेख, बाबा शेख, एजाज बागवान, मक्सूद शेख सर,वाहिद शेख, हारिस शेख, खाशिम बेलीफ, रुस्तुम शेख, इरफान शेख, खलील कादरी, रिजवान पैलवान आदी पदाधिकारीसह हजारो विद्यार्थी, नागरिक यांची जय शिवाजी जय भारत पदयात्रेत सहभागी झाले होते.

### ढोल ताशा, लेझीमचा गजर

या यात्रेत सहभागी झालेल्या विद्यार्थी व नागरिकांकडून जय भवानी, जय शिवाजी यांच्या घोषणा तर ढोल ताशाच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमला होता. पदयात्रेत सहभागी झालेल्या प्रत्येकाच्या अंगात विजयश्री संचारल्याप्रमाणे प्रत्येक जण घोषणा देऊन पुढे मार्गस्थ होत होता. या पदयात्रेत सहभागी विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी तसेच ढोल ताशा, लेझीमच्या गजराने एका मोठ्या उत्सावाचे वातावरण तयार केले होते.

### मुस्लिम ब्रिगेडची शिव एकता रॅली

छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या सैन्यामध्ये मुस्लिम मावळ्यांना देखील मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेतले होते मोठम ोठ्या पदावर मुस्लिम मावळे तैनात होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचा दृष्टिकोन हा धर्म धर्म समभाव आणि देश एक संघ प्रेरित होता. शिवाजी महाराज यांची आठवण कायम स्मरणात राहावी यासाठी छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम ब्रिगेड च्या वतीने शिव एकता रॅलीचे आयोजन केले जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यातील विविध मुस्लिम सरदार अधिकारी यांची नावे या निमित्ताने समाजाला कळण्यासाठी विविध फलक घेऊन त्याची माहिती देण्यात आली.

### एक पेड माँ के नाम

केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे या पदयात्रा उत्सवात आईच्या नावाने एक वृक्ष (एक पेड मां के नाम) यानुसार नियोजन भवन परिसरात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते एका वृक्षाची लागवड करण्यात आली.

# रौप्यमहोत्सवी वर्षात अनेक सेवाभावी प्रकल्प राबविणार : विशाल खमितकर

### भावसार व्हिजन सोलापूरचा पदग्रहण सोहळा उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

भावसार व्हीजनचे २०२५ हे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने या वर्षभरात भावसार समाजासाठी अनेक सेवाभावी प्रकल्प राबविणार असल्याचे आपल्या अध्यक्षीय भाषणात विशाल खमितकर यांनी सांगितले.

भावसार व्हिजन सोलापूर क्लबचा नूतन अध्यक्ष, सचिव आणि पदाधिकारी यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी समाज अध्यक्ष राजकुमार हंचाटे, गव्हर्नर श्रीकांत रंग्दाळ, नॅशनल डायरेक्टर शिवाजी उपरे इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

सोहळ्याची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी सामूहिक गायत्री मंत्र उच्चारून समाजात दिवंगत बांधवांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रारंभी माजी अध्यक्षप्रणिता महिंद्रकर यांनी सोहळ्याची प्रस्तावना केली आणि सर्व उपस्थितांचे स्वागत केले.माजी गव्हर्नर गिरीश पूकाले यांनी शुभेच्या संदेशाचे वाचन केले. यावेळी प्रणिता महिंद्रकर यांनी नूतन अध्यक्ष विशाल खामितकर यांना सनद आणि कॉलर प्रदान केले तर विशाल खमित्कर यांनी नूतन सचिव आशिष जवळकर यांना सचिव पदाची धुरा सोपविली. गव्हर्नर श्रीकांत रंगदाल यांनी नूतन अध्यक्ष, सचिव आणि नूतन पदाधिकाऱ्यांना शपथ दिली. तसेच नॅशनल डायरेक्टर शिवाजी उपरे यांनी ३२ नवीन सदस्यांनी शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन गिरीश पूकाळे यांनी केले. सचिव आशिष जवळकर यांनी आभार मानले.

# मध्यवर्ती महामंडळाची वाद्यांच्या गजरात मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी म हाराजांच्या ३९५व्या जयंतीनिमित्त बुधवारी सायंकाळी पाच वाजता पोलिस आयुक्त एम राजकुमार, आमदार सुभाष देशमुख, उपायुक्त श्री कबाडे यांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्ती चे विधीवत पूजन करून मिरवणूकीस प्रारंभ झाला.

या प्रसंगी मान्यवरांचा सत्कार ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, उत्सव अध्यक्ष सुशिल बंदपट्टे यांनी केले. या प्रसंगी सर्वश्री श्रीकांत घाडगे, सुनील रसाळे, राजनभाऊ जाधव, पंकज काटकर, बाळासाहेब पुणेकर, श्रीकांत डांगे, मतीन बागवान, राजू हुंडेकरी, विजय पुकाळे, अंबादास शेळके, प्रितम परदेशी, प्रकाश ननवरे, देवीदास घुले, बसवराज कोळी, शिवाजीराव घाडगे गुरुजी, शिवाजी बासुतकर, दत्तात्रय कोलारकर पैलवान, मनोज गादेकर, मनीषा नलावडे, सुनंदा साळुंखे, लता ढेरे, सुनिता गरड, माधुरी चव्हाण, संगिता काळे, लक्ष्मी माने, तेजस्वी पवार, रेश्मा घुले, सोनी काळे, रूपाली जाधव, शशिकला कस्पटे, विजय भोईटे, आबा सावंत, चक्रपाणी गज्जम, अशोक कलशेट्टी, राजमाता जिजाऊ भजनी महिला मंडळ बाळे अग्रभागी होते.



# ठोकळ प्रशालेत शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ फेब्रवारी-**

इंदिरा ज्ञानवर्धिनी सोलापूर संचलित श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय,सोलापूर येथे छत्रपती शिवाजी म हाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्राचार्य श्री. डी . डी.गाजरे तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षण विस्ताराधिकारी अशोक भांजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रथमतः महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत सत्कार करण्यात आले. स्वागत सत्कारानंतर कु. पल्लवी माळी, शालिनी जगताप, राधिका माने, समीक्षा बिराजदार, राजनंदिनी पाटील यांनी शिवरायांच्या जीवनावर, कार्यावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला.. इ.८वी तील कु.आदिती काटमोरे हिने शिवगर्जना म्हटले, इ.५वी ते ७वी तील विद्यार्थी विद्यार्थिनींनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर नाटक सादर केले. कु. विधी काळे व प्रणाली साळुंखे यांनी आपल्या मधुर आवाजात राजं आलं राजं.हे गीत गायले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे बी.एस. यांनी केले तर आभार जाधव ए. यू. यांनी केले. उपक्रमाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा निर्मलाताई ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष ॲड. विपीन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पाताई ठोकळ यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले.



### २५ फेब्रुवारीपासून

# करमाळा तालुक्यासाठी कुकडीचे रब्बी आवर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १९ फेब्रुवारी-**

करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना कुकडेचे दुसरे आवर्तन देण्यात येणार आहे. आ.पाटील यांनी सांगितले की कुकडी पाणी वाटप कालवा सल्लागार समितीची बैठक अहिल्यानगर (अहमदनगर) येथे पार पडली होती. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आग्रही मागणी होती. मंत्रीमहोदय यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच शेतीसाठी पाणी दिले जाईल, असे ठाम आश्वासन सुध्दा दिले. याच बैठकीत आपण करमाळा तालुक्यातील पाणी मोजमाप करत असताना ते प्रत्यक्षात या तालुक्यातील कुकडी लाभ क्षेत्रात पाणी येण्यापूर्वी गृहीत धरले जाते व यामूळे अगोदर पाणी गळतीमुळे मिळत असलेल्या कमी पाण्याचे वाटप कमी दिवसात करणे अवघड होऊन जाते ही बाब जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समोर मांडली असता त्यांनी तात्काळ ही बाब तपासून करमाळा तालुक्यातील हद्दीत कुकडी किमी २२३ मध्ये पाणी प्रवेश केल्यानंतरच तेथील पाणी हिशोब अथवा प्राप्त पाणी मोजमाप धरले जावे असे आदेश दिले. या आदेशाची अंमलबजावणी या चालू मिळणाऱ्या आवर्तनापासून होणार आहे. कुकडी आवर्तनात करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांवर अनेक दशकांपासून होणारा हा अन्याय आपण ठासून बाजू मांडल्याने आता दुर झाला असून यामुळे निश्चितच मिळणाऱ्या पाण्यात काही प्रमाणात का होईना वाढ होणार आहे. आता करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना दि. २५ फेब्रुवारी पासून कुकडीचे पाणी मिळणार असुन या आवर्तनाच्या कुकडी डावा कालवा व चिलवडी शाखा दोन्ही शाखेच्या पाणी वाटप तारखा बाबत सविस्तर माहिती लवकरच शेतकऱ्यांना कळवली जाईल असेही आमदार नारायण आबा पाटील यांनी सांगितले. सध्या करमाळा तालुक्यातील कुकडी लाभ क्षेत्रात गहू, ज्वारी, हरभरा, मका, कांदा आदिसह अनेक पिके उभी असून त्यांना पाण्याची किमान एक तरी पाणी पाळी मिळणे आवश्यक होते. शेतकरी वर्गात समाधान दिसून येत आहे.



# धनंजय मुंडेंकडून इफ्कोमध्ये २०० कोटीचा महाघोटाळा

### दमानियांचा आरोपाचा आणखी एक बॉम्ब!

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई,दि.१९ फेब्रुवारी -**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर सातत्याने मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप करीत राजीनामेची मागणी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बुधवारी आणखी एक आरोपाचा ' बॉम्ब 'टाकला. मुंडे मागील सरकारमध्ये कृषी मंत्री असताना त्यांनी मंत्रिमंडळात न झालेल्या निर्णयाबद्दल खोटा आदेश काढून २०० कोटींचा निधी जारी केल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. त्यानंतर अतिरिक्त ५०० कोटींची मागणी केली असून अशा व्यक्तीला मंत्रिमंडळात राहण्याचा कोणताही अधिकार नाही . त्यांनी हिम्मत असल्यास पुरावीन हे आरोप फेटाळून लावावेत, असे आव्हानही त्यांना दिले .



दमानिया यांनी शिवजयंतीच्या दिनी पत्रकार परिषद घेऊन धनंजय मुंडे यांच्यावरील आरोपांची मालिका कायम ठेवली. त्या म्हणाल्या, गेल्या वर्षी २३ आणि ३० सप्टेंबरच्या कॅबिनेटचे काही निर्णय झाले. पण यात कृषी विभागाशी संबंधित न झालेल्या निर्णयांबाबत धनंजय मुंडेंनी आदेश काढला. मंत्रिमंडळाच्या बैठकीत २०० कोटींच्या निधीचा कुठेही उल्लेख नसताना ती रक्कम आजच अदा करण्याचे निर्देश धनंजय मुंडे यांनी पत्रातून केले. याशिवाय ऑक्टोबरमध्ये अतिरिक्त ५०० कोटीचे निधी देण्याची मागणी केली मुंडेंसारखा भ्रष्ट माणूस कृषी काय, कुठलाच मंत्री होण्याच्या लायक नाही. हा मंत्री कुठल्या थराला जाऊ शकतो याचे हे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी आणि मंत्रिपदावरून हकलून द्यावें ,अशी मागणी करून त्या म्हणाल्या, कृषी घोटाळा, देशमुख हत्याकांड या प्रकरणात धनंजय मुंडेंचा किती खोलवर सहभाग आहे ,हे दाखवून देणे हाच या मागचा हेतू आहे .कराड आणि मुंडे कसे एकमेकांसोबत आहेत ते मी पुराव्यांनिशी सिद्ध केलं आहे. कृषी साहित्य कशा प्रकारे चढ्यादरात विकत घेतली गेली हेदेखील दाखवून दिलं. इफ्कोची प्रॉडक्टस् कशी अनेक वेबसाईटवर विकली जातात हे समोर आले.जोपर्यंत धनंजय मुंडे हे मंत्रिमंडळात आहेत तोपर्यंत संतोष देशमुख प्रकरणात अपेक्षित कारवाई होणार नाही असे सांगून त्या म्हणाल्या की, आपण केलेल्या आरोपांवर धनंजय मुंडे हे उडवाउडवीची उत्तरे देतात. आरोपांना उत्तरे द्यायची तर पुरावे घेऊन माध्यमांसमोर यावे, असे आव्हानही त्यांनी दिले.

### खोटे बोल, पण रेटून बोल

सदर कंपन्या या आमची उत्पादित खते विकण्यास प्राधिकृत नाहीत. फर्टीलायझर कंट्रोल ऑर्डर मधील तरतुदींप्रमाणे ओ प्रमाणपत्र असल्याशिवाय अशी खते विकता येत नाहीत. अशा प्रकारची प्रेस रिलीज आमचे स्वीय सहाय्यक यांनी नव्हे तर स्वतः इफ्कोने यापूर्वीच काढली आहे. तसेच ती आजही खत्रऋज चा संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अंजली दमानिया यांनाही ही गोष्ट समजत असावी. पण त्यानंतरही खोटे बोल, पण रेटून बोल असा उद्योग त्यांनी चालवला आहे, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

## अग्रलेख...

# संघटित हिंदू, समर्थ भारत

देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे झाली तरीदेखील भारतातील हिंदूंना लक्ष्य करण्याच्या परिस्थितीत बदल झालेला नाही. त्यांच्यावरील अत्याचारांना आळा बसलेला नाही. हिंदूंच्या महिला आणि मुलींवरील अत्याचार थांबलेले नाहीत. ना हिंदू मठ-मंदिरांवरील हल्ल्यांमध्ये घट झाली ना हिंदूंच्या धार्मिक मिरवणुकांना लक्ष्य करून हिंसाचार माजवण्याचे प्रकार कमी झालेत. या ना त्या प्रकारे हिंदूंमध्ये अस्वस्थता निर्माण करण्याचे प्रकार सदासर्वकाळ देशाच्या कानाकोपऱ्यात होताना दिसतात. हिंदूंवरील आक्रमणांचा प्राचीन इतिहास आहे. इस्लामी आक्रमकांनी वेळोवेळी हिंदू धर्म आणि भारतीय सांस्कृतिक वारशाचा नाश करण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे हजारो मंदिरे उद्ध्वस्त झाली. मुघल साम्राज्याच्या काळात, विशेषतः औरंगजेबाच्या अति क्रूर शासन व्यवस्थेत हिंदू धर्माचे प्रतीक असलेली मंदिरे तोडून त्या जागी मशिदी उभारल्या गेल्या. अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी, काशीतील विश्वनाथ मंदिर आणि मथुरेतील कृष्ण जन्मभूमी यांसारखी मंदिरे या विध्वंसाची साक्ष देतात. हिंदूंना लक्ष्य करण्याच्या या सर्व घटनांमध्ये कधी ख्रिस्ती धर्माच्या पालनकर्त्यांचा तर कधी तथाकथित शांतिदूतांचा असलेला सहभाग लपून राहिलेला नाही. दोनच दिवसांपूर्वी अयोध्येत जेथे महाकुंभातील पवित्र स्नान आटोपून दर्शनाला येणाऱ्या भाविकांमध्ये गोंधळ माजवून चेंगराचेंगरी घडवून आणण्याचा प्रयत्न पोलिसांच्या सतर्कतेमुळे उघडकीस आला. ड्रोनविरोधी यंत्रणेच्या चाचणी दरम्यान पोलिसांनी राम मंदिर मार्गावरून उडणारा एक ड्रोन कॅमेरा रोखला आणि तो जमिनीवर पाडला. रामंदिरात गोंधळ निर्माण करण्याचा कट वेळेत रोखला गेला नसता तर मोठा अनर्थ घडला असता आणि त्यासाठी उत्तरप्रदेश सरकारला दोषी धरले गेले असते. पोलिसांनी या प्रकरणात एफआयआर दाखल केला असून, कट रचणाऱ्याची ओळख पटवली आहे. तो हरयाणातील गुरुग्राम येथील असल्याचे कळले आहे. गेल्या सव्वा महिन्यापासून उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथे महाकुंभ सुरू आहे. या महाकुंभात आजवर ५० कोटी भाविकांनी आस्थेची डुबकी लावली आहे. उत्तरप्रदेश सरकारने महाकुंभासाठी प्रचंड व्यवस्था करून आपल्या व्यवस्थापन कौशल्याचे उदाहरणच जगापुढे पेश केले आहे. भाविकांच्या निवासासाठी दीड लाख तंबू उभारले असून, शेकडो ड्रोन्सच्या माध्यमातून सुरक्षिततेची काळजी घेतली जात आहे. पण ही व्यवस्था मोडकळीस आणण्याचे प्रयत्न २९ जानेवारीला झाले. काही समजाकंटकांनी रात्रीच्या वेळी जबरदस्तीने संगमावर जाण्यासाठी ढकलाढकली सुरू केल्यानंतर झालेल्या चंगराचेंगरीत ३० भाविकांचा मृत्यू झाला. या कट-कारस्थानामागील डोक्यांचा शोध पोलिस घेत आहेत. चेंगराचेंगरीपूर्वी गर्दीतून 'अल्लाह् अकबर'चे नारे ऐकायला आल्याचे तसेच त्यावेळी परिसरात असलेल्या शेकडो मोबाईलचे सिमकार्ड आता बंद असल्याचे पोलिसांच्या ध्यानात आले आहे. यामागच्या कारणांचा शोध पोलिस घेत आहेत. रामनवमीला निघणाऱ्या मिरवणुकांमधील हिंसाचार, गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीवरील दगडफेक, दुर्गापूजा मंडपातील हडेलहप्पी हे प्रकार हिंदूंसाठी नवे राहिलेले नाहीत. मुळात हिंदू समाज सहिष्णू आहे. तो शांततेची पूजा करतो. आपल्या धार्मिक कार्यक्रमामुळे इतरांना त्रास होऊ नये, याची तो पुरेपूर काळजी घेतो. मात्र इतर तथाकथित शांतिप्रिय समाजाचे लोक हिंदूंच्या कार्यक्रमातच व्यत्यय आणण्यासाठी प्रयत्नशील दिसतात. बांगेलादशातील हिंसाचारही आपण काही महिन्यांपूर्वी अनुभवला. तेथील जिहादींनी सरकारविरोधी आंदोलनाची दिशा कशी बदलली आणि बांगलादेशी हिंदूंना कसे लक्ष्य केले, हे जगाने अनुभवले. त्याबाबत वेगळे सांगण्याची गरज नाही. लोकसंख्येचे संतुलन बदलणे, आपल्या अल्लाशिवाय इतरांना काफिर समजणे, परधर्मातील स्त्रियांना लव्ह जिहादच्या जाळ्यात ओढणे, लॅण्ड जिहादच्या नावाखाली हिंदूंच्या जमिनी बळकावणे, ट्रेन जिहाद करणे असे सारे प्रकार अनुभवायला येत आहेत. आता तर थुक जिहादनंतर हॉस्पिटल जिहादही चर्चेला येऊ लागला आहे. या साऱ्या कारस्थानांबद्दल हिंदूंनीच सावधगिरी बाळगण्याची वेळ आलेली आहे. सध्या देशातील हिंदूंना बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्या मुस्लिमांच्या अवैध घुसखोरीचाही सामना करावा लागत आहे. देशाच्या विविध भागांत ही मंडळी बनावट कागदपत्रांद्वारे राहत आहेत. बनावट आधार कार्ड रॅकेट्स सध्या उघडकीस येत असून, त्यावरून यांच्याविरुद्ध देशातील वेगवेगळ्या भागांत कारवाई केली जात आहे. या कारवाईमुळे काही संस्था आणि व्यक्तींच्या पोटात दुखू लागले आहे. काहींना तर या लोकांबद्दल उमाळा येऊ लागला आहे. या अवैध घुसखोरांच्या वस्त्यांमधील लोकांना पाणी, वीज आणि रस्ते उपलब्ध करून द्यावे, अशा मागण्या उठू लागल्या आहेत. त्याबाबत न्यायालयाचे दरवाजेही ठोठावले जाऊ लागले आहेत. जर या अवैध घुसखोरांबाबत सहानुभूती दाखवून त्यांच्यासाठी रस्ते, पाणी आणि पायाभूत सुविधा पुरविण्याचा आदेश न्यायालयाने दिला तर त्याचा बोजा निश्चितच या देशातील करदात्यांवर पडणार आहे. काही पुरोगामी संस्था आणि त्यांचे नेते मानवाधिकाराचा मुद्दा उपस्थित करण्यात पुढाकार घेतात, पण हिंदूंवर अन्याय झाला की या संस्थांचा आवाज बसतो, तोंडाला कुलूप लागते आणि समाजमाध्यमेही मौन होतात. बांगलादेशी हिंदूंवर देखील जेव्हा भयावह अत्याचार केले गेले तेव्हा त्यांनी काहीही वेगळे केले नाही. नव्वदीच्या दशकातल्या काश्मिरी पंडितांच्या नरसंहाराच्या वेळी या जागतिक संघटनांनी डोळ्यावर पट्टी बांधून घेतली होती. खोऱ्यातून हिंदू पळून जात होते, त्यावेळी आपल्या मुली आणि बायकांना सोडून गेलात तर जीव वाचेल, अशा धमक्या त्यांना दिल्या गेल्या. ज्यांनी विरोध केला त्यांना कापून काढले गेले किंवा बंदुकीच्या गोळीने उडवून दिले गेले. या हिंदूंचे अश्रू पुसण्यासाठी पुढे यायला पुरोगाम्यांना वेळ नव्हता. हिंदूंच्या झालेल्या या सामूहिक कत्तलीतील पीडित आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यांच्या गेलेल्या जमिनी आजही त्यांना परत मिळालेल्या नाहीत. परंतु जेव्हा काश्मीरच्या खोऱ्यात वाढलेल्या उग्रवादाशी लढायला भारतीय सैन्याला 'टीट फॉर टॅट'चा आदेश दिला गेला, तेव्हा मात्र ढोंगी पुरोगाम्यांना काश्मिरी मुसलमानांचे दुःख असह्य झाले. पाश्चिमात्य देशांमध्ये जर असा नरसंहार झाला, तर त्याला लगेच 'होलोकॉस्ट' म्हणून वैश्विक दुःखाचा दर्जा देऊन इतिहासातील महत्त्वाचा धडा म्हणून अभ्यासला गेला असता. परंतु तशाच मरणयातना सोसूनसुद्धा काश्मिरी पंडितांच्या संकटाकडे कोणाचेही लक्ष गेले नाही. तशीच परिस्थिती बांगलादेशातील हिंदूंची झाली. यातून प्रश्न असा निर्माण होतो की, या देशात हिंदू असणे हा गुन्हा आहे का? मुस्लिमांच्या गुंडागर्दीची आणखीही अनेक प्रकरणे बघायला मिळतील. महाकुंभ ज्या ठिकाणी होणार होते, ती जागा वक्फ बोर्डाची असल्याचा दावा करून ऑल इंडिया मुस्लिम जमातचे अध्यक्ष मौलाना शहाबुद्दीन रझवी बरेलवी यांनी गोंधळ उडवून दिला. त्यांनी दावा केला की, ५५ बिघा वक्फ जमीन हिंदू आपल्या धार्मिक कार्यक्रमासाठी वापरणार आहेत. यासाठी त्यांनी एक व्हिडीओ जारी केला. त्यात ते म्हणाले 'बघा, आम्ही मुस्लिम समाज इतकं मोठं मन दाखवून तुम्हाला आमच्या वक्फच्या जमिनीवर कुंभमेळा साजरा करू देत आहोत. पण तुम्ही मुस्लिम समाजाने तिथे आपली दुकाने लावू नयेत असे हुकूम काढत आहात.' आधीच देशातील वक्फ मंडळे, त्यांची कार्यशैली, त्यांचे गैरप्रकार, भ्रष्टाचार, त्यांचा लॅण्ड जिहाद हे सारे मुद्दे चर्चेत असताना कुंभासाठीच्या जमिनीबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करणे याला 'उलटा चोर कोतवाल को डाटे' असेच म्हणावे लागेल. हिंदूंवरील अत्याचारांची प्रकरणे इथवरच थांबत नाहीत. विदेशी भूमीत भारताला वेगळे पाडण्याची खेळीसुद्धा खेळली जाते. मात्र आपले सध्याचे राज्यकर्ते त्यांना बधत नाहीत. देशात सुरू असलेल्या लव्ह जिहादला किती हिंदू मुली बळी पडल्या याची यादीच एका साप्ताहिकाने संकलित केली होती. त्यातील अनेक प्रकरणे ऐकून मन सन्न झाल्याशिवाय राहात नाही. उच्चशिक्षित मुलींनादेखील शांतिप्रिय समाजाच्या मुलांनी लव्ह जिहादमध्ये अडकवलेले दिसून आले आहे. तरुण मुलींच्या असहायतेचा फायदा घ्यायचा, त्यांना आर्थिक मदत करायची, त्यांना महागड्या भेटवस्तू द्यायच्या आणि जाळ्यात ओढायचे, हे प्रकार आजही सर्रास होत आहेत. हिंदू असणे हा गुन्हा नाही, असे उच्चरवाने सांगायचे असेल तर हिंदूंनाच सजग होऊन आपण कोणाचे लक्ष्य होऊ नये यासाठी संघटित व्हावे लागेल. संकटाचा मुकाबला साम-दाम-दंड- भेदाने करावा लागेल. काळाची पावले ओळखून 'संघटित हिंदू, समर्थ भारत' या मंत्राचा जप करावा लागेल.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# वक्फ कायदा : क्रमप्राप्त बदल

दिनांक २७/०१/२०२५ रोजी जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील संयुक्त संसदीय समितीने येऊ घातलेल्या बहुचर्चित वक्फ बिलावरील अहवाल संसदीय कामकाज मंत्रालयाकडे पाठवला. या समितीने आधी सर्व सामान्य नागरिकांकडून आणि विविध संस्थांकडून या बिलावर सूचना मागविल्या होत्या. समितीच्या अनेक बैठकी झाल्या. समाज माध्यमांतून समितीच्या कार्यकलापाविषयी बातम्या येत होत्या. या समितीत असलेल्या विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या सहभागाविषयी, त्यांच्या असंसदीय आक्रमक वागणुकीबद्दल बातम्या येत होत्या. जेपीसीचे सर्व विरोधी पक्ष सदस्य प्रत्येक मुद्यावर हे सगळे लोकशाहीविरोधी आहे, अशी सतत ओरड करताना दिसत होते. वक्फ कायद्यात संशोधन करण्यासाठी जो प्रस्ताव संसदेच्या पटलावर ठेवण्यात आला, त्याला काही सदस्यांनी संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याची केलेली सूचना मान्य करून खासदार जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठित केली होती. संसदेतील पक्षीय संख्याबळाच्या आधारावर सदस्य संख्या घेऊन ही समिती गठित करण्यात आली. या समितीने विविध ठिकाणी आणि विविध हितसंबंधी गटांच्या बैठकी घेतल्या. अनेक राज्यांमध्ये जाऊन तेथील हितसंबंधी गटांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून या प्रतिनिधींचे म्हणणे नोंदवून घेतले. या समितीच्या बैठकांमध्ये विरोधी पक्षाच्या प्रतिनिधींनी अनेकदा लोकशाहीविरोधी असंसदीय वर्तणूक केल्याच्या बातम्या मात्र येतच राहिल्या. संसदेच्या चालू असलेल्या बजेट सत्रात सुधारित वक्फ बिल २०२५ मंजुरीसाठी सादर होण्याची शक्यता आहे.

सदर संयुक्त संसदीय समितीपुढे विविध हितसंबंधी गटांनी विविध मुद्दे मांडले असले, तरी यात सर्व मुस्लिम गटांनी वक्फ बोर्डावर दोन गैर-मुस्लिम प्रतिनिधी नेमण्याच्या प्रावधानाला एकमुखाने विरोध केला असल्याचे समजते. इस्लामिक समाजाला वा इस्लामिक संघटनांना गैर-मुस्लिम व्यक्ती बोर्डावर येणे हे गैर-इस्लामिक वाटते. मुळात इस्लाम हा अत्यंत बंदिस्त धर्म आहे. इस्लामला आणि त्याच्या अनुयायांना कोणतेही परिवर्तन मान्य नाही. परिणामी मागील दोन हजार वर्षांपासून या धर्मात कोणतेही विशेष असे बदल झालेले आढळत नाहीत. त्यातही भारतीय मुसलमान एक अजब मानसिकता आधुनिक काळातदेखील जोपासताना दिसतात. त्यांना अजूनही हिंदू पडखाऊ धोरण स्वीकारतील असे वाटते. काँग्रेसच्या पूर्वापार मुस्लिम अनुनयाच्या धोरणाचा हा परिपाक आहे. गांधींच्या काळातही अनेक हिंदू नेते काँग्रेसी मुस्लिम अनुनयाचा विरोध करीत असत, परंतु त्यांचा आवाज तेव्हा अतिशय क्षीण होता. आपण काहीही केले तरी ते हिंदू मान्य करतात अशाच समजुतीत आजही मुस्लिम समाज आहे. वक्फ सुधारणा बिलाच्या संयुक्त संसदीय समितीसमोर विविध राज्यांचे वक्फ बोर्ड आणि मुस्लिम संघटनांनी मांडलेले सर्वच मुद्दे अत्यंत हास्यास्पद आहेत, हे या समितीच्या अहवालावर नजर टाकली तरी लक्षात येते. त्याच वेळी विविध चर्चा मंचावरून ओवेसी असो की पठाण; वक्फ सुधारणा विरोधात अत्यंत आक्रमक भाषा वापरताना दिसतात. वक्फने हडप केलेल्या जमिनीचे योग्य कागदपत्र त्यांच्या जवळ नसताना मुस्लिम नेते आणि उलेमा मंडळी वक्फने बेकायदेशीररीत्या हडप केलेल्या जमिनींचा एक इंचही भाग देणार नसल्याची भाषा करताना दिसतात. खरं म्हणजे संयुक्त संसदीय समिती, सच्चर समिती अथवा आज ज्याची विशेष चर्चा आहे त्या केंद्र सरकारने मांडलेल्या बिलात कोणत्याही मूलभूत सुधारणा आलेल्या नाहीत. मात्र इस्लामला कोणत्याही प्रकारे बदलण्याचा वा त्यावर परिणाम होईल अशा गोष्टींचा, इस्लाम खतरे में अशी हाकाटी करीत आक्रमकतेने विरोध करण्याची भारतातील मुस्लिम नेतृत्वाला सवयच पडलेली आहे. वास्तविक वक्फ बोर्ड सुधारणांना विरोध करणे हे इस्लाममधील वक्फच्या तत्त्वज्ञानालाच विरोध करणे होय. इस्लामनुसार वक्फ म्हणजे धार्मिक अथवा लोकोपयोगी कामांसाठी अल्लाहच्या नावाने देण्यात आलेली संपत्ती होय. त्यामुळे अशा प्रकारच्या संपत्तीचा लाभ त्या वक्फवर नेमणूक झालेल्या कोणत्याही सदस्याने अथवा मुत्तावलीने घेणे अयोग्य म्हणजे हराम ठरवले आहे. परंतु जगदंबिका पाल यांच्या समितीसमोर घेण्यात आलेले सर्व आक्षेप हे व्यक्तिगत अधिकारांवर गदा येण्याची शक्यता असल्याने घेण्यात आले आहेत किंवा या देशातील कोणत्याही सरकारला इस्लामशी संबंधित कायद्यांमध्ये वा इस्लाममध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही या अरेरावी भावनेतून आलेले आहेत. केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या सुधारणांमागे असलेला उद्देश हा वक्फसंबंधी करण्यात आलेल्या अनेक तक्रारी दूर करणे हा आहे. या देशात एखादे अधिकार मंडळ अथवा समिती त्यातही संयुक्त संसदीय समिती जेव्हा काम करते तेव्हा तिला घटनादत्त धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातूनच काम करावे लागते, हे येथे लक्षात घेणे आवश्यक आहे. म्हणजे तुम्ही कितीही हिंदुत्ववादी असलात तरी तो दृष्टिकोन बाजूला ठेवत धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातूनच कार्य करणे अनिवार्य होते.

संयुक्त संसदीय समिती आपल्या अहवालात पृष्ठ क्रमांक ५ वर वक्फ सुधारणा बिल आणण्यामागील पृष्ठभूमी स्पष्ट करताना असे म्हणते की, २०१३ मध्ये पारित केलेल्या वक्फ कायद्यामुळे भारतीय समाजात काही प्रश्न निर्माण झाले होते. जवळजवळ संपूर्ण एक दशकाच्या कालावधीनंतर या प्रश्नांचे निराकरण करणे गरजेचे झाले आहे. २०१३ च्या कायद्यामुळे वक्फसंबंधी अनेक कायदेशीर विवाद निर्माण झाले. जसे की विविध वक्फचे अकार्यक्षम प्रशासन. अकार्यक्षम आणि अप्रामाणिक वक्फ प्रशासनामुळे अनेक स्तरांवर अनेक तक्रारी प्रलंबित अवस्थेत पडून होत्या. या तक्रारी प्रामुख्याने वक्फ व्यवस्थापन समितीने वर होणाऱ्या विविध व्यक्तींच्या नेमणुकी, वक्फच्या मुतावल्लींच्या नेमणुकी, विविध वक्फद्वारे आवश्यक कागदपत्रे किंवा रेकॉर्ड नीट सांभाळून न ठेवणे, कागदपत्रांमध्ये हेरफेर करणे तसेच अधिकारांचा दुरुपयोग या संबंधी होत्या. तसेच २०१३ च्या कायद्याने राज्य वक्फ बोर्डांना देण्यात आलेले अवास्तव अधिकार आणि त्यांचा दुरुपयोग नियंत्रित करणे गरजेचे झाले होते. राज्य वक्फ बोर्डावर नामनिर्देशनाद्वारे होणाऱ्या नेमणुकांमुळे राष्ट्र पातळीवरील एका संस्थेत मूठभर लोकांची एकाधिकारशाही निर्माण झाली होती. या बोर्डावर फक्त मुस्लिम व्यक्तींचीच नेमणूक करण्याच्या प्रावधानामुळे वक्फ बोर्डावर व्यवस्थापकीय कौशल्य असणाऱ्या मुस्लिमेतर व्यक्तींची नेमणूक होऊ शकत नव्हती. त्यामुळे वक्फच्या व्यवस्थापनात सुधारणा करणे दुरापास्त होऊन गेले होते. त्यामुळे व्यवस्थापन सुधारणेसाठी मुस्लिमेतर व्यक्तींची वक्फ बोर्ड आणि विविध वक्फवर नेमणूक होण्याचे प्रावधान असणे आवश्यक ठरले होते. सध्या देशातील वक्फ बोर्डाचे व्यवस्थापन इतके अकार्यक्षम झाले आहे की, देशातील कोणतेही वक्फ बोर्ड आपल्या संपत्तीचे सर्वेक्षण पूर्ण करू शकलेले नाही. काही राज्य वक्फ बोर्डांनी तर असे सर्वेक्षण सुरूही केलेले नाही. त्यामुळे मुस्लिमेतर समाजातील व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ आणि अनुभवी व्यक्तींची वक्फ बोर्डांवर नेमणूक करू शकणारे प्रावधान वक्फ कायद्यात आवश्यक झाले आहे.

आपल्या देशातील वक्फ बोर्ड व न्यायाधिकरण आपल्या अकार्यक्षमतेमुळे असून अडचणीचे तर नसून गोंधळ वाढवणारे ठरले आहे. सध्या वक्फ बोर्डाच्या पातळीवर १२,७९२ प्रकरणे तर न्यायाधिकरणाकडे फक्त जमिनीच्या मालकी हक्काशी संबंधित अशी १९,२०७ प्रकरणे सुनावणीसाठी प्रलंबित पडलेली आहेत.

जगदंबिका पाल यांच्या संयुक्त संसदीय समितीने सहा महिन्यांच्या कालावधीत विविध प्रांतांना भेटी देऊन, सर्व हितसंबंधी गटांशी चर्चा करून वक्फ कायद्यात सुधारणांची आवश्यकता अधोरेखित केली आहे. समितीने मनमोहन सिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात २००५ मध्ये स्थापित सच्चर समितीच्या अहवालातील विविध शिफारशींचा आपल्या अहवालात विचार केलेला आहे. वक्फ व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी गैर-मुस्लिम व्यक्तींचा वक्फ बोर्डावरील समावेश, स्त्री सदस्यांचा समावेश, जमीन मालकी हक्क विवादांची कार्यक्षम सोडवणूक आणि पारदर्शक कारभार, तसेच वक्फ सर्वसमावेशक होण्यासाठी या कायद्यात बदल करणे क्रमप्राप्त ठरते.

९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# विकृतीला उच्च न्यायालयाची चपराक

भारतीय अर्थात हिंदू संस्कृती सर्वांगसुंदर आहे. विज्ञानावर आधारित रूढी-परंपरांचा दैनंदिन जीवनात समावेश हे तर आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्यच. वेदांमध्ये व्यक्तीवर सोळा संस्कारांचा आग्रह केला आहे. व्यक्तीचे जीवन चांगले, संस्कारयुक्त व्हावे जेणेकरून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष अशा पायऱ्या चढत व्यक्तीला जीवनातील मर्म सापडून जीवन धन्य व्हावे, अशी अपेक्षा भारतीय जीवन पद्धतीत आहे. विवाह हा देखील हिंदू धर्मशास्त्रानुसार संस्कारच. विवाह हा पंधरावा संस्कार. विवाह म्हणजे वि वह असे म्हटले जाते. अर्थात विशिष्ट मार्गाने जीवन, कुळ, समाज वाहून नेणे असा होतो. शास्त्राला अनुसरून सहधर्माचरण, सहनशीलता, संयम, सहकार्य, निष्ठा व कर्तव्यदक्षतेचे जीवनाचरण म्हणजे विवाह, अशी मान्यता आहे. यातून उत्तम समाजधारणा आणि त्यातून राष्ट्रधारणा अनुस्यूत आहे.

संस्कार आणि परंपरा ही भारतीय संस्कृतीची ओळख. नीती आणि धर्माच्या बंधनात राहून कुटुंब, समाज आणि पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण करणाऱ्या आमच्या रूढी-परंपरा आहेत. सुदृढ व निकोप समाज व्यवस्थेसाठी जी आदर्श, जीवनमूल्ये भारतीयांना परंपरेने मिळाली आहेत, त्यात विवाह व्यवस्था आहे. भारतीयांनी विवाहाला केवळ करार अथवा उपभोगाचे साधन न मानता धर्म आणि कर्तव्य करण्यासाठीचा संस्कार मानले आहे. या संस्कारांच्या आधारावरच भारतीय समाज व्यवस्था, कुटुंब व्यवस्था भक्कम उभी आहे. नीतिमत्ताहीन, संस्कारहीन व्यक्ती, कुटुंब वा समाज हे समाजाचे अधःपतन करतात आणि पर्यायाने राष्ट्राचीही हानी करतात. नवीन पिढीत जे जे पाश्चात्त्य ते ते उत्तम ही विकृत धारणा वाढत असल्याचे दिसून येते. ही एक विकृतीच आहे. पाश्चात्त्य विचारसरणी ही स्वकेंद्रित विचारसरणी आहे. वैचारिक स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, अभिरुची स्वातंत्र्य अशा मोठ्या शब्दांआड स्वकेंद्रित जीवनशैलीचा अतिरेक पाश्चात्त्य देशात होत असल्याचे दिसून येते. एका अर्थाने हा स्वैराचारच नव्हे का? आणि असे होत असेल तर मानव आणि पशूत अंतर तरी कोणते? खरं म्हणजे भौतिकतेच्या अतिरेकातून पुढे आलेल्या अशा समस्यांवर उत्तर शोधण्यासाठी सर्व जग भारताकडे अपेक्षेने पाहात आहे. पण पाश्चात्त्यांच्या अवगुणाची लागण झालेले काही जण येथेही आढळतात हे दुर्दैवच.

उत्तराखंड उच्च न्यायालयाने अवगुणांची लागण झालेल्या अशाच एका याचिकाकर्त्याला बेशरम म्हणून फटकारले. उत्तराखंड येथे समान नागरी कायदा लागू करण्यात आला आहे. या कायद्यानुसार समाजहितासाठी आवश्यक असलेले विविध निर्बंधांची अंमलबजावणी देखील करण्यात येत आहे. त्या अंतर्गतच 'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये राहणाऱ्या जोडप्यांना आता शासनाकडे नोंदणी करावी लागणार आहे. 'लिव्ह इन'मध्ये एकत्रित राहिल्यानंतर त्यातून उद्भवणाऱ्या समस्यांबाबत दोघांपैकी कुणीही जबाबदारी स्वीकारण्यास तयार नसल्याची अनेक उदाहरणे देशात आहेत. त्यामुळे समस्या निर्माण होऊ नये आणि झाल्यास त्याची जबाबदारी निश्चित करता यावी. थोडक्यात लिव्ह इनमधील जोडप्यांना कायद्याच्या कक्षेत आणणे हा मुख्य हेतू या नोंदणीचा आहे. पण अनिर्बंध, समाजहिताची पर्वा नसलेल्या कथित स्वातंत्र्याचा हव्यास असलेली पाश्चात्त्य मानसिकतेला ही कुठलीच बंधने नको असतात. म्हणूनच जेव्हा उत्तराखंड येथे समान नागरी कायदा लागू होऊन अशा पद्धतीने नोंद करण्याचा आदेश शासनाना दिला तेव्हा या निर्णयाविरोधात एकाने उत्तराखंड उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यात त्याने ही माहिती शासनाला दिल्यास माझे खाजगी आयुष्य बाधित होते, असे म्हटले. त्यावर उच्च न्यायालयाने 'तुम्ही जंगलामधील कुठल्या दुर्गम गुहेमध्ये नाही तर समाजामध्ये राहत आहात. शेजाऱ्यापासून समाजातील विविध घटकांना तुमचे नाते संबंध माहीत आहेत. तुम्ही विवाहाशिवाय राहत आहात. मग लिव्ह इनच्या नोंदणीमुळे तुमच्या गोपनीयतेचे कसे काय उल्लंघन होऊ शकते'. 'जर लग्न न करता निर्लज्जपणे एकत्र राहता तर नोंदणीमुळे खाजगी आयुष्याचे उल्लंघन कसे', असेही न्यायालयाने फटकारले. आता यासंदर्भातील पुढील सुनावणी १ एप्रिल रोजी होणार आहे. पण न्यायालयाने जे आक्षेप नोंदविले, ज्या भावना व्यक्त केल्या त्या देशातील सामान्यजनांच्या मनातील भावना आहेत. केवळ उपभोग हीच वृत्ती असणारे, पाश्चात्त्य विचारसरणीचे अंधानुकरण करणारी जमात समाजासमोर नानाविध प्रश्न उभे करीत आहेत. पण आता त्यांना देखील कायद्याच्या कक्षेत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जे निश्चितच अभिनंदनीय आहेत. सोबतच अनादीकाळापासून होत असलेल्या संस्काराची घट्ट असलेली वीण आणखी मजबूत करण्यासाठी समाजाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# भाजपाशासित राज्यांची संख्या दीड डझनावर

दिल्लीत गुरुवारी भाजपाचे सरकार सत्तारूढ होत असल्यामुळे देशात भाजपा तसेच रालोआशासित राज्यांची आणि केंद्रशासित प्रदेशांची संख्या १९ होणार आहे. असे करत भाजपाने काँग्रेसच्या एका विक्रमाची बरोबरी केली. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना देशातील १९ राज्यांत काँग्रेसची सरकारे होती. हिमाचलप्रदेश आणि झारखंडमध्ये भाजपाचे सरकार आले असते तर भाजपाला हा विक्रम मोडता आला असता.

या १९ पैकी चारपाच राज्यातच भाजपाच्या मित्रपक्षांचे मुख्यमंत्री आहेत, देशातील उर्वरित १४ राज्यांत भाजपाचे मुख्यमंत्री आहेत, भाजपाच्या दृष्टीने ही मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. २०१४ नंतर देशातील बहुतांश राज्यांत भाजपा वा भाजपाच्या मित्रपक्षांची सरकारे आली आहेत. याचे निर्विवाद श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कुशल नेतृत्वाला आणि लोकप्रियतेला द्यावे लागेल.

बिहारमध्ये जदयु आणि भाजपा युतीचे सरकार आहे, तिथे जदयुचे नितीशकुमार मुख्यमंत्री आहेत. आंध्रप्रदेशात तेलगू देसम या भाजपाच्या मित्रपक्षाचे चंद्राबाबू नायडू मुख्यमंत्री आहेत. मेघालय आणि नागालॅण्डमध्येही भाजपाच्या मित्रपक्षाचे सरकार आहे. आतापर्यंत मणिपूरमध्ये भाजपाचे सरकार होते, पण मुख्यमंत्री एन. बिरेनसिंह यांनी राजीनामा दिल्यामुळे सध्या तेथे राष्ट्रपती राजवट लावण्यात आली आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर म्हणजे मोदी सरकार तिसऱ्यांदा सत्तेवर आल्यानंतर ८ राज्यांत विधानसभांच्या निवडणुका झाल्या यातील पाच राज्यांत भाजपा आणि मित्रपक्षांचा विजय झाला, फक्त तीनच राज्यांत काँग्रेस आणि अन्य मित्रपक्ष विजयी झाले. ओडिशा, हरयाणा, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि अरुणाचल प्रदेशमध्ये भाजपा आणि मित्रपक्षांचे सरकार स्थापन झाले. सिक्कीम, झारखंड आणि जम्मू काश्मीरमध्ये विरोधी पक्षांचे सरकार आले. मात्र यातही वैशिष्ट्य म्हणजे या तीनपैकी एकाही राज्यात काँग्रेसचे सरकार स्थापन होऊ शकले नाही. झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचे तर जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचे सरकार स्थापन झाले. हे दोन्ही पक्ष काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीचा भाग आहे. मात्र झारखंडमध्ये झामुमोचे तर जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचे सरकार येण्यात काँग्रेसचे कोणतेही योगदान नाही. झारखंडमध्ये झामुमोचे हेमंत सोरेन तर जम्मू-काश्मिरात नॅशनल कॉन्फरन्सचे उमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाचे ते यश म्हटले पाहिजे. महाराष्ट्रात भाजपा तसेच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन मित्रपक्षांचे सरकार असले तरी मुख्यमंत्री भाजपाचा आहे. त्या अर्थाने महाराष्ट्रातील सरकार हे भाजपाच्या नेतृत्वातील रालोआचे आहे. देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रात भाजपा स्वबळावर बहुमताच्या जवळ पोहोचली आहे. उत्तर भारतातील बहुतांश हिंदीभाषिक राज्यांत भाजपाची सरकारे आहेत. गोवा, आसाम, ओडिशा, त्रिपुरा, मणिपूर, मिझोराम, हरयाणा, गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, उत्तरप्रदेश आणि अरुणाचल प्रदेश या राज्यात भाजपाची सत्ता आहे, आणि या राज्यांत भाजपाचे मुख्यमंत्री आहेत. नुकत्याच झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाने आपकडून सत्ता हिसकवत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. दिल्लीत भाजपाचा हा विजय अनेक अर्थांनी ऐतिहासिक आहे, कारण भाजपाला दिल्लीत २७ वर्षांनंतर सत्तेवर येण्याची संधी मिळाली आहे. गोव्यात डॉ. प्रमोद सावंत मुख्यमंत्री आहेत. आसाममध्ये हेमंता बिस्व सरमा, ओडिशात मोहनचरण मांझी, त्रिपुरात माणिक साहा, हरयाणात नायबसिंह सैनी, गुजरातमध्ये भूपेंद्र पटेल, राजस्थानमध्ये भजनलाल शर्मा, मध्यप्रदेशात मोहन यादव, छत्तीसगडमध्ये विष्णूदेव साय, उत्तराखंडमध्ये पुष्करसिंह धामी आणि उत्तरप्रदेशात योगी आदित्यनाथ मुख्यमंत्री आहेत. मेघालयमध्ये नॅशनल पीपल्स पार्टीचे कॉनरॉड संगमा मुख्यमंत्री आहे. नॅशनल पीपल्स पार्टी हा रालोआचा घटक पक्ष आहे. नॅशनलिस्ट डेमोक्रेटिक प्रोग्रेसिव्ह पार्टीचे निफ्यू रियो हे नागालॅण्डचे मुख्यमंत्री आहेत, हा पक्षही रालोआत आहे.



सिक्कीम क्रांतिकारी मोर्चाचे प्रेमसिंग तमांग हे सिक्कीमचे मुख्यमंत्री आहेत. राज्यातील विधानसभा निवडणुकीपर्यंत राज्यात भाजपा आणि सिक्कीम क्रांतिकारी मोर्चांची युती होती. मात्र विधानसभा निवडणुकीत ती तुटली. मात्र राष्ट्रीय पातळीवर अजूनही हा पक्ष रालोआचा भाग आहे. देशात भाजपानंतर राज्यातील सत्तेच्या बाबतीत दुसऱ्या स्थानावर काँग्रेस आहे. मात्र या दोन पक्षांत खूप अंतर आहे. भाजपाची सत्ता १४ राज्यांत तर काँग्रेसची फक्त तीन राज्यांत आहे. तेलंगणा, कर्नाटक आणि हिमाचल प्रदेश या देशातील फक्त तीनच राज्यांत सध्या काँग्रेसची सत्ता आहे. तेलंगणात रेवंत रेड्डी, कर्नाटकात सिद्धरामय्या, तर हिमाचल प्रदेशमध्ये सुखविंदरसिंग सुक्खू हे काँग्रेसचे मुख्यमंत्री आहे. झारखंडमध्ये झामुमोचे हेमंत सोरेन तर जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचे उमर अब्दुल्ला मुख्यमंत्री आहेत. माकपचे पिनाराई विजयन्? केरळचे मुख्यमंत्री आहेत. द्रमुकचे एम. के. स्टॅलिन हे तामिळनाडूचे मुख्यमंत्री आहेत. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आहेत.

२०२५ च्या सुरुवातीला दिल्लीची निवडणूक झाली तर अखेरीस बिहार विधानसभेची निवडणूक होणार आहे. २०२६ मध्ये आसाम, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या पाच राज्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. यातील आसाम आणि पुद्दुचेरी या दोन राज्यांत भाजपाचे सरकार आहे. केरळमध्ये डाव्या आघाडीचे, तामिळनाडूत द्रमुकचे तर पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे सरकार आहे. २०२७ मध्ये गोवा, पंजाब, मणिपूर, गुजरात, उत्तराखंड आणि उत्तरप्रदेश अशा सहा राज्यांत विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या आधी २०२८ मध्ये कर्नाटक, तेलंगणा, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि हिमाचल प्रदेशसह एकूण दहा राज्यात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. देशात एक देश एक निवडणूक यावर गांभीर्याने विचार सुरू आहे.

एक देश एक निवडणूक ही संकल्पना २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून प्रत्यक्षात आणणे शक्य झाले नाही तर २०२७ आणि २०२८ मध्ये विविध राज्यांतील विधानसभा निवडणुका त्यांच्या निर्धारित कार्यक्रमाप्रमाणे होतील, हे निश्चित. तसे झाले तर देशातील भाजपाशासित राज्यांची संख्या आणखी वाढू शकते, ती दोन डझनाच्यावर जाऊ शकते, यात शंका नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### कुंभमेळ्यात भाविकांकडून संयमाची आवश्यकता


कुंभमेळ्याला आरंभ होऊन आता जवळपास एक महिना पूर्ण झाला. आतापर्यंत जवळपास पन्नास कोटींपेक्षा जास्त भाविकांनी त्रिवेणी संगमात स्नान केले आहे. यात सामान्य जनता, नेते, अभिनेते, उद्योगपती, विदेशी मंडळी यांना पुण्य लाभले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात कोणताही कार्यक्रम नियोजित रूपाने घेणे अत्यंत अवघड आहे. त्याकरिता मुख्यमंत्री योगी व त्यांच्या चमूचे, प्रयागराजच्या जनतेचे, सामाजिक संस्थांचे व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सतत मदत करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खूप खूप अभिनंदन.

कुंभमेळ्यादरम्यान एक दोन दुर्दैवी घटना घडल्या. यात प्रयागराजला व दिल्लीला झालेली चेंगराचेंगरी, आग अशा घटनांचा समावेश आहे. प्रयागराज व इतर रेल्वे स्टेशनवर अद्याप खूप गर्दी आहे. तेथील अधिकारी वर्ग तत्पर असावे व आपल्या पातळीवर योग्य निर्णय घेऊन योग्य नियोजन करावे. जेणेकरून लोकांचा प्रवास सुखकर होईल. त्याकरिता अधिकच्या ट्रेन चालवाव्या. जनरलचे अधिकचे डबे जोडावे. आज जागा मिळत नाही म्हणून प्रवासी स्लीपर, एसीमधे घुसून प्रवास करीत आहेत. ज्यांनी स्लीपर, एसीमध्ये आधीपासून आरक्षण केले आहे, त्यांना त्रास होत आहे. कुंभमेळ्यात लोकांचा संयम व भक्ती प्रचंड आहे, हे पाहून मनाला खूप समाधान वाटते.

**प्रमोद वाडी**/९५६१७०११७२

### महाशिवरात्री व्रताचे महत्त्व

भगवान शिवरात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतात. तो काळ पृथ्वीवर वर्षातून एकदा महाशिवरात्र म्हणून साजरा केला जातो, कारण पृथ्वीवरील एक वर्ष म्हणजे स्वर्गलोकातील एक दिवस. पृथ्वी आणि उच्चलोकांतील कालमानात अंतर आहे. पृथ्वी जड (स्थूल) आहे. जडाची गती खूप कमी असते. म्हणजेच जडाला ब्रह्मांडात प्रवास करण्यास जास्त वेळ लागतो. देवता सूक्ष्म असल्याने त्यांची गती जास्त असते. त्यामुळे त्यांना ब्रह्मांडात प्रवास करण्यास जास्त वेळ लागतो. देवता सूक्ष्म असल्याने त्यांची गती जास्त असते. त्यामुळे



त्यांना ब्रह्मांडात प्रवास करण्यास कमी वेळ लागतो.

महाशिवरात्रीच्या दिवशी शिवाची उपासना करण्यामागील शास्त्र याप्रमाणे आहे. शिवाच्या विश्रांतीच्या वेळी शिव ध्यानावस्थेतून समाधी-अवस्थेमध्ये जातात. शिवाची समाधी-अवस्था म्हणजे शिवाने स्वत:साठी साधना करण्याचा काळ. त्यामुळे विश्वातील किंवा ब्रह्मांडातील तमोगुण किंवा हलाहल त्यावेळी शिव-तत्त्व स्वीकारत नाही. त्यामुळे ब्रह्मांडामध्ये हलाहलाचे प्रमाण प्रचंड वाढते किंवा वाईट शक्तींचा दाब प्रचंड वाढतो. त्याचा परिणाम आपल्यावर होऊ नये म्हणून जास्तीत जास्त शिव-तत्त्व आकृष्ट करणारी बिल्वपत्रे, पांढरी फुले, रुद्राक्षांच्या माळा इत्यादी शिवपिंडीवर अर्पण करून वातावरणातील शिव-तत्त्व आकृष्ट केले जाते.

महाशिवरात्री व्रताचे दोन प्रकार आहेत - काम्य आणि नैमित्तिक. उपवास, पूजा आणि जागरण ही महाशिवरात्र व्रताची तीन अंगे आहेत. माघ कृष्ण त्रयोदशीला एकभुक्त राहावे. चतुर्दशीच्या दिवशी सकाळी महाशिवरात्र व्रताचा संकल्प करावा. सायंकाळी नदीवर किंवा तळ्यावर जाऊन शास्त्रोक्त स्नान करावे. भस्म आणि रुद्राक्ष धारण करावे. प्रदोषकाळी शिवाच्या देवळात जावे. शिवाचे ध्यान करावे. मग षोडशोपचार पूजा करावी. भवभवानीप्रीत्यर्थ तर्पण करावे. शिवाला एकशे आठ बेलाची पाने नाममंत्राने वाहावीत. मग पुष्पांजली अर्पण करून अर्घ्य द्यावे.

**शंकर कुळकर्णी** /९७६४४६५५७०

### कॉटन कँडीवर बंदी घालावी

कॉटन कँडीमध्ये कॅन्सरला कारणीभूत ठरणारे रोडामाईन - बी केमिकल असल्याची पुष्टी झाल्याने तामिळनाडू सरकारने कॉटन कँडीच्या विक्री आणि उत्पादनावर बंदी घातली आहे. कॉटन कँडी हा पदार्थ लहान मुलांमध्ये खूप लोकप्रिय आहे. त्यामुळे तो सर्वत्र विकला जातो. मात्र तामिळनाडूच्या अन्न सुरक्षा पथकाने कॉटन कँडीचे नमुने तपासले असता त्यात कॅन्सरला कारणीभूत ठरणारे रोडामाईन - बी केमिकल असल्याचे समोर आले. रोडामाईन - बी हे पाण्यात विरघळणारे केमिकल आहे. चमकदार गुलाबी रंगासाठी ओळखले जाणारे हे केमिकल माणसांसाठी विषारी आहे. माणसांच्या शरीरात प्रवेश केल्याने पेशी व आणि ऊतींवर ऑक्सिडेटिव्ह ताण येऊ शकतो. तेव्हा ते अन्न उत्पादनांमध्ये मिसळले जाते तेव्हा कालांतराने कॅन्सर आणि ट्युमरचा धोका होतो त्यामुळेच तामिळनाडू सरकारने कॉटन कँडीच्या विक्री आणि उत्पादनावर बंदी घातली आहे. महाराष्ट्र सरकारनेही आपल्या राज्यात कॉटन कँडीच्या विक्री व उत्पादनांवर बंदी घालावी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### एसटी प्रवाशाची बॅग चोरून ७५ हजारांचा लॅपटॉप चोरीस

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
एस टी बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशाची बॅग चोरून चोरट्याने ७५ हजार रुपये किंमतीचा लॅपटॉप चोरून नेला.याबाबत विनाद लक्ष्मीपुत्र मनी (वय २९, रा. दुधनी, ता. अक्कलकोट) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी विनोद मनी हे पुणे ते तुळजापूर या शिशाही बसमधून प्रवास करीत सोलापूरला आहे. त्यावेळी इंदापूर ते जुना तुळजापूर नाका दरम्यान चोरट्याने मनी यांची वापरते कपडे व लॅपटॉप असलेली बँग चोरून नेली. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.



### अडीच लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
अडीच लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह दोघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आसमा अरबाज नदाफ (वय २२, रा. एस ४, कन्नी नगर, दहिटणे, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती अरबाज नदाफ, सासू चाँदबी नदाफ (रा. सय्यद नगर, हडपसर, पुणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ ऑक्टोबर २०२२ ते १८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत आसमा या सासरी नांदण्यात होत्या. त्यावेळी पती अरबाज व सासू चाँदबी यांनी आसमाचा शारीरीक व मानसिक छळ केला. आसमांला मारहाण करून गादी कारखाना टाकण्यासाठी अडीच लाख रुपये आण, नाही तर तुला नांदविणार नाही अशी धमकी देऊन तिचा जाचहाट केला आहे. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साळुंखे पुढील तपास करीत आहेत.



### सिध्देश्वर पेठेतून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
शहरातील सिध्देश्वर पेठेतून चोरट्याने १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत विनायक रविकांत निकते (वय ३९, रा. जवळकर वस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनायक निकते यांनी त्यांची एमएच १३ एआर ८२७१ क्रमांकाची दुचाकी ही २६ जानेवारी रोजी सिध्देश्वर पेठेतील पंचकट्ट्याशेजारी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार कटारे पुढील तपास करीत आहेत.

### तोल जाऊन पडल्याने बांधकाम कामगार जखमी

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
अदिर वस्ती येथे बांधकाम करताना तोल जाऊन पडल्याने कामगार जखमी झाला. हा प्रकार १५ फेब्रुवारी रोजी ३.३० वाजता घडला. राजू सदा बनसोडे (वय ४८ रा. आहेरवाडी ता. दक्षिण सोलापूर) हा कामगार जखमी झाला. राजू यांना आहेरवाडी येथील खासगी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे.

### रेल्वेतून पडून अनोळखी प्रवाशाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
हॉस्पेट एक्सप्रेस (गाडी नं.११४१५) मधून प्रवास करीत असताना, सोलापूर रेल्वे स्टेशनच्या प्लॅट फॉर्म क्र.२ वर वाडीच्या बाजुला पडून अनोळखी प्रवाशाचा मृत्यू झाला. हा अपघत १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.२० वाजता घडला. डोक्याला मार लागल्याने जखमी झालेल्या अज्ञात प्रवाशाला उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल केले होते. उपचारा दरम्यान बुधवारी सकाळी ८.४५ वाजता त्याचा मृत्यू झाला. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### वाहनाने कट मारल्याने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
अरळीहून मुस्तीकडे जाताना अरळीपासून १ कि.मी. अंतरावर अज्ञात वाहनाने कट मारल्याने खाली पडून दुचाकीस्वार जखमी झाला. राहूल आकाश सुतार (वय ३४ रा. अरळी ता. अक्कलकोट) असे जखमीचे नाव आहे.हा अपघात बुधवारी सकाळी ९.३० वाजता घडला. राहूल सुतार यांना पत्नी मंगल सुतार यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### कोंडी तांडा येथे मोटारसायकलला धडकून बालिका जखमी

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी तांडा येथे राहत्या घरा जवळ खेळताना, शेजारील मुलाने ढकलल्याने रस्त्यावरून जाणाऱ्या मोटारसायकलला धडकून बालिका जखमी झाली. हा प्रकार १८ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता घडला. प्राची संजय राठोड (वय ५ वर्षे) असे जखमी झालेल्या बालिकेचे नाव आहे. तिला आई संगिता राठोड यांनी उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे.

### गवताच्या आगीचा भडका उडून एकजण जखमी

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
उत्तर सोलापूर तालुक्यातील अकोलेकाटी येथील शिवारात स्वत:च्या शेतात बांधावरील गवत जाळताना, अचानक भडका उडून अंगावरील कपडे पेटल्याने एकजण जखमी झाला. बाळासाहेब खराडे (वय ५५) हे जखमीचे नाव आहे. हा प्रकार १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता घडला. बाळासाहेब यांना उपचारासाठी डॉ. अजिंक्य दुपारगुडे यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# संशयावरुन मेव्हुण्यांकडून भावजीला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
कौटुंबिक वादावादीत सासू व सासऱ्यांना पाठींबा देणाऱ्या भावजीला मारहाण केल्याप्रकरणी ३ मेव्हुण्यांसह सात जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहम्मद उस्मान मोहम्मद इक्बाल नदाफ (वय ३४, रा. सहारा नगर भाग २, प्लॉट नं. १, होटगी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अब्दुल रशिद नदाफ, सोहेल रशिद नदाफ, फिरोज रशिद नदाफ, तौसिफ रशिद नदाफ (रा. मदनी नगर, सैफुल, सोलापूर), इम्तीयाज नौशाद नदाफ, अदनान शेख (रा. फॉरेस्ट, सोलापूर), शाहीद दस्तगीर नदाफ (रा. सहारा नगर भाग १, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मोहम्मद उस्मान नदाफ याचे अब्दुल नदाफ, सोहेल नदाफ, फिरोज नदाफ, तौसिफ नदाफ हे मेव्हुणे आहेत. मोहम्मद उस्मान नदाफ याचे सासू व सासऱ्याचा कौटुंबिक कारणावरून वाद सुरु आहे. या वादात मोहम्मद उस्मान नदाफ हे सासू व सासऱ्यांना पाठींबा देत असल्याचा संशय त्यांचे मेव्हुणे ब्दुल नदाफ, सोहेल नदाफ, फिरोज नदाफ, तौसिफ नदाफ यांना आहे. यामुळे या सर्वांचा मोहम्मद उस्मान याच्यावर राग आहे. या रागातून त्यांच्यात मतभेद आहेत. या रागातूनच ३१ जानेवारी रोजी सायंकाळी मोदी कब्रस्थानजवळ अब्दुल नदाफ व इतरांनी मोहम्मद उस्मान यास मिळून लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. त्यामुळे याबाबत सद बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

मनोरमा परिवार अंतर्गत
ट्वीन सिटी अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर
विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर
ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना
९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना
अधिक महितीसाठी संपर्क : ०२१७२३०३३१२
दिपक सुरवसे, चेअरमन (९१७५१८३६९९)
नितीन भोसले, व्हा. चेअरमन (९८८१५१५५३३)
दिपमाला जाधव, व्यवस्थापिका (मो.८३२९२८७३१२)



## बुर्ला महाविद्यालयात शिवजयंती

**सोलापूर दि. १९ फेब्रवारी-**
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक यक्कलदेवी यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या प्रसंगी प्राध्यापक डॉ. अँनी जॉन, प्राध्यापक डॉ. शिवानंद भांजे, प्रा. सुरेखा बत्तुल, प्रा. डॉ. टी.एन. शिंदे, प्रा. डॉ. पंचप्पा वाघमारे, प्रा.डॉ. टी .व्ही. शिंदे, प्रा. डॉ. शंकर राजे प्राध्यापक डॉ. रंजना बनसोडे प्राध्यापक ग्रंथपाल सविता मल्लाडे, प्रा. उमाशंकर नादरगी, प्रा.डॉ. देरेप्पा बताले, प्रा. श्रीनिवास गुंडली, प्रा. विकास शिंगे, प्रा. संपदा जिंदम, प्रा. यमुना द्यावपल्ली, प्रा. निर्मला कर्रे, प्रा. गायत्री बेनगिरी, प्रा. वैष्णवी मद्राल, प्रा. विद्या बिर्रू, आदी उपस्थित होते.

## शासकीय मदत मिळवून देणारे आरोग्यमित्र बेमुदत संपावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी**
सर्वसामान्य आणि गरजू नागरिकांना विविध योजना अंतर्गत शासकीय मदत मिळवून देणारे आरोग्य मित्र सोलापुरात बेमुदत संपावर गेल्याने रुग्णसेवेचे तारांबळ उडाले आहे. विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी जिल्हा परिषदेसमोर आरोग्य मित्रांनी आंदोलन सुरू केले आहे.

सिटू संलग्न महाराष्ट्र राज्य आरोग्य कर्मचारी संघटनेच्या वतीने एकत्रित आयुष्यमान प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या आरोग्य मित्रांनी मंगळवारपासून ते मुदत संपाला सुरुवात केली आहे. आरोग्य मित्रांना दरमाह २६००० रूपये वेतन देण्यात यावे व पेन्शन तथा महागाई भत्ता देण्यात यावा, दरवर्षी १० टक्के वाढ




करण्यात यावे, प्रवास भत्ता देण्यात यावे, विविध कारणांसाठी रजा व सुट्या लागु करावे, ई-एस-आय. सी. मधील त्रुटींची पुर्तता लवक करावे, २०१२ पासुन अनुभव सर्टीफीकेट देण्यात यावे,आयुष्यमान भारत प्रधान मंत्री जनआरोग्य योजनेचे काम करणाऱ्या आरोग्यमित्रांना नेमणूक पत्र मिळावे, इतर जिल्हयात बदलीचे धोरण रद्द करावे , रमेश पंडीत वैसाणे यांना पुर्ववत कामावर रूजु करून घेण्यात यावे,अशा मागण्यांसाठी आरोग्य मित्रांकडून बेमुदत संप सुरू आहे.

# आस्था रोटी बँकेच्यावतीने शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
आस्था फाऊंडेशनच्या आस्था रोटी बँकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या जयंतीनिमित्त प्र. ६ अ येथील दमाणी नगर मूकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप तसेच सिध्देश्वर नगर येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर घेऊन व शिबीरात मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांना आस्थाच्या वतीने मोफत आपरेशन करुन शस्त्रक्रिया करुन दिली जाणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे



म्हणून जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी अभियंता संजय धनशेट्टी, राजू हौशेट्टी, सुरज रघोजी, मुख्याध्यापिका क्षितीजा गाथाडे यांच्या हस्ते महाराज्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मोफत डोळे तपासणी शिबिर व मोतीबिंदू ऑपरेशन मोफत या कार्यक्रमांमध्ये बसवराज हनुमंत पाटील यांच्या हस्ते महाराजांचे पूजन करण्यात आले. यावेळी १९० लोकांना तपासणी करण्यात आले तर मोतीबिंदूचे ६३ ऑपरेशन करण्यात येणार आहे. यावेळी विजय छंचुरे, निलिमा हिरेमठ ,कांचन हिरेमठ, छाया गंगणे, निता आक्रुडे, अविनाश माचरला, लक्ष्मीबाई पुजारी जिल्हा परिषद रिटार्यड अगंणवाडी परिवेक्षका सुमित्रा स्वामी चराटे, लक्ष्मी कुलकर्णी यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन छाया गंगणे केले तर



## ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**
ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत बालविकास मंदिरच्या संस्थापिका कै. आ. अवंतिकाबाई केळकर यांचा स्मृतिदिन, छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. प्रस्ताविकात अध्यापिका निलिमा पट्टणशेट्टी यांनी कै. आ. अवंतिकाबाईच्या कार्याची माहिती दिली. १९५५ साली अवंतिकाबाईनी सोलापुरात शिशु शिक्षणाची सुरुवात केली. शिवजयंतीच्या कार्यक्रमात प्रशालेतील विद्यार्थ्यांनी शिव इतिहास जागा केला. इ.५ वी व ६ वी च्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजीराजांचे मावळे या विषयावर कथाकथन सादर केले. इ. सातवीतील विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे वैशिष्ट्य तर इ.८ वीतील विद्यार्थ्यांनी महाराजांच्या महत्त्वाच्या मोहिमांबद्दल माहिती सांगितली. इ.९वीतील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची गुणवैशिष्ट्ये सांगितली. अध्यापकांच्या वतीने प्रशालेतील अध्यापक व्यंकट हुरचनाळे यांनी शिवरायांची गुणसंपदा मांडली.न्यायप्रियता, दूरदृष्टी, कार्यतत्परता, प्रजाहिताचा विचार, हे गुण महाराजांच्या ठायी होते. हे त्या त्या प्रसंगांचा दाखला देऊन सांगितले. कर्तव्यदक्ष, न्यायप्रिय, कुशल संघटक, प्रजाहिताचा विचार हे त्यांचे गुण त्यांना आदर्श राज्यकर्ता ठरवतात, असे सांगितले.

## जिजामाता प्राथमिक शाळेत वीरगीत व सांस्कृतिक कार्यक्रमाने शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ फेब्रवारी-**
महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे सोलापूर संचलित जिजामाता प्राथमिक शाळा तुळशीदासनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त वीरगीत व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश्वर कदमतर प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलू , कोंडी ग्रामपंचायत सदस्या सुप्रियाताई भोसले, बालवर्ग प्रमुख सुरेखा नान्नजकर उपस्थित होत्या. यावेळी बाल मंदिर व प्राथमिक शाळेतील मुलांमुलींनी पाळणा गीत,वीरगीत, पोवाडा, शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाट्यछटा, शिवगर्जना, राजमुद्रा गायन, भाषण सादर केले. प्रारंभी शिवप्रतिमेचे पूजन करुन आरती करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन राजश्री ढवण



यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वनमाला ग्राम, अपर्णा चव्हाण, शुभांगी पाटील, विजयकुमार राजापुरे यांनी विशेष परिश्रम घेतले. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# एसव्हीसीएस हायस्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ फेब्रुवारी-**
एस. व्ही. सी. एस. हायस्कूल एमआयडीसी येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध उपक्रमानी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक संतोषकुमार तारके यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्रशालेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज यांच्या जीवनातील विविध प्रसंगाची महती पोवाडयातून व पराक्रमाची गाथा नृत्यातून सादर केले.

इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी रोहिडेश्वरी विजयी गाथा हे नाटिका सादर केले. राजमाता जिजाऊची भूमिका अबोली क्षिरसागर व शिवाजी महाराजांची भूमिका वेदांत हुमनाबादकर यांनी साकारले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची पवार तर संस्कृती काळे हिने आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रशालेतील सर्व शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## श्री बसवेश्वर वाचनालयात शिवजयंती उत्साहात

**सोलापूर दि. १९ फेब्रुवारी-**
जुळे सोलापूर भागातील वाचकांना घरपोच सेवा देणाऱ्या श्री बसवेश्वर सार्वजनिक वाचनालयात ३९५ छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. सुरुवातीस धनश्री बेडगे हिने सर्व उपस्थितांचे स्वागत केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ऋषिकेश बेडगे हे होते. यावेळी ओम बेडगे यांनी



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास नागेश जोकार, सदाशिव बेडगे, अनुराधा बेडगे, धनश्री बेडगे, देवाश कोले आदी उपस्थित होते. संस्था सचिव सदाशिव बेडगे यांनी आभार मानले.

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व तालुका बार्शी पैकी बार्शी शहर हद्दीतील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की.

१) मिळकतीचे वर्णन :- डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु.पल हद्दीतील बिनशेती मिळकत याचा गट नं. ९४२/२/१६ याचे क्षेत्रफळ ४०७.१६ चौ.मी. असे आहे. याचे मोजमाप पुर्व बाजु- २२ मी.. दक्षिण बाजु १७.३० मी., पश्चिम बाजु- २४.४० मी. व उत्तर बाजु-१७.८० मी. आहे, यांसी चतुःसिमा पुर्वेस गट नं. ९४१ पैकी क्षेत्र, पश्चिमेस सदर गटापैकी प्लॉट नं. २० (बगीचा खुली जागा), दक्षिणेस गट नं. ९४२/२ पैकी खुली जागा व उत्तरेस - ९ मीटर रुंदीचा रस्ता, येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाचा खुला प्लॉट आतील, दगड-माती, वगैरे सर्व तदंगभूत वस्तुसह, मालकी वहिवाटीच्या हक्कासह, याचे पाणी व वागणुक उत्तर बाजुचे रस्त्याने जाते व आहे.

२) वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही श्री. समीर मदनलाल वायकुळे, सौ. शिल्पा निलेश सरवदे व श्री. कालिदास आनंदराव पाटील तर्फे कु.मु. श्री. यशवंत आनंदराव पाटील यांचे सामाईक खरेदी मालकीची मिळकत आहे. सदर मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे व सदर मिळकत त्यांचे मालकी हक्काने कब्जे वहिवाटीस आहे. वर नमुद मिळकत मालकांनी कलम १ मधील मिळकत त्यांचे कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलांना योग्य त्या बाजारभाव किंमतीस विक्री करणेची ठरवुन इसारापोटी आमचे अशिलाकडून रक्कम घेऊन तसा लेखी साठेखत/इसार पावतीचा करार केलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री मिळकत मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलाचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध. बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०८ दिवसाच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह त्यांचे विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. १८/०२/२०२५

सही/-
ॲड. श्री. केतन भारत सरवदे,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
मो. नं. ७३८५०६१७००
अशिलातर्फे ॲडव्होकेट

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# भारत विजयी सुरुवात करण्यास सज्ज

◆ **दुबई, १९ फेब्रुवारी**

आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी भारत आणि बांगलादेश यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. भारत अनेक अडचणींचा सामना करत स्पर्धेत विजयी सुरुवात करण्यास सज्ज झाला आहे.




विजेतेपदाचा प्रबळ दावेदार म्हणून असलेल्या भारतीय संघासाठी लक्ष्य गाठणे त्रासदायक आहे. दुखापतग्रस्त वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीवर भारतीय गोलंदाजी विभाग मात करू शकेल का? विराट कोहली आणि रोहित शर्मा आपल्या गौरवशाली दिवसांना परत आणू शकेल का? शुभमन गिलसारखा तरुण खेळाडू सातत्यपूर्ण कामगिरी करण्यासाठी बहु-राष्ट्रीय स्पर्धेच्या दबावाचा सामना करू शकेल का? असे अनेक प्रश्न भारतीय संघाच्या भोवती आहेत. संघ आणि वैयक्तिक दृष्टिकोनातून त्यांनी असे करणे अत्यंत आवश्यक आहे. कोहली, रोहित व अगदी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या कारकिर्दीला अवघे सहा महिने झाले असले तरी, ते उधारीवर जगत आहेत असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही, कारण न्यूझीलंड व ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पराभवामुळे निर्माण झालेले धक्के अद्याप कमी झालेले नाहीत.

कर्णधार रोहितने काही दिवसांपूर्वी इंग्लंडविरुद्ध शतक आणि कोहलीने अर्धशतक झळकावले, तर गंभीरने टी-२० व वन-डे मालिकेत अनुक्रमे ४-१ व ३-० असा विजय मिळवला. गिलने मालिकेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून कामगिरी केली, त्याने इंग्लंडविरुद्धच्या तीन वन-डे सामन्यांमध्ये दोन अर्धशतके व एक शतक ठोकले, पण चॅम्पियन्स चषकात भारतासमोर असलेले आव्हान हे घरच्या मैदानावरील आरामदायी मालिकेपेक्षा खूप वेगळे आहे.

गट अ मध्ये भारताचे प्रतिस्पर्धी असलेले बांगलादेश, पाकिस्तान व न्यूझीलंड हे संघ अलिकडेच इंग्लंडशी सामना करत असतानाही निराशाजनक दिसत होते आणि एका पराभवामुळे संपूर्ण साखळी फेरीचे समीकरण नाटकीयरित्या बदलू शकते.

**आजचा सामना**

**भारत-बांगलादेश वन-डे सामना**
**स्थळ** : दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियम, दुबई
**वेळ** : दुपारी २.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

### निवडीचे कोडे

भारत अलिकडच्या काळात वन-डे क्रिकेटचा एक मजबूत ब्रॅण्ड खेळत असला तरी, बांगलादेशचा सामना करण्यापूर्वी त्यांना काही निवडीचे कोडे सोडवायचे आहेत.

केएल राहुलच्या फलंदाजीच्या स्थानापासून सुरुवात होते. तो पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करेल, तर अक्षर पटेल सहाव्या क्रमांकावर येईल. यष्टिरक्षक-फलंदाजाने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या दोन सामन्यात सहाव्या क्रमांकावर फलंदाजी केली होती व नंतर शेवटच्या वन-डे सामन्यात पाचव्या क्रमांकावर परतला होता.

संघ व्यवस्थापन येथे सामन्याच्या परिस्थितीनुसार स्थिर राहू शकते आणि निर्णय घेऊ शकते, अशा सर्व शक्यता आहे.

तथापि, गोलंदाजीत योग्य संतुलन शोधणे हे मोठे आव्हान आहे, याचे कारण म्हणजे दुखापतीमुळे बुमराहची अनुपस्थिती. मुख्य वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीचा नवीन चेंडूचा साथीदार म्हणून अर्शदीप सिंग आणि हर्षित राणा यांच्यात नाणेफेक होईल. राणाने आतापर्यंत प्रभावी कामगिरी केली आहे आणि त्याच्यामध्ये फलंदाजांना धक्का देण्याची क्षमता आहे. अर्शदीप सिंगही वैविध्यपूर्ण गोलंदाजी करण्यात आघाडीवर आहे.

याशिवाय, भारत तीन फिरकीपटूंसह खेळण्याची शक्यता आहे, यात हार्दिक पांड्या वेगवान गोलंदाजीचा अष्टपैलू असेल. परंतु रवींद्र जडेजा आणि अक्षर यांच्यानंतर तिसरा फिरकीपटू कोण आहे, याचा संघ व्यवस्थापनाला विचार करावा लागेल. डाव्या हाताचा फिरकीपटू कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती यांच्यापैकी एकाची निवड करणे कठीण आहे.

भारताला प्रतिस्पर्धी बांगलादेश संघाच्या वस्तुस्थितीवरून दिलासा मिळू शकतो . बांगलादेशचा संघ सध्या अडचणीतून जात आहे. शाकिब अल हसनसारख्या स्टार खेळाडूंच्या अनुपस्थितीमुळे कमकुवत झाला आहे.

### प्रतिस्पर्धी संघ

**भारत** : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, क. `एल. राहुल, ऋषभ पंत, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, हर्षित राणा, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, रवींद्र जडेजा, वरुण चक्रवर्ती.

**बांगलादेश** : नजमुल हुसेन शांतो (कर्णधार), सौम्या सरकार, तन्झिद हसन, तौहीद हृदोय, मुशफिकुर रहीम, एमडी महमूद उल्ला, जाकेर अली अनिक, मेहिदी हसन मिराझ, रिशाद हुसेन, तस्किन अहमद, मुस्तफिजुर रहमान, परवेझ होसाई इमोन, नसुम हसन अहमद, तन्झीद हसन, नसुम हसन, तन्झिद रहिम. (वृत्तसंस्था)

# बाबरला मागे टाकत गिल अव्वलस्थानी

## आयसीसी वन-डे क्रमवारी

◆ **दुबई, १९ फेबुवारी**

भारताचा उपकर्णधार शुभमन गिलने बुधवारी पाकिस्तानच्या बाबर आझमला मागे टाकत आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले.

पाकिस्तान व न्यूझीलंड यांच्यातील सामन्याने कराची येथे आठ संघांच्या चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वी आयसीसीने ताजी क्रमवारी जारी केली.

भारताचा उजव्या हाताचा फलंदाज शुभमन गिलने पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमला मागे टाकत जगातील अव्वल क्रमांकाचा एकदिवसीय फलंदाज होण्याचा मान मिळविला आहे, असे आयसीसीने म्हटले आहे.

भारताने इंग्लंडविरुद्ध ३-० असा विजय मिळवलेल्या घरच्या मैदानावर झालेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत दोन अर्धशतके आणि एक शतक ठोकणारा गिल एका स्थानाने पुढे जाऊन पहिल्या स्थानावर पोहोचला आहे. बाबरच्या ७७३ गुणांच्या तुलनेत त्याचे आता ७९६ रेटिंग गुण आहेत.

भारताचा कर्णधार रोहित शर्मा ७६१ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा हेनरिक क्लासेन आणि न्यूझीलंडचा डॅरिल मिचेल अनुक्रमे चौथ्या आणि पाचव्या स्थानावर आहे.

चॅम्पियन्स चषक सुरू होण्यापूर्वी क्रमवारीत हा मोठा बदल आहे. पाकिस्तान व दुबई येथे होणाऱ्या आठ संघांच्या स्पर्धेत येत्या आठवड्यात काय घडेल याची एक मनोरंजक कथानक आहे, असे आयसीसीने म्हटले आहे.



गिलने वन-डे क्रिकेटमध्ये प्रथम क्रमांक मिळवण्याची ही दुसरी वेळ आहे. २०२३ मध्ये आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषकाच्या मध्यभागी भारताच्या फलंदाजाने बाबरला मागे टाकून अव्वल स्थान पटकावले आहे.

गिल गत काही काळात उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. अलिकडेच संपलेल्या मालिकेतील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात अहमदाबादमध्ये इंग्लंडविरुद्ध झळकावलेले शतक २५ वर्षीय शुभमनसला क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहोचवण्यासाठी पुरेसे ठरले आहे. दरम्यान, श्रीलंकेचा महेश थिक्षणाने गोलंदाजांच्या एकदिवसीय क्रमवारीत अफगाणिस्तानचा कर्णधार रशीद खानची जागा घेत पहिले स्थान पटकावले आहे.

श्रीलंकेचा संघ चॅम्पियन्स चषकामध्ये खेळणार नसला तरी, थिक्षणाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आपल्या कामगिरीमुळे अव्वल स्थान पटकावले आह. श्रीलंकेने अलिकडेच ऑस्ट्रेलियाचा २-० ने सफाया केला होता. श्रीलंकेचा फिरकी गोलंदाज ६८० रेटिंग गुणांसह, रशीद दुसऱ्या स्थानावर, नामिबियाचा बर्नार्ड स्कोल्झ तिसऱ्या स्थानावर, भारताचा कुलदीप यादव चौथ्या स्थानावर आणि पाकिस्तानचा शाहीन शाह आफ्रिदी पाचव्या स्थानावर आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### गुरजंत सिंगच्या एकमेव गोलमुळे भारताचा जर्मनीवर विजय

**भुवनेश्वर** : भुवनेश्वरमधील कलिंगा हॉकी स्टेडियमवर बुधवारी झालेल्या एफआयएच हॉकी प्रो-लीग २०२४-२५ (पुरुष) हंगामात भारताने आपला दुसरा सामना जिंकला. गुरजंत सिंगने सामन्यातील एकमेव गोल केल्याने भारत गुणतालिकेत सातव्या स्थानावर पोहोचला. मंगळवारी जर्मनीकडून ४-१ असा पराभव पत्करावा लागला होता, त्यानंतर भारताकडून हा चांगला प्रतिसाद होता. कर्णधार हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय बचावफळीने दमदार कामगिरी करत महत्त्वपूर्ण विजय मिळवला. चमकदार सुरुवातीनंतर, सामन्याच्या चार मिनिटांत भारताने आघाडी घेतली, कारण गुरजंत सिंगने सलग दोन सामन्यांमध्ये गोल केले.

राजिंदर सिंगने मनदीप सिंग गोलमध्ये टाकेल या आशेने चेंडू वर्तुळात पाठवला. मनदीपचा प्रयत्न अॅलेक्झांडर स्टॅडलरने वाचवला, परंतु जर्मन गोलरक्षकाने तो सोडलेला चेंडू दूर केला नाही. एका अचिन्हांकित गुरजंतने चेंडू रिकाम्या गोलमध्ये स्वीप करण्यासाठी आत प्रवेश केला. भारताने आघाडी वाचवण्यासाठी व जर्मन चुकांवर झेप घेण्यासाठी हाफ-कोर्ट प्रेस तैनात केला. थिस प्रिंझने आपल्या अविश्वसनीय थ्रीडी कौशल्याचे प्रदर्शन करून त्याच्या मार्करना मागे टाकले .

## पिंक लेडीज चषक फुटबॉल सामन्यासाठी भारत सज्ज

**नवी दिल्ली** : फिफा आंतरराष्ट्रीय फुटबॉल क्षेत्रात भारताचा वरिष्ठ महिला फुटबॉल संघ पुन्हा एकदा सक्रिय झाला आहे आणि शारजाह येथे होणाऱ्या पिंक लेडीज चषक २०२५ स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात जॉर्डनशी सामना करण्यासाठी भारतीय महिला फुटबॉल संघ सज्ज झाला आहे. भारतीय संघ मंगळवारी शारजाहमध्ये दाखल झाला. हा सामना अल हमरिया स्पोर्ट्स क्लब स्टेडियमवर सुरू होईल. भारत २३ आणि २६ फेब्रुवारी रोजी अनुक्रमे रशिया आणि कोरिया रिपब्लिक विरुद्ध आणखी दोन सामने खेळेल. संघासाठी हा एक संक्रमणकालीन टप्पा आहे, असे प्रशिक्षक क्रिस्पिन छेत्री म्हणाले.

## मुंबईचे माजी क्रिकेटपटू मिलिंद रेगे यांचे निधन

◆ **मुंबई, १९ फेब्रुवारी**



देशांतर्गत क्रिकेटमधील अत्यंत आदरणीय व्यक्ती असलेले मुंबईचे माजी कर्णधार व निवडकर्ता मिलिंद रेगे यांचे बुधवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले आहेत. गत रविवारी रेगे यांना येथील ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले होते आणि बुधवारी सकाळी ६ वाजता त्यांचे निधन झाले. या अष्टपैलू खेळाडूला वयाच्या २६ व्या वर्षी हृदयविकाराचा झटका आला होता,परंतु तो क्रिकेटच्या मैदानावर परतला आणि रणजी करंडकातही त्यांनी मुंबईचे नेतृत्व केले. त्यांनी १९६६-६७ व १९७७-७८ दरम्यान ५२ प्रथम श्रेणी सामने खेळले, उजव्या हाताच्या ऑफ-ब्रेक गोलंदाजाने १२६ बळी टिपलेत. त्यांनी फलंदाजीतही योगदान दिले असून २३.५६ च्या सरासरीने १,५३२ धावा केल्या. महान फलंदाज सचिन तेंडुलकरने त्यांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात रेगेच्या योगदानाचे स्मरण केले. मिलिंद रेगे सरांच्या निधनाबद्दल ऐकून दुःख झाले. ते मुंबईचे खरे क्रिकेटपटू होते ,ज्यांनी शहराच्या क्रिकेटमध्ये मोठे योगदान दिले. त्यांनी आणि इतर सीसीआय सदस्यांनी माझ्यामध्ये क्षमता पाहिली . हा माझ्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा क्षण होता, असे तेंडुलकरने एक्स वर श्रद्धांजली वाहताना लिहिले.

# उद्घाटन सामन्यात उडवले फायटर प्लेन

**खेळाडूंसह प्रेक्षक पण घाबरले**

**नेटकऱ्यांकडून जोरदार ट्रोलिंग**

◆ **कराची, १९ फेब्रुवारी**

पाकिस्तानातील कराची मैदानावर चॅम्पियन्स चषक स्पर्धेतील उद्घाटन सामना यजमान पाकिस्तान व न्यूझीलंडदरम्यान रंगला आहे. पाकिस्तानने सामना नाणेफेक जिंकून घरच्या मैदानावर प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला, पण सामन्याला सुरूवात होताना एक विनोदी किस्सा मैदानावर घडला, ज्याची समाज माध्यमावर जोरदार चर्चा सुरू आहे.

भारतात झालेल्या वन-डे विश्वचषकाच्या अंतिम सामन्यावेळी भारतीय हवाई दलाकडून फाईटर प्लेन द्वारे तिरंगी प्रदर्शन करण्यात आले होते. भारतीय हवाई दलाचे प्रदर्शन त्यावेळी समाज माध्यमावर जोरदार गाजले होते. त्याप्रमाणे २८ वर्षांनंतर होणाऱ्या आयसीसी स्पर्धेतील सलामी सामन्यासाठी पाकिस्तानच्या हवाई दलाकडूनही फाईटर प्लेन उडवण्यात आले. पण हे प्लेन पाहाताच न्यूझीलंडचे खेळाडू व पाकिस्तानचे प्रेक्षक प्रचंड घाबरले.

पाकिस्तानच्या या हवाई दलाच्या प्रदर्शनाचा व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल होत आहे. यात एक न्यूझीलंडचा खेळाडू घाबरलेला पाहायला मिळत आहेत, तर पाकिस्तानी प्रेक्षकांनी आपले कान बंद करून घेतले. पाकिस्तानला नेहमीच सुरक्षेचा मुद्यावरून डिवचले जाते. यावेळीही नेटकऱ्यांकडून डर का माहोल है म्हणत ट्रोल केले जात आहे.

चॅम्पियन्स चषकातील पहिल्याच सामन्यात न्यूझीलंडने ३५ षटकांत ३ बळी गमावत १६ धावा उभारल्या आहेत. न्यूझीलंडने सुरूवातीचे तीन फलंदाज स्वस्तात गमावले. सलामीवीर डेव्हॉन कॉनवे १० धावांवर माघारी परतला. तर केन विल्यमसनला केवळ एक धाव करता आली. तर डॅरी मिचेलही १० धावांवर बाद झाला. पण सलामीवीर विल यंगने डाव सावरला आणि संथ खेळी करत शतक पूर्ण केले. चॅम्पियन्स चषकात शतक ठोकणारा तो न्यूझीलंडचा चौथा खेळाडू ठरला. (वृत्तसंस्था)

## प्रियांक पांचाळचे शतक, गुजरातचे चोख प्रत्युत्तर

**अहमदाबाद** : रणजी करडंकाच्या उपांत्य सामन्यात केरळच्या ४५७ धावांना चोख प्रत्युत्तर देत प्रियांक पांचाळच्या दमदार शतकाच्या बळावर गुजरातने तिसऱ्या दिवशी पहिल्या डावात ७१ षटकांत १ बाद २२२ धावा उभारल्या. पांचाळच्या शानदार नाबाद शतकामुळे गुजरातला केरळच्या पहिल्या डावातील जबरदस्त धावसंख्येवर मात करण्यासाठी आणि आघाडी मिळवण्याची आशा पल्लवीत झाली. प्रियांक पांचाळ व आर्या देसाईने १३१ धावांची सलामी भागीदारी केली. देसाईने ११३ चेंडूंत ११ चौकार व एका षट्कारसह ७३ धावांचे योगदान दिले. नंतर पांचाळ व मनन हिंग्राजाने दिवस अखेरपर्यंत नाबाद खेळी करत गुजरातला १ बाद २२२ धावांचा टप्पा गाठला. पांचाळने २०० चेंडूंत १३ चौकार व एका षट्कारसह नाबाद ११७ धावांची, तर मननने १०८ चेंडूंत ३ चौकारांसह नाबाद ३० धावांची खेळी केली.

# विदर्भ २६० धावांनी आघाडीवर

## रणजी करंडक : आकाश आनंदच्या शतकानंतरही मुंबई पिछाडीवर ● वाडकर-राठोडने सावरले

◆ **नागपूर, १९ फेब्रुवारी**

यश राठोड आणि अक्षय वाडकर यांच्यातील पाचव्या गड्यासाठी ९१ धावांच्या अखंड भागीदारीमुळे विदर्भाला दुसऱ्या डावात अव्वल फळी कोसळलेल्या संकटातून बाहेर पडण्यास मदत झाली. रणजी करंडकाच्या उपांत्य सामन्याच्या तिसऱ्या दिवसाअखेर विदर्भाने मुंबईविरुद्ध दुसऱ्या डावांत ४ बाद १४७ धावा केल्या. विदर्भ संध्या २६० धावांनी आघाडीवर आहे. खेळ थांबला तेव्हा राठोड नाबाद ५९ धावांवर , वाडकर नाबाद ३१ धावांवर खेळत होते.

विदर्भाच्या पहिल्या डावातील ३८३ धावांना प्रत्युत्तर देताना मुंबईने ७ बपाद १८८ धावांवरून पुढे तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. कालचा नाबादवीर आकाश आनंदने शतक झळकावूनही मुंबईला पिछाडी भरून काढता आली नाही. मुंबईचा पहिला डाव ९२ षटकांत सर्वबाद २७० धावांवर आटोपला.



अक्षय वाडकर

आकाश आनंदने २५६ चेंडूंत ११ चौकारांसह १०६ धावांची शतकी खेळी केली व त्याने तनुष कोटियानसोबपत आठव्या गड्यासाठी ६९ धावांची भागीदारी केली. आनंदचे कारकिर्दीतील दुसरे प्रथम श्रेणी शतक ठरले.

विदर्भाकडून पार्थ रेखडेने ४ बळी, यश ठाकूर व हर्ष दुबेने प्रत्येकी २ बळी, तर दर्शन नळकांडे व नचिकेत भुतेने प्रत्येकी १ बळी टिपला. पहिल्या डावांत ११३ धावांची भक्कम आघाडी मिळवणाऱ्या विदर्भाच्या दुसऱ्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली, परंतु नंतर यश राठोड व कर्णधार अक्षय वाडकरने मुंबईच्या गोलंदाजांचा धैर्याने सामना करत विदर्भाला सुस्थितीत आणले.



यश राठोडचे अर्ध शतक

विदर्भाचे सलामीवीर अथर्व तायडे (०), ध्रुव शोरी ( १३), दानिश मालेवार (२९) व करुण नायर (६) हे पहिले चार फलंदाज लवकरच तंबूत परतले. त्यामुळे विदर्भाची २१ षटकांत ४ बाद ५६ धावा अशी स्थिती झाली होती. मात्र त्यानंतर यश राठोड व अक्षय वाडकरने आपल्या लौकीकास साजेसा खेळ केला व संघाला सुस्थितीत आणले. या दोघांनीही दिवस अखेरपर्यंत जबरदस्त फलंदाजी करत ९१ धावांची अभेद्य भागीदारी केली. यश राठोडने आपले अर्धशतक साजरे करताना १०१ चेंडूंत ४ चौकारांसह नाबाद ५९ धावांची, तर अक्षय वाडकरने १०२ चेंडूंत २ चौकारांसह नाबाद ३१ धावांची खेळी केली.

यश राठोडचे हे दुसरे अर्धशतक ठरले. डाव्या-उजव्या जोडीने विदर्भाच्या तंबूत आनंदाचे वातावरण निर्माण केले. विदर्भाला दुसऱ्या डावाची प्रारंभी हादरे देणारे शम्स मुलानी (२-५०), शार्दुल ठाकूर (१-१४) व तनुष कोटियान ( १-३३) यांना राठोड व वाडकरने भंडावून सोडले. (वृत्तसंस्था)

## मानेवर रॉड पडल्याने पॉवरलिफ्टरचा मृत्यू

◆ **बिकानेर, १९ फेब्रुवारी**

राजस्थानमधील बिकानेर शहरात झालेल्या एका दुर्दैवी घटनेत, राष्ट्रीय कनिष्ठ गट क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या महिला पॉवरलिफ्टरचा सराव दरम्यान मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत पॉवरलिफ्टरचे नाव यष्टिका आचार्य असे आहे. ती १७ वर्षांची होती. ही घटना घडली तेव्हा यष्टिका जिममध्ये वेटलिफ्टिंगचा सराव करत होती. यावेळी तिच्या मानेवर रॉड पडल्याने तिचा मृत्यू झाला. या घटनेत तिच्या प्रशिक्षकालाही दुखापत झाली. यावेळी ती २७० किलो वजनाच्या प्लेट्स बसवलेला रॉड उचलण्याचा प्रयत्न करत होती. घटनेनंतर, लगेचच तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात पोहोचल्यानंतर, डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. घटनेच्या वेळी ट्रेनर जिममध्ये यष्टिकाकडून वजन उचलण्याचा प्रयत्न करत होती. (वृत्तसंस्था)




भारत व बांगलादेश यांच्यातील आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धेच्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्याच्या तयारीसाठी बुधवारी दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, यूएई येथे कामगारांनी तिरंगा फडकवला

## आयएमएल चषक स्पर्धेत सचिन खेळणार

◆ **नवी मुंबई, १९ फेब्रुवारी**

आपल्या काळातील काही सर्वोत्तम खेळाडूंविरुद्ध स्पर्धा खेळण्यासाठी बाहेर पडणे हे महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरसाठी पदार्पणाच्या दिवसाइतकेच रोमांचक प्रसंग आहे.

त्यामुळे, सचिनला आता पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानावर उतरण्याची संधी आह. आगामी २२ फेब्रुवारी रोजी डी. वाय .पाटील स्टेडियमवर सुरू होणाऱ्या इंटरनॅशनल मास्टर्स लीग (आयएमएल) मध्ये तेंडुलकर इंडिया मास्टर्सचे नेतृत्व करणार आहे. (वृत्तसंस्था)

# निवृत्तीनंतर खेळाडूंचा आदर व्हावा : गोपीचंद

◆ **नवी दिल्ली, १९ फेब्रुवारी**

खेळाच्या काळात देशासाठी सर्वस्व समर्पित करणाऱ्या खेळाडूंना कारकिर्दीनंतरच्या काळात चांगल्या संधींची गरज आहे. खेळाडूंना त्यांच्या कारकिर्दीतून वेळ काढल्यानंतर अर्थपूर्ण भूमिकांमध्ये रूपांतरित होण्यासाठी आर्थिक स्थिरता अत्यंत महत्त्वाची आहे. निवृत्तीनंतर खेळाडूंचा आदर करण्यात यावा, असे आवाहन भारताचे मुख्य बॅडमिंटन प्रशिक्षक पुलेला गोपीचंद यांनी बुधवारी केले.

भारतात खेळ हा एक व्यवहार्य करिअर मार्ग म्हणून पाहिला जात असला तरी, हैदराबादचे ५१ वर्षीय पी. गोपीचंद यांनी एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित केला.



जे खेळाडू आपले जीवन खेळासाठी समर्पित करतात, परंतु शीर्षस्थानी पोहोचत नाहीत त्यांचे काय होते? बऱ्याच वर्षांपूर्वी, हा प्रश्न उपस्थित झाला नव्हता कारण खेळ पुरेसा मोठा नव्हता.

खेळाला व्यवसाय म्हणून स्वीकारणाऱ्या लोकांची संख्या महत्त्वाची नव्हती. पण आज, आपल्याकडे असे खेळाडू आहेत जे पूर्णपणे खेळासाठी समर्पित आहेत, जे शिक्षण घेत नाहीत.माझे आव्हान आहे की, इतर कोणत्याही व्यवसायाप्रमाणे त्यांना आदर आणि आर्थिक स्थैर्य देणाऱ्या अर्थपूर्ण भूमिकांमध्ये बसवावे, असे गोपीचंद म्हणाले.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कीर्ती मिळवणाऱ्या उच्चभ्रू खेळाडूंची चांगली काळजी घेतली जाते, परंतु जे कमी पडतात त्यांची चिंता असते.जर तुम्ही वरच्या स्थानावर पोहोचलात तर सरकार तुमची खूप चांगली काळजी घेते. ते नोकऱ्या, जमीन, पैसा देतात, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)



## ‘सुयश’च्या देशपांडेची राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० फेब्रुवारी-**

इंडियन टायगर अॅण्ड टायग्रेसेस असोसिएशन फूटबॉल क्लब म हाराष्ट्र टी.व्ही. नाईन नेटवर्क ठाणे यांच्यावतीने १२ ते १४ व १५ ते १७ वयोगटाच्या खेळाडूंच्या फूटबॉल स्पर्धेतून महाराष्ट्रातील सहा खेळाडूंची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. सुयश विद्यालयाच्या विश्वेश देशपांडे याची १४ वर्षांखालील गटात निवड झाली.

त्याची राईट विंग या प्लेससाठी निवड झाली आहे. राष्ट्रीय स्पर्धा दिल्ली येथे मार्चमध्ये होतील असे सांगण्यात आले. विश्वेश याचे वाजतगाजत स्वागत करुन संस्थापक शिवदास नलवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी दिनेश मेटकरी, मुख्याध्यापक सागर मंडलिक, तांदुळवाडीच्या सुयश विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप शिर्के, क्रीडाशिक्षक अतुल जाधव, कोच अभिजीत वाघमारे, विश्वेशची आई वसुधा देशपांडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सहशिक्षिका वर्षा साखरे यांनी केले.

# झेलेझनीच्या बदलांमुळे मी लवकरच ९० मीटरचा टप्पा गाठू शकेन : नीरज चोप्रा

◆ **नवी दिल्ली, १९ फेब्रुवारी**

आपले नवीन प्रशिक्षक जान झेलेझनी यांनी माझ्या तंत्रातील चुका शोधून काढल्या आहेत आणि आता ते माझ्या भाला फेकण्याचया दिनश्चर्येत काही बदल करतील, त्यामुळे मी लवकरच ९० मीटरचा टप्पा गाठू शकेन, असे दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा म्हणाला.

नीरज चोप्रा ९० मीटरचा टप्पा गाठण्यासाठी खूप प्रयत्न करत आहे. त्याची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ८९.९४ मीटर आहे. त्याने ही कामगिरी २०२२ मध्ये साध्य केली. त्याचा हंगाम मे महिन्यात डायमंड लीगने सुरू होतो व माजी ऑलिम्पिक व विश्वविजेता झेलेझनी यांच्याशी त्याच्या भागीदारीची स्पर्धात्मक सुरुवात होणार आहे. झेलेझनीचा विश्वविक्रम ९८.४८ मीटर असा आहे.



मी लवकरच ९० मीटरचा टप्पा ओलांडणार आहे असे मला वाटते. कारण झेलेझनी यांनी माझ्या भाला फेकण्याच्या शैलीत काही तांत्रिक बदल केले आहेत, असे चोप्रा म्हणाला.

यावेळी २६ वर्षीय नीरजने माजी टेनिसपटू हिमानी मोर हिच्यासोबतच्या आपल्या गुपचूप विवाहाबद्दल खुलासा केला. आमचे नाते सुरुवातीला एक अनौपचिराक मैत्रीचे होते, परंतु हळूहळू आम्ही प्रेमात पडलो, असे तो म्हणाला.

झेलेझनी यांनी सूचवलेले बदल मी आत्मसात केले, तर मी खूप चांगली कामगिरी करेन, मात्र हा टप्पा अजूनही देशासाठी पदक जिंकण्याइतका महत्त्वाचा नाही, असेही पानिपतचा नीरज चोप्रा म्हणाला.

मला स्वतःला ती ९० मीटरची कामगिरी करायची आहे. यापूर्वी मी ९० मीटर फेकलेल्या खेळाडूंविरुद्ध पदक जिंकले आहे हे आणखी महत्त्वाचे. त्यामुळे ९० मीटर फेकून जिंकण्यात काहीही अर्थ नाही, असे तो म्हणाला.

जर प्रत्येकाने तिथे ९० मीटर पेक्षा अधिक लांब अंतरावर भाला फेकला व ९० फेकूनही तुम्ही जिंकला नाही तर काय होईल? मला ९० मीटरपेक्षा जास्त फेकायचे आहे. मी ते करू शकतो असे सर्वांना वाटते.माःझे माजी प्रशिक्षक क्लॉस बार्टोनिएट यावर विश्वास ठेवत होते, असेही त्याने सागितले. (वृत्तसंस्था)

## पहिल्या फेरीत बॅरेत्तिनीकडून नोवाक जोकोविच पराभूत

**दोहा** : इटलीच्या मॅतिओ बॅरेत्तिनीने कतार ओपन २०२५ टेनिस स्पर्धेत मोठा धक्का दिला. येथे हार्ड कोर्टवर खेळल्या जाणाऱ्या एटीपी ५०० सीरिज टेनिस स्पर्धेत पहिल्या फेरीच्या सामन्यात त्याने माजी प्रथम विश्वमानांकित सर्बियाच्या नोवाक जोकोविचला सरळ सेटमध्ये हरवले.

२०२३ नंतर बॅरेत्तिनीचा हा पहिलाच टॉप-१० विजय आहे. एटीपी रँकिंगमध्ये सध्या ३५ व्या क्रमांकावर असलेला आणि जानेवारी २०२२ मध्ये कारकिर्दीतील सर्वोच्च ६ वा क्रमांक मिळवणारा बॅरेत्तिनी काही चिंताग्रस्त क्षणांपासून वाचला, ज्यामध्ये पहिल्या सेटच्या सहाव्या गेममध्ये काही ब्रेक पॉइंट्सचा समावेश होता. त्यानंतर त्याने एक तास ३३ मिनिटांत ७-६ (४), ६-२ असा विजय मिळवला.



सांगोला : सांगोला नगरपरिषदमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी आस्थापनेवरील वर्ग ३ व ४ मधील ३७ कर्मचारी यांचे परिविक्षाधीन कालावधी समाप्ती आदेश आणि स्थायित्व प्रमाणपत्र मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

# अंगणवाडी सेविकासाठी ५२ तर मदतनीस पदांसाठी २९६ अर्ज दाखल

## ● बाल विकास प्रकल्प अधिकारी आतार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १९ फेब्रुवारी-**

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प माळशिरस (ग्रामीण) व प्रकल्प अकलूज (ग्रामीण) मधील अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस भरतीसाठी दि ५ फेब्रुवारी पासून अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली होती आज अर्ज दाखल करण्याच्या अखेर पर्यंत ४ अंगणवाडी सेविकासाठी ५२ अर्ज तर २८ मदतनीसपदासाठी २९६ अर्ज दाखल या भरतीसाठी महिलावर्गातून अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी केली होती

> सुरवातीस दाखल झालेल्या अर्जाची छाननी करण्यात येणार आहे.त्यानंतर पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येणार आहे.यादी तयार झाल्यानंतर दुसऱ्या तालुक्यातील कमिटी तपासणी करणार असून त्याच्या तपासणी नंतर प्राथमिक यादी प्रसिद्ध करण्यात येणार असून यावर कोणाचा आक्षेप आहे का यासाठी १० दिवसाची मुदत देण्यात येईल.कोणत्या जागेबाबत अक्षेप असेल त्याची तपासणी करण्यात येणार त्यानंतर फायनल यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.
>
> **- बालाजी अल्लडवार,**
> बाल विकास प्रकल्प अधिकारी, अकलूज.

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प माळशिरस (ग्रामीण)मध्ये धर्मपुरी १ (१७) व काळमवाडी (अवताडेवस्ती) (७) या दोन ठिकाणी अंगणवाडी सेविकाचे अर्ज दाखल ,तसेच गोरडवाडी (१२) ३),बोंडले (४), खळवे (३), धानोरे (१०), साळमुख (१०), निमगाव (२), डोंबाळवाडी (खु)(६) २),फोंडशिरस (९), मारकडवाडी (७), कदमवाडी(७),मांडवे (१५), कोळेगाव (८), नातेपुते (४५),एकाशिव (१२) या १९ जागेसाठी १४६ अर्ज दाखल. एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अकलूज (ग्रामीण) मध्ये तांबवे (१९), कोंडारपट्टा (९) या दोन ठिकाणी अंगणवाडी सेविका पदासाठी २८ अर्ज दाखल तसेच प्रतापनगर (७), अकलूज (७७), माळीनगर (२४), मिरे (३), सवतगव्हाण(५), चौंडेश्वरवाडी (१७), लवंग (१३) या ९ ठिकाणी मदतनीस जागेसाठी १४६ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती माळशिरस बाल विकास प्रकल्प अधिकारी आसमॉ आतार यांनी दिली.



# उत्कर्ष विद्यालयात शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ फेब्रुवारी-**

सांगोल्यातील उत्कर्ष विद्यालयात शिवजयंतीचा सोहळा साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी शिवजन्म सोहळा झुलवा पाळणा....बाळ शिवाजीचा....असा जयघोष करीत उत्साहात पार पडला.

इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी शिवकालीन पारंपारिक खेळ लेझीम, दांडपट्टा, घोडेस्वारी, तलवारबाजी असे मनमोहक सादरीकरण केले. चौथीच्या विद्यार्थ्यांनी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा, प्रतापगडावरील भेट व अफजलखानाचा वध तसेच इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी आग्र्याहून सुटका व गड आला... पण सिंह गेला हा नाट्य प्रसंग सादर केला. यावेळी शिक्षिका दिपाली माळी यांनी शिवरायांचे केलेल्या विविध लढाया यांची माहिती दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

> **छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ माँसाहेब, बडी बेगम, संभाजी राजे, तानाजी मालुसरे, मुघल बादशहा, अफजलखान, सय्यद बंडा, जीवा महल, शिवकन्या व विविध मावळे यांच्या वेशभूषेतील मुले सर्वांचे मन वेधून घेत होती. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, लाठीकाठी, शिवगर्जनाचे मुलांनी सादरीकरण केले.**

## संक्षिप्त वृत्त




### बंकलगी येथील हनुमान विद्यामंदिरात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**अक्कलकोट, दि. १९ फेब्रुवारी-**

श्री हनुमान विद्यामंदिर, बंकलगी या संकुलात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप सभारंभ पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आहेरवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख नागनाथ स्वामी उपस्थित होते. प्रारंभी संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षि डॉ. बापूजी साळुंखे, संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक जयप्रकाश पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागेश मदभावी, काशिनाथ कोणदे, मुख्याध्यापिका मंगरुळे, कर्णवळे उपस्थित होते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची प्रतिमा विद्यालयास भेट दिली. प्रास्ताविक आप्पासाहेब हत्तुरे यांनी केले तर सूत्रसंचालन श्रेयस पाटील यांनी केले तर पंडीत कुंभार यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अमोल भावसार, सुप्रिया जामगे, नागनाथ कोळी, चाबुकस्वार यांनी परिश्रम घेतले.



### सुराणा हायस्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**करमाळा, दि. १९ फेब्रुवारी-**

चिखलठाण (ता. करमाळा) येथील रामबाई बाबूलाल सुराणा विद्यालयातील विद्यार्थ्यांनी २२ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षेत सोळा विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत. या शिष्यवृत्ती परीक्षा १८० गुणांची असून यामध्ये उत्तीर्ण झालेला विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र होतो. विद्यालयातील ज्ञानेश्वरी सरडे (११३ गुण), महेंद्र गुंजाळ (११२), पूजा ढवळे(१०३), संकेत कामटे (९९), महेश राऊत (९८), शंभुराजे जगताप (८९ ), कांचन गहिरे (८८), गौरी सरडे (८७), श्रेयश वीर (८६), विशाखा कवितके (८२), अनुष्का जाडकर (८१), श्रेया गलांडे (७५), प्रतीक्षा सरडे (७५), समीक्षा सरडे (७३), निलेश बोराडे (७३) आणि रुद्र टिंगरे (७२) मिळवत वरील विद्यार्थ्यांनीं या परीक्षेमध्ये यश मिळवले आहे. या विद्यार्थ्यांना नववी ते बारावी अखेर प्रतिवर्षी १२ हजार रुपये प्रमाणे चार वर्षात ४८ हजारांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. जे विद्यार्थी छत्रपती राजाराम महाराज शिष्यवृत्ती(सारथी शिष्यवृत्ती) साठी पात्र ठरणार आहेत अशा विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी ९६०० रुपये प्रमाणे चार वर्षात ३८ हजार ४०० रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. परीक्षेसाठी या विभागाचे विभाग प्रमुख शिक्षक बी.टी.भोई एस.मुंडे. एल. पी.भोसले, शेंडगे, जाधव तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक वायदंडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## निधन वार्ता



### रेवणसिद्ध भादुले

**पंढरपूर, दि. १९ फेब्रुवारी -**

पंढरपूर नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष रेवणसिध्द भगवान भादुले (वय ९५) यांचे बुधवारी (दि.१८) रात्री पुणे येथे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी (दि.१९) दुपारी पंढरपूर येथील लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. (कै.) भादुले यांच्या पाठीमागे एक मुलगा, सुना,नातवंडे असा परिवार आहे. शैलेश भादुले याचे (कै.) रेवणसिध्द हे वडील होते.



### पांडुरंग गुरव-क्षीरसागर

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी -**

शिवाजीनगर बाळे येथील पांडुरंग कडप्पा गुरव-क्षीरसागर (वय ७९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. जिल्हा न्यायालय येथे वरिष्ठ लिपिक राजश्री क्षीरसागर यांचे ते वडील आहेत. त्यांच्यामागे पत्नी, मुलगी असा परिवार आहे.



### नवनाथ सोनटक्के

**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी -**

तिऱ्हे (ता .उत्तर सोलापूर) येथील नवनाथ तायाप्पा सोनटक्के (वय ७४ वर्ष ) यांचे मंगळवारी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले,दोन मुली, सुना, नातवंडे नातु असा परिवार आहे. नवनाथ सोनटक्के हे तिऱ्हे गावच्या उपसरपंच मंगल सोनटक्के यांचे पती होते तर परीट समाज संघटना सोलापूर जिल्हाध्यक्ष अजय सोनटक्के यांचे वडील होत.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घ्यावा

## ● प्रशासन अधिकारी सुयश दुसाने; कल्याणशेट्टी महाविद्यालयात शिवरायांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट : दि १९ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराजांनी अविरत परिश्रम घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. प्रशासन यंत्रणा देखील कार्यान्वित केली. त्यामुळे स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर झाले.

त्यामुळे त्यांचा आदर्श सर्वांनी घेतला पाहिजे, असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालक कार्यालय पुणे येथील प्रशासन अधिकारी सुयश दुसाने यांनी व्यक्त केले.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवजयंती निमित्त आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी होते. यावेळी प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा.राजशेखर पवार उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस आर लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन प्राध्यापिका शितल झिंगाडे- भस्मे यांनी केले तर आभार प्राध्यापिका मधुबाला लोणारी यांनी मानले. कार्यक्रमास प्रा.डॉ. बाळासाहेब पाटील, प्रा. भीम सोनकांबळे उपस्थित होते.



# अकलूज बस डेपोसाठी नवीन एसटी बस द्या

## परिवहन मंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २० फेब्रुवारी-**

अकलूज बस डेपोसाठी नवीन २० एसटी बस मिळणेसाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे शिवसेनेचे नेते राजकुमार हिवरकर पाटील यांनी केल्या असून निवेदनामध्ये म्हटले आहे की अकलूज बस डेपोच्या जुन्या झालेल्या जवळपास ४० बसेस आहेत. पूर्वी त्या शंभर वर होत्या, बसची संख्या कमी झाल्याने विद्यार्थ्यांना खेड्या गावावरून येण्यास अडचण निर्माण झालेली आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ यांची पर्यटन दर्शन वारी योजना अखंड चालू ठेवण्यासाठी बस उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. शिक्षणासाठी, रोजगारासाठी बारामतीमध्ये जाणारे हजारो विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला पुरुष एसटी बसचा वापर करतात. अपुरे असलेल्या बसच्या संख्येमुळे शिक्षण घेणे अवघड झालेले आहे.

तसेच अकलूजच्या जवळ पंढरपूर तीर्थक्षेत्र, अक्कलकोट, गोंदावले, शिर्डी, नाशिक त्रिंबकेश्वर, आदी धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी नागरिकांना बस उपलब्ध नसल्याने त्याठिकाणी जाणे शक्य होत नाही. तरी आपण निवेदनाचा सकारात्मक विचार करून अकलूज, तालुका माळशिरससाठी नवीन २० (वीस) बसेस उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी मागणी केलेली आहे

# दर्गनहळ्ळी उपसरपंचपदी विद्या बिराजदार


**वळसंग, दि. १९ फेब्रुवारी-**



दर्गनहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथील ग्रामपंचायत मध्ये ग्रामसेवक सचिन माशाळे, सरपंच अनुराधा राहुल कांबळे व युवा उद्योजक महेश बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थितीत पुनश्च उपसरपंच विद्या राजेंद्र बिराजदार यांची बिनविरोध निवड करण्यात आले. यावेळी मल्लिनाथ बिराजदार, विनोद बिराजदार, देवप्पा कोळी, वैजनाथ होनमुर्गीकर, सत्यभामा चतुर्भुज, रूपाली बिराजदार, पंकज माळी, बद्रीनाथ बिराजदार, शंकर दोडापगोळ, रामचंद्र भगतगोळ, शंकर बिराजदार, चनवीर होनमुर्गीकर, पोलीस पाटील शशिकला पाटील, संगप्पा बिराजदार, सागर माळी, श्रीशैल बिराजदार, मल्लिनाथ होनमुर्गीकर, महादेवी बिराजदार, गौराबाई बिराजदार, आयेशा बागवान उपस्थित होते.

# बार्शी बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड.गुंड

## उपाध्यक्षपदी गोवेकर तर सचिवपदी पाटील



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ फेब्रुवारी-**

बार्शी बार असोसिएशन वार्षिक पदाधिकारी निवडणूक अतिशय अटीतटीची होवून त्यात सन २०२६-२६ साठी अध्यक्ष म्हणून ॲड. रणजित गुंड, उपाध्यक्षपदी ॲड. विशाल गोवेकर तर सचिवपदी ॲड. अक्षय पाटील यांची निवड झाली.

उमेदवारांना मिळालेली मते खालीलप्रमाणे- अध्यक्षपद- ॲड. रणजीत गुंड १९५, ॲड. संजय साखरे ११७, ॲड. रणजीत गुंड ७८ मतांनी विजयी. उपाध्यक्षपद- ॲड. विशाल गोणेकर १२४, ॲड.वैभव देशमुख १०५, ॲड. संभाजी गलांडे ६६, ॲड. सुकुमार खामगावकर १२ मते. उपाध्यक्षपदासाठी ॲड. विशाल गोणेकर १९ मतांनी विजयी. सचिवपद ॲड. अक्षय पाटील १२४, ॲड. दत्तप्रसाद घोगरे ९७, ॲड. इकबाल पठाण ६७, सचिवपदासाठी ॲड अक्षय पाटील २६ मतांनी विजयी. लायब्ररी चेअरमनपद ॲड अमोल अलाट २०४, ॲड. प्रशांत घोडके ९४. खजिनदार पदासाठी ॲड. सुरज जामदार १८२, ॲड. अक्षय बिडबाग १०७ मते. यापूर्वीच मॅनेजिंग कमिटी सदस्य म्हणून ॲड. रवींद्र वैद्य, ॲड. नितीन शिंदे व महिला सदस्य म्हणून ॲड. योजना घोलप यांची बिनविरोध निवड झालेली आहे. या निवडणुकीत ॲड.सुनील कुलकर्णी मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी व ॲड. हर्षवर्धन बोधले व ॲड. ज्योतिर्लिंग नवले यांनी सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. निवडणूक पार पाडण्यासाठी राजाभाऊ देवकते यांनी सहकार्य केले.

# शिवरत्न स्कूलचा ‘शिवरत्न उत्सव’ उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ फेब्रुवारी-**

शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात स्मृती भवन, अकलूज या ठिकाणी पार पडले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून चित्रपट निर्माता व दिग्दर्शक इंटरनॅशनल फालमफोक प्रा. धीरज गुरव उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद यशवंत नगरचे माजी केंद्रप्रमुख विठ्ठल नष्टे उपस्थित होते.

त्याचप्रमाणे मंचावर जिल्हा परिषद यशवंतनगर केंद्रप्रमुख महादेवी गुंड, दत्तात्रय



लिके, नितीन बनकर, स्कूलचे चेअरमन रामकृष्ण काटकर, हनुमंत भोसले, शिवदत्त नारायणकर, शंकर गायकवाड, शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश स्कूलचे प्रिन्सिपल अल्बर्ट थरक्कन, बिनो पावलोसो, राजकिरण माने, घुले उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते कै. शंकरराव मोहिते-पाटील आणि कै. रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या प्रतिमेचे तसेच नृत्याची देवता नटराज मूर्तीचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रास्ताविक मुख्याध्यापक जितेंद्र माने-देशमुख यांनी केले. प्रशालेमध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ज्युनिअर केजी ते सातवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी बहारदार गाण्यांवर नृत्य सादरीकरण केले. सूत्रसंचालन आणि आभार शिक्षिका शिल्पा जाधव, तमन्ना नाईकवाडी यांनी मानले.

# पशु कल्याण शिबिराने प्रस्थापित केले गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड

सोलापूर : एसएमएफजी इंडिया क्रेडिटने सर्वात मोठे पशु कल्याण शिबिर (विविध ठिकाणे) यासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा मान मिळवत इतिहास रचला आहे.भारतातील ६ ठिकाणी ५१७ सहभागींसह हा विक्रम प्रस्थापित करण्यात आला.हा ऐतिहासिक टप्पा कंपनीच्या पशु विकास दिन (पीव्हीडी) देशभरातील सर्वात मोठे एकदिवसीय पशुकल्याण शिबीराच्या ७ व्या सत्राचा भाग म्हणून गाठण्यात आला.

# सांगोल्यात शिवाजी महाराजांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ फेब्रुवारी-**

सांगोल्यात छत्रपती शिवाजी महाराज चौक, शिवतीर्थ, सांगोला येथे शिवप्रेमी मंडळ, सांगोला यांच्याकडून शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

शिवजन्मोत्सव सोहळा निमित्त महात्मा फुले चौक येथे महात्मा फुले पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संध्या.८ वा. छत्रपती शिवाजी महाराजांची शिवमुर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली. यानंतर पारंपरिक वेशभूषा स्पर्धा पार पडल्या. संध्या.१० वा. छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा व स्फूर्ती गीते सादर करण्यात आली. बुधवार दि.१९ फेब्रुवारी रोजी स.६ वा.




छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस अभिषेक करण्यात आला. यानंतर स.९ वा. सांगोला शहरातील व तालुक्यातील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या सर्व गुणवंत खेळाडूंचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालण्यासाठी विविध पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते तसेच शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स.१० वा. सांगोला शहरातुन सर्व महापुरुषांना अभिवादन करत भव्य दिव्य रॅली काढण्यात आली. सदर रॅलीमध्ये घोडे, हलगी, नाशिक ढोल, उंट, मावळे, डॉल्बी यांचा समावेश होता. सदर रॅली पार पाडण्यासाठी शिवप्रेमी मंडळ, सांगोला यांनी परिश्रम घेतले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय, हर हर महादेव अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. तसेच सर्वत्र शिवमय वातावरण निर्माण झाले होते.



# हॅकेथॉन प्रदर्शनासाठी नागनहळ्ळी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ फेब्रुवारी-**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यावतीने यंदा प्रथमच हॅकेथॉन या स्पर्धात्मक कार्यक्रमाचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये करण्यात आले होते. सोलापूर जिल्हयातून २३० स्पर्धकांनी यामध्ये भाग घेतला होता.नागनहळ्ळी आश्रमशाळेच्या विदयार्थ्यांनी बहुउददेशीय कृषी यंत्र निर्मिती केली. त्यास जिल्हयातून प्रथम क्रमांक प्राप्त झाले असून राज्यस्तरीय हॅकेथॉन प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

के.बी. एन.माध्यमिक आश्रमशाळा नागनहळ्ळी येथील विदयार्थी जमीर जमादार, जुबेर जमादार व बसवराज आजूरे या विदयार्थ्यांनी याची निर्मिती केली असून शेतातील तण काढण्यासाठी औषध फवारणी करण्यासाठी व शेती कामासाठी वापर करता येते. हे यंत्र रिमोट कंट्रोलव्दारे नियंत्रित करता येते व त्याचे कार्य मोबाईलवरील स्क्रीनवर पाहता येते.या विदयार्थ्यांना प्रशालेतील विज्ञान शिक्षक शंभुलिंग बशेटटी,वशीम शेख, रविंद्र नवले, अमोल पाटील, शुंभागी मिठारी,मोहन गुरव व प्रयोगशाळा सहायक नुरददीन शेख यांनी मार्गदर्शन केले. या यशाबददल सर्व यशस्वी विदयार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थेचे सचिव जावेद पटेल, प्राचार्य मुजावर आय.एम., मुख्याध्यापक शेख आर.जी., सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संक्षिप्त वृत्त



### 'हरिभाई'मध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**सोलापूर दि. १९ फेब्रुवारी-**

शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांच्या अध्यक्षतेखाली हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. सुरेश रेवजे यांनी शिवाजी महाराजांच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकला. त्यांनी शिवाजी महाराजांचे आरमार, हेरखाते आणि वेतन, कर रचना, अष्टप्रधानमंडळ, किल्ले निर्मिती, शिस्तबद्ध लष्कर, निवृत्ती वेतन व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणा या विषयांवर प्रकाश टाकत छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी केले. प्रा प्रमोद चुंगे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी पर्यवेक्षक कुंभार एस. एस., बनसोडे बी. डी., राऊत ए. सी., लक्कण्णा कमळे, औदुंबर सर्वगोड, महेंद्र रणधीर, गणेश नेवरे, मारुती शहाणे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.




### हिराचंद नेमचंद वाचनालयात शिवजयंती साजरी

**सोलापूर दि. १९ फेब्रुवारी-**

हिराचंद नेमचंद वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.श्रीकांत येळेगावकर व कार्यवाह डॉ.नभा काकडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत कामतकर, कार्यकारणी सदस्य एड. धनंजय माने, ग्रंथपाल दत्ता मोरे, वाचनालयाचे कर्मचारी अभ्यासिकेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### बहुजन पार्टीच्या वतीने शिवजयंती साजरी

**सोलापूर दि. १९ फेब्रुवारी-**

बहुजन समाज पार्टी सोलापूरच्या वतीने बहुजन प्रतिपालक कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी पश्चिम महाराष्ट्र विभागीय प्रभारी ॲड. संजीव सदाफुले, प्रशांत लोकरे, जिल्हाध्यक्ष बबलू गायकवाड, शहराध्यक्ष देवा उघडे, जिल्हा कार्यालयीन सचिव शिलवंत (करण) काळे, शहर युवक अध्यक्ष अमर साळवे, सुहास सुरवसे, प्रवीण कांबळे, मिनाज शेख ,शशिकांत तळमोहिते, महेंद्र कांबळे, आकाश इंगळे, इरफान मैंदरगी, आतिश वाघमारे, रोहन बनसोडे, संदेश चितारे, विशाल शेवाळे, अविनाश निकंबे उपस्थित होते.

### 'छावा'तील तुफान गाणं प्रेक्षकांच्या पसंतीस

**सोलापूर दि. १९ फेब्रुवारी-**

लोकप्रिय गायिका वैशाली सामंत सध्या सर्वत्र चर्चेत आहे ते म्हणजे नुकताच रिलीझ झालेला छावा चित्रपटातील गाणं आया रे तूफान साठी.वैशालीने आजवर अनेक सुपरहिट गाणी गायली आहेत. पण या गाण्याबद्दलची आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे,ए.आर. रहमान सोबत गायिका वैशाली सामंत हिला डूएट गाण्याची सुवर्ण संधी मिळाली. वैशालीचा आवाज अंगावर रोमांच उभे करतो. छावा या चित्रपटाची गाणी खूपच गाजत आहे.

# परिवहन मंत्र्यांची सोलापूर बसस्थानकास धावती भेट

## ● सोलापूर बसस्थानकाच्या प्रस्तावित आराखड्याचा घेतला आढावा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ फेब्रुवारी**

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे सोलापूर दौऱ्यावर आले होते. सोलापूर बस स्थानकावर त्यांचा ताफा दाखल झाल्यानंतर त्यांचे स्वागत सोलापूर एसटी विभागाचे विभाग नियंत्रण गोंजारी तसेच आमदार विजयकुमार देशमुख यांनी केले. बस स्थानक परिसरात दाखल झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्थानक परिसरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन केले.

> **मंत्री येती घरात तोचि दिवाळी दसरा :** संत येती घरा तोची दिवाळी दसरा या युक्तीप्रमाणे मंत्री येती घरा तोची दिवाळी दसरा असे चित्र यावेळी पाहायला मिळाले. परिवहन मंत्री सोलापूर बसस्थानकास भेट देणार आहेत. असे सांगण्यात आल्यानंतर सोलापूर एसटी विभाग स्वच्छतेसाठी सकाळपासूनच तयार असल्याचे दिसून आले. परिवहन मंत्री येण्यापूर्वी वाहनतळ परिसर स्वच्छ आणि दुर्गंधमुक्त ठेवण्यासाठी प्रयत्न केले गेले. मात्र हेच प्रयत्न वर्षातील बाराही महिने होत नाहीत.

दरम्यान, परिवहन मंत्री सरनाईक यांनी स्थानकप्रमुख कक्षात सोलापूर बसस्थानक परिसरास धावती भेट देऊन प्रस्तावित असलेल्या बसस्थानकाच्या आराखड्याची माहिती घेतली.यावेळी आमदार विजय देशमुख, विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, आगारप्रमुख उत्तम जुंदले, शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष काळजे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे आदींसह अधिकारी यांची उपस्थिती होती.

सोलापूर बसस्थानक परिसर, वाहनतळ, सुलभ शौचालय आदींची पाहणी केली. तदनंतर सोलापूर बसस्थानकाच्या प्रस्तावित असलेल्या आराखड्याची माहिती घेतली. यावेळी त्यांनी विविध संघटनेचे निवेदन स्विकारले. त्यानंतर सरनाईक यांनी सोलापूर धाराशिव या नवीन बसमधून धाराशिव जिल्ह्याकडे प्रस्थान ठेवले. नवीन बसेसची पाहणी यावेळी त्यांनी केली. यावेळी परिवहन मंत्री सरनाईक यांना व्यस्त वेळापत्रकामुळे प्रसार माध्यमांशी संवाद सधता आला नाही. सोलापूरच्या प्रस्तावित नवीन बस स्थानकाच्या आराखड्याविषयी माहिती मागून घेतल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, मंत्री सरनाईक यांचे आगमन निर्धारित वेळेपेक्षा तब्बल दोन तास उशिराने झाले. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. मंत्री येणार असल्याने बस स्थानकाचे वाहनतळ आरक्षित करण्यात आले होते. त्यामुळे एसटी बसेस उभारण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती. त्याचप्रमाणे एसटीचे अधिकारी आणि कर्मचारी देखील मंत्र्यांची वाट पाहत ताटकळत उभे होते.



# जुळे सोलापूर एसटी बस स्थानकातून वाहतूक सुरु करा

## सोलापूर विकास मंचची मंत्री सरनाईकांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

शहरात नवीन एसटी बस पोर्ट उभारणीसाठी सोलापूर विकास मंचच्या शिष्टमंडळाने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेतली.

सोलापूरसहित पंढरपूर, अक्कलकोट, तुळजापूर आणि कर्नाटकातील गाणगापुर येथील देशातील महत्त्वाचे ५ तीर्थक्षेत्र सोलापूर मार्गावर असल्याने सोलापूर एस.टी. आगार अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचे मंचच्या सदस्यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. मंचचे सदस्य योगिन गुर्जर, केतन शहा आणि विजय कुंदन जाधव यांनी सोलापूरच्या एसटीचे मुख्य बसस्थानकाच्या दयनीय अवस्थेबाबत ठोस मुद्दे मांडले. या भेटीचे समन्वय शिवसेनेच्या ज्याती वाघमारे केले. नवीन बस पोर्ट आणि गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित जुळे सोलापूर बस स्थानकाच्या नवरचनेची गरज आहे. सोलापूरमध्ये तांत्रिकदृष्ट्या आधुनिक आणि प्रवाशांसाठी सोयीस्कर असलेल्या नवीन एसटी बस पोर्टची तातडीने उभारणी करण्याची मागणी केली. यासंदर्भात मंत्री सरनाईक यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पुढील पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

# शिवछत्रपतींच्या महाआरतीने स्वराज्य सप्ताहाचा जल्लोषात शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ फेब्रुवारी-**

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज याच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने १९ ते २७ फेब्रुवारीपर्यंत स्वराज्य सप्ताह अंतर्गत विविध कार्यक्रमाने नियोजन केले आहे.



बुधवारी शिवछत्रपती रंगभवन चौक येथील शिवरायांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महिला आघाडीचे शहराध्यक्ष संगीताताई जोगदनकर, कार्याध्यक्ष चित्राताई कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून ढोल ताशा तुतारीच्या गजरात भगवे फेटे परिधान करून उत्साहात जल्लोषात अभिवादन करून महाआरती करण्यात आली. शिवस्वराज्य ध्वज पताका सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव यांच्या संचलनात जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या हस्ते फडकवून राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस शशिकांत कांबळे, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, अनिल उकरंडे, युवक अध्यक्ष सुहास कदम या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मानवंदना देवून जल्लोषात स्वराज्य सप्ताह शुभारंभ करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपतीच्या अश्वारूढ पुतळ्यास प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# छत्रपती फाऊंडेशनने अमेरिकेत साजरी केली शिवजयंती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी -**

गेल्या १२ वर्षांपासून छत्रपती फाऊंडेशन न्यूयॉर्क शहरातील टाइम्स स्क्रेअर व भारतीय दूतावासात शिवजयंती साजरी केली जाते. या कार्यक्रमात न्यूयॉर्क शहरात शिवछत्रपतींचा पुतळा उभारण्याची घोषणा करण्यात आली. या कार्यक्रमास अमेरिकेतील १० राज्यामधील ३५०च्या वर शिवभक्त सहभागी झाले होते.

या कार्यक्रमासाठी भारताचे राजदूत बिनया प्रधान, न्यूयॉर्क कॉन्सुलेट जेनिफर राजकुमार, न्यूयॉर्क शहर डेप्युटी कमिशनर दिलीप चव्हाण, उद्योजकता विभाग श्यामकुमार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे राजदूत बिनया प्रधान हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी संगीता तोडमल व निलेश इंदुलकर ह्यांनी जिजाऊ वंदना सादर केली. महाराष्ट्र राज्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांच्यातर्फे शिवाजी महाराजांचा सिंहासनाधिष्टीत पुतळा देऊन छत्रपती फॉउंडेशनच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी त्यांचे प्रतिनिधी म्हणून जगजीत निंबाळकर व वरद ओझरकर उपस्थित होते.

यावेळी छत्रपती फाऊंडेशनचचे अध्यक्ष अपार दळवी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने न्यूयॉर्क शहरातील रस्ता नामकरण करण्यात यावे, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थायी स्वरूपाचे स्मारक व पुतळा न्यूयॉर्क मध्ये उभारण्यासाठी स्मारकासाठी न्यूयॉर्क शहर व राज्य सरकारने जमीन उपलब्ध करून द्यावी, अटलांटा, डेट्रॉईट, डल्लास, पित्तसबर्ग, डेनवर, ऑर्लँडो, सान फ्रासिस्को येथे फाऊंडेशन तर्फे शिवजयंतीचे आयोजन करावे अशा मागण्या मांडल्या. ह्या कार्यक्रमाचे संचालन मल्लिका पाटील व सृष्टी ठाकरे तसेच व्यवसाय शिबिराचे संयोजन इशा धुमाळ ह्यांनी केले.

# चैतन्य टेक्नो प्रशालेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

कै. सुरेश सखाराम सुखसे चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत श्री चैतन्य टेक्नो स्कूलचे प्रथम वार्षिक स्नेहसंमेलन 'स्पंदन' या सोलापूर शाखेचे उद्घाटन प्रमुख पाहूणे होमी भाभा सेंटर मुंबईचे वैज्ञानिक, प्रा व्यंकटेश गंभीर, लेखक व पत्रकार अरविंद जोशी, सुर्या ग्रुपच्या वैशाली सुरवसे, सुरवसे हायस्कूलच्या मुख्याध्यापिका उज्वला सांळुके, क्रीडा संघटक रविन्द्र नाशिककर यांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक डॉ. बी. एस. राव यांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलनाने करण्यात आले.



उपस्थित मान्यवरांचा सत्कार मुख्याध्यापिका डॉ. पी. सौजन्या यांनी देवून केला. शाळेचा वार्षिक अहवाल सादर करत प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रा व्यंकटेश गंभीर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका डॉ. पी. सौजन्या, शाखा विकास व्यवस्थापक रुपाली चौधरी, संचालक व्यवस्थापक आदिनारायण पडाल यांच्या सहशिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आरती गजधाटे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रशालेची हेड गर्ल कैफिया शेख हिने केले.








# कर्मयोगी दलितमित्र स्व.भीमराव जाधव गुरुजी यांची जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

दिन दलीत, पिडीत, दुर्लक्षीत व वंचीत अशा समाज घटकांच्या उत्थानासाठी आपले संपुर्ण जीवन चंदनाप्रमाणे झिजवलेले कर्मयोगी दलितमित्र स्व. भीमराव जाधव गुरुजी यांची १०२वी जयंती सोहळा मोठ्या उत्साहात मातोश्री सुभद्राबाई जाधव सांस्कृतिक भवनात संपन्न झाली.

याप्रसंगी विध्नेश प्रस्तुत प्रा. अनिल लोंढे व सहकाऱ्यानी बहारदार व भक्तीपुर्ण भावगीते सादर केली.

या सोहळ्यास शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉ. पार्टीचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल, प्रा. नसिमा पठाण, प्रा. नरेश बदनोरे, साहित्यीक दत्ता गायकवाड, माजी सोसा. चेअरमन लहू गायकवाड, प्रा. डॉ. महादेव देशमुख, दिनेश शिंदे, प्रा. मस्के, रेवण गायकवाड, सुपुत्र जाधव, संदीप गायकवाड, अजय गायकवाड, संजय तोडकरी, संतोष पवार, जुबेर बागवान तसेच लांबोटी व बोरोटी वैराग परिसरातील सर्व मान्यवर, टकारी समाजाचे कार्यकर्ते, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्तातील मान्यवरांनी स्व. भीमराव जाधव गुरुजीनां उपस्थित राहून अभिवादन केले. या प्रसंगी प्रा. नरेश बदनोरे, साहित्यीक दत्ता गायकवाड, प्रा. नसिमा पठाण, प्रा. कांबळे आदिची गुरुजीच्या कार्याची दखल घेत गौरवपर भावना व्यक्त केल्या. शेवटी दलितमित्र भारत जाधव यांनी मान्यवरांचे आभार व्यक्त केले. गुलाल व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता घाली




सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : शहरात बुधवारी शिवजयंती निमित्त मोठ्या जल्लोषात आणि उत्साही वातावरणात निघालेल्या मिरवणुकांत युवकांनी लेझमीसह विविध खेळ सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिस्तबध्द मिरवणुकांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



# ‘जय भवानी, जय शिवराय’चा जयघोष



## वारकऱ्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

संभाजी ब्रिगेडच्या वतीने मेकॅनिक चौक येथे वारकऱ्यांच्या हस्ते शिवमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. संभाजी ब्रिगेडच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिव विचारांची शिवजयंती साजरी करण्यात येत आहे. गाणगापूर ते आळंदी चालत वारी करणाऱ्या वारकऱ्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, महिला शहराध्यक्ष मोनाली धुमाळ, उपाध्यक्ष मनीषा कोळी, राजनंदिनी धुमाळ, पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष अरविंद शेळके, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष शेखर चौगुले, शहर उपाध्यक्ष फिरोज सय्यद, ओंकार कदम, बबन डिंगणे, लखन पारसे, वैभव धुमाळ, आकाश नाईकवाडी, विकास सावंत आदी उपस्थित होते.



## भाजपा शहर कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर-जिल्ह्याच्या वतीने कुशल, प्रजाहितदक्ष, जनकल्याणकारी नेतृत्व आणि आदर्श राज्यकर्त्याचे उत्तुंग उदाहरण जगासमोर ठेवणाऱ्या स्वराज्य निर्मितीद्वारे रयतेच्या मनातील सुराज्य प्रत्यक्षात साकारणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. दरम्यान, यावेळी भाजपा कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास माजी सहकार मंत्री व आ. सुभाष देशमुख, शहराध्यक्ष नरेंद्र काळे, उपाध्यक्ष जय साळुंखे, श्रीनिवास दायमा, सरचिटणीस विशाल गायकवाड, सरचिटणीस रोहिणीताई तडवळकर, चिटणीस नागेश सरगम, महिला मोर्चा अध्यक्षा विजया वड्डेपल्ली, ओबीसी मोर्चा अध्यक्ष राम वाकसे, भटक्या विमुक्त आघाडी अध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, अल्पसंख्यांक सेलचे जाकीर भाई सगरी, चंद्रकांत तापडिया, गिरीश बत्तुल, श्रीनिवास दायमा, नागेश गंजी, श्रीधर गोखले, राम वाकसे, आनंद बिराजदार, संदीप कुलकर्णी, यशवंत पाथरूड, दत्तात्रय पोसा, प्रकाश गाजूल, सुनिल टोणपे आदिंसह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



## ढोल, ताशांच्या गजरात थिरकली तरूणाई

## लेझीम, झांज पथक अन् नयनरम्य मर्दानी खेळाचे सादरीकरण

## छत्रपतींना अभिवादन करण्यासाठी दिवसभर लाखोंचा जनसागर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी -

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरातील विविध मंडळांकडून काढण्यात आलेल्या मिरवणुकांमध्ये पारंपारिक वाद्य, ढोल, ताशाचा गजर आणि डॉल्बीच्या निनादात तरुणाई थिरकली. मिरवणुकीत सहभागी झालेले देखावे, रथ, लेझर शोचा झगमगाट आणि झांज, ढोल, लेझीमचे मर्दानी खेळ पाहण्यासाठी लाखो लोकांनी उपस्थिती लावली होती. दरम्यान, आज शिवजयंतीनिमित्त शिव छत्रपतींना अभिवादन करण्यासाठी आज सकाळपासूनच छत्रपती शिवाजी महाराज चौकात लाखो शिवप्रेमींचा जनसागर लोटला होता.

श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या नेतृत्वाखाली गेल्या १६ फेब्रुवारीपासून सुरु असलेल्या शिवजयंती सोहळ्याची सांगता बुधवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी भव्य मिरवणुकीने झाली. श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या अधिपत्याखाली निघालेल्या विविध मंडळांच्या मिरवणुकीमध्ये विविध मंडळ कार्यकर्त्यांनी लेझीमचा मर्दानी खेळ, शिवकालीन शस्त्रकलेची प्रात्यक्षिके सादर करून शहरवासियांची मने जिंकली. १५ फेब्रुवारीपासून सोलापूर शहरात श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या नेतृत्वाखाली ३९५ वा शिवजयंती सोहळा साजरा करण्यात आला. या सोहळ्याची सांगता १९ फेब्रुवारी रोजी मिरवणुकीने झाली. डाळिंबी आड मैदान येथे श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या सिंहासनाधिष्ठित छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीची पूजा पोलिस आयुक्त एम. राजकुमार, आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात येऊन मिरवणुकींना प्रारंभ करण्यात आला. यावेळी पोलिस उपायुक्त विजय कबाडे, ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, पुरुषोत्तम बरडे, अंबादास शेळके, प्रितम परदेशी, राजन जाधव, सुनील रसाळे, श्रीकांत डांगे, बाळासाहेब पुणेकर, ब्रम्हदेव पवार, मतीन बागवान, जीवन यादव, पंकज यादव, विजय भोईटे, माऊली पवार, विनोद भोसले, विवेक फुटाणे, बजरंग जाधव यांच्यासह मंडळाचे सभासद शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर शहरातील विविध मंडळांच्या मिरवणुकांस प्रारंभ झाला. अनेक मंडळांनी सजवलेल्या कंटेनरवर शिवरायांच्या जीवनावरील देखावे सादर केले होते. याचबरोबर जय हनुमान, जय श्रीराम, श्री महादेव, कुंभमेळा, मराठा साम्राज्य देखावा आदी विविध देव-देवतांचे देखावे सादर केले होते. या मिरवणुकांमुळे आज दिवसभर सोलापुरातील वातावरण शिवमय झाल्याचे दिसत होते. शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी चौक परिसरात करण्यात आलेली विद्युत रोषणाई, फुलांची रोषणाई व सर्वत्र फडकलेले भगवे ध्वज यामुळे वातावरण उजळून निघाल्याचे चित्र दिसत होते. सकाळपासून शिवछत्रपतींना अभिवादन करण्यासाठी शिवप्रेमींनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात गर्दी केली होती. यातील काही मिरवणुकांत युवकांनी मर्दानी खेळही सादर आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या यंदा आलेल्या नवनव्या गाण्यांवर ही तरूणाई थिरकताना दिसून आली. डाळींबी आड मैदान येथून निघालेली ही मिरवणुक नवी पेठ मार्गे मेकॅनिकी चौकात आल्यानंतर पाठीमागून एकेक मंडळ मिरवणुकीमध्ये सहभागी झाली. छत्रपती शिवरायांच्या नवनव्या गाण्यांच्या तालावर तरूणाई थिरकली. या मिरवणुका पाहण्यासाठी हजारो नागरिकांनी दुतर्फा गर्दी केली होती.



### २५ हजार शिवभक्तांसाठी भोजन; माझ्यासाठी भाग्याची गोष्ट : अमोल शिंदे

सोलापुरात छत्रपती शिवाजी जयंती निमित्त शहरातील विविध मंडळातर्फे मिरवणुका काढण्यात येतात. या मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी सोलापूर शहरासह आपपासच्या गावातील हजारो शिवभक्त येतात आणि यावेळी बंदोबस्तास शेकडो पोलिस कर्मचारी असतात. शहरातील हॉटेल्स बंद असल्याने त्यांच्या जेवणाची सोय व्हावी, यासाठी थोरला मंगळवेढा तालीमच्या वतीने अध्यक्ष अमोल शिंदे व मंडळ पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून २५ हजार नागरिकांची मोफत जेवणाची सोय करण्यात आली होती. हे जेवण देणे म्हणजे माझे थोर भाग्यच असल्याची प्रतिक्रिया शिवसेना जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे यांनी व्यक्त केली. खरंच थोरला मंगळवेढा मध्यवर्ती मंडळाचा हा एक स्तुत्य पुढाकार असून, गेल्या ६ वर्षांपासून मंडळाच्या वतीने ही सोय करण्यात येत आहे. या ठिकाणी एका पंगतीत किमान दीड हजाराच्यावर शिवभक्तांच्या बसण्याची व्यवस्थाही करण्यात आली होती. या २५ हजार शिवप्रेमींसाठी ७५० वाढपी आणि ३५० च्यावर स्वयंपाकी काम करत होते.

### मध्यवर्ती महामंडळाच्या मिरवणुकीमध्ये सहभागी मंडळे

मध्यवर्ती महामंडळाच्या मिरवणुकीमध्ये एम. जी. ग्रुप, शिवजन्मोत्सव मंडळ, शिवालय सामाजिक बहुउद्देशीय संस्था, जय महाराष्ट्र तरूण मंडळ, शिवसम्राज्ञी प्रतिष्ठाण, शिवयोध्दा प्रतिष्ठान, बांबू तालीम प्रतिष्ठाण, भोईराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव मंडळ, शिवयोध्दा प्रतिष्ठान, धर्मवीर संभाजी तालीम जुनी पोलिस लाईन सार्वजनिक तरूण मंडळ, माता प्रतिष्ठान सांस्कृतिक व क्रिडा मंडळ, जय बजरंग बहुउद्देशीय संस्था संचलित दैवत छत्रपती प्रतिष्ठान, आर्य प्रतिष्ठान, शिवसंकल्प प्रतिष्ठान, संदीप फाऊंडेशन, पाणीवेस तालीम शिवजन्मोत्सव मंडळ, रौद्रशंभु प्रतिष्ठान, लोककल्याण सामाजिक संस्था, पत्रा तालीम तरूण मंडळ, श्री छत्रपती शिवाजी महाराज मराठा समाज बहुउद्देशीय मंडळ, दहशत ग्रुप, शिवतेज प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था, शिवनेरी प्रतिष्ठान, धर्मवीर संभाजीराजे शिवजन्मोत्सव मंडळ, खड्डा तालीम, शिवराम प्रतिष्ठान यांच्यासह विविध मंडळांनी सहभाग नोंदविला.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त



यंदाची शिवजयंतीची मिरवणूक अत्यंत शिस्तबध्द निघाली. मिरवणुकीत डॉल्बी, डीजेचा जास्तीचा दणदणाट दिसून आला नाही. पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी केलेल्या आवाहनाला मंडळांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून आले. तर काही मंडळांनी डॉल्बी लावलेले दिसून आले, परंतु त्याचा आवाज हा पूर्णपणे पोलिसांच्या सूचनेनुसार नियत्रंणात असल्याचे दिसून आले. या मिरवणुकीसाठी पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या नेतृत्वाखाली ३ पोलिस उपायुक्त, ५ सहायक पोलिस आयुक्त, २२ पोलिस निरीक्षक, ६५ पोलिस उपनिरीक्षक, ७०० पोलिस कर्मचारी, ४०० पुरुष व महिला होमगार्ड, राज्य राखीव दलाचे दोन प्लाटून. याशिवाय वाहतूक व्यवस्थेचा स्वतंत्र बंदोबस्त होता. मिरवणुक मार्गाकडे येणारे अनेक रस्ते बंद केल्यानंतर वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली होती. पर्यायी रस्त्यांवर वाहतूकीची कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक शाखेचे पोलिस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

# संभाजी आरमारचा शाही पालखी सोहळा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी -**

संभाजी आरमारच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे शिवजयंतीनिमित्त शाही पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.यांचा शुभारंभ जिल्हाधिकारी श्री कुमार आशीर्वाद यांच्या शुभहस्ते तसेच आमदार देवेंद्र कोठे,भा.यु.मोर्चाचे सरचिटणीस मनिष देशमुख,पोलिस आयुक्त एम राजकुमार, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री कुलदीप जंगम, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. श्री प्रकाश महारनवर, पोलिस उपायुक्त विजय कबाडे,संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्री श्रीकांत बापू डांगे कार्याध्यक्ष श्री शिवाजी तात्या वाघमोडे व शाही पालखी सोहळा प्रमुख प्रा.श्री मल्लिकार्जुन परळकर , शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष सुशिल बनपट्टे,जी एम संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.पारंपरिक वाद्यांच्या गजरात पालखीतून छत्रपती शिवाजी महाराजांची मिरवणूक काढण्यात आली. पालखीत छत्रपती शिवरायांची मूर्ती आणि भगवतगीता, शिवचरित्र, शंभू चरित्र आणि भारतीय संविधानाची प्रत सन्मानपूर्वक ठेवण्यात आली पारंपरिक हलगीच्या, बँजोच्या गजरात हा पालखी सोहळा मार्गस्थ झाला. यामध्ये वारकरी पथकाने जयघोष करीत टाळ मृदंगाचा गजर केला . हजारो माता-भगिनीनी पारंपरिक वेशभूषा आणि मावळ्यांनी डोक्यावर भगवा फेटा परिधान करून या आनंदी सोहळ्यात सहभागी घेतला. सकाळी ठीक १०.०० वा छत्रपती रंगभवन चौक येथून - जिल्हा परिषद - पंचकट्टा - पाणीवेस तालीम - लकी चौक - सरस्वती चौक - मेकॅनिक चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पालखी सोहळा अतिशय शिस्तबद्ध व दिमाखात पोहोचला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवकालीन मर्दानी व साहसी खेळांचे चित्तथरारक सादरीकरण, तलवार, लाठ्याकाठ्या व अंगावर शहारे आणणारा दांडपट्ट्याचा खेळ, आगीशी झुंज देणाऱ्या कसरती,तसेच महिलांनी सादर केलेले दिमाखदार व सुंदर असे शिवनृत्य यामुळे पालखी सोहळ्यात चैतन्य निर्माण केले.. या शाही पालखी सोहळ्यामध्ये बहुसंख्येने सोलापूरकर तसेच शिवप्रेमी जनतेने मोठ्या संख्येने सहभागी होऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. हा पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी शशिकांत शिंदे गजानन जमदाडे अनंतराव नीळ , सागर ढगे, सागर सांगवे,राज जगताप,राज दवेवाले, रेवनसिध्द कोळी, ज्ञानेश्वर डोंबाळे,प्रमोद जगताप,गुरुनाथ निंबाळे, मल्लिकार्जुन पोतदार, गिरीश जवळकर सुधाकर करणकोट, अमित कदम,ओमश्री भोसले, इत्यादी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## नृत्य दिग्दर्शक पाटीलचा धुवाँधार परफॉर्मन्स

**सोलापूर :** कौतुकाचा वर्षाव सध्या सुप्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक आशिष पाटीलवर होताना दिसत आहे.लावणी किंग त्याच्या टीमसह सुंदरी - द हिस्टरी ऑफ लावणी (अदा ताल शृंगार) या नव्या शोमधून रसिकांच्या मनावर राज्य करण्यास सज्ज झाला आहे.६ फेब्रुवारीला एनएमएसीसी मुंबई येथे या शोचा श्रीगणेशा झाला.हाऊसफुल्ल अशा या शोमधून आशिष पाटील आणि त्याच्या टीमचं तोंडभरून कौतुक करण्यात आलं.आशिष पाटील म्हणाला की,हा अनुभव अविस्मरणीय होता. आमच्यासाठी देवता असणाऱ्या या साधनेला प्रेक्षकांनी जी दाद दिली त्यासाठी मी कायम त्यांचा ऋणी राहीन.असे पत्रकारांशी बोलताना सांगितले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०३४

**तुका म्हणे भय न धरीं मानसीं ।**
**ऐसियाचे विशीं करितां दंड ।।**

नि:स्वार्थ प्रेम, आपुलकी, नम्रता, सहिष्णुता, बंधुता, समत्व हे सर्व संत, महात्म्यांचे गुण होत. असे गुण जोपासणाऱ्यांना भांडण-तंटा, शत्रुत्व, दंड, अहंकार इत्यादी दुर्गुण अजिबात आवडत नाहीत. हे सत्य असले तरीही प्रसंगानुरुप संत, महात्मे दंडाला जवळ घेतात. अनेक वेळा समजावूनही किंवा मार्गदर्शन करूनही जर समोरचा सुधारत नसेल तर संत महात्मेही अशांच्या बाबतीत दंडाची भाषा वापरतात. सर्व प्रकारचे प्रयत्न असफल होऊ लागले तरच दंडाचा बडगा संत उचलतात. अनेकवेळा सांगूनही जर समोरचा अन्यायच करीत असेल, स्वार्थ व अहंकाराशिवाय त्याला दुसरे कांहीच सुचत नसेल तर शेवटचा पर्याय म्हणून अशांना दंडित करणे चुकीचे नाही. अशांना दंड देतांना भय धरण्याचेही कांही कारण नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे भय न धरी मानसीं। ऐशियाचे विशी करिता दंड।।. महाराजांच्या या म्हणण्याच्या प्रचितीची वेळ माणसाने येऊ न देणे हे सर्वांसाठी चांगले असते.



माणूस लहान असो की मोठा असे, स्त्री असो अथवा पुरुष असो, प्रत्येकाला कांही नीती नियम ही पाळावीच लागतात. हे नीती नियम कोणते आहेत ? ते कसे पाळावेत ? त्याचे पालन केले नाही तर काय होऊ शकते ? आदिबाबत ज्ञानी, अनुभवी लोक तसेच संत महात्मे मार्गदर्शन करतात. कोणी मार्गदर्शन केले नाही तरी त्याचे पालन करणे बंधनकारक असते. पालन नाही केले तर अशांना दंड देण्यासाठी कायदा पुढे येतो. कायदा जसा नियम घालून देतो, तसा नियमाचे पालन करणाऱ्यांना संरक्षण व नियमाविरुध्द वागणाऱ्यांना शिक्षा देतो. त्याप्रमाणे संत, महात्मे ही नीती नियमांचे पालन करणाऱ्यांचे कौतुक करतात, त्यांना प्रेरणा देतात आणि जाणून बुजून नीती नियमांच्या विरुध्द वागणाऱ्याला दंड देण्याची भाषाही करतात. सहनशिलतेचे अत्युच्य टोक असणाऱ्या संत, महात्म्यांना ज्याच्याबद्दल दंडाची भाषा बोलावी लागत असेल तो किती कोडगा असेल याचा विचार आपणच करावा. जन्मदात्या आई-वडीलांना घराबाहेर हाकलणाऱ्या, अर्धांगिणी असणाऱ्या धर्मपत्नीचा किंवा धर्मपतीचा छळ करणाऱ्या, स्त्रीयांना वाममार्गावर लावणाऱ्या, राष्ट्रद्रोह करणाऱ्या आदि लोकांचा समावेश संत, महात्म्यांच्या नजरेत दंडासाठी झाला तर त्यात चुकीचे कांही नाही. ईर्षा, मोह, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध आदिचे अत्युच्य टोक जे लोक गाठतात, तेच लोक दंडास पात्र होतील . ज्याच्या मनात ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार आदिला स्थानच नाही, ते संत महात्म्यांच्या प्रेमास पात्र होतात. आपल्या वर्तनातून आपण ज्ञानोबा-तुकोबांच्या प्रेमास पात्र झालो नाही तरी चालेल पण त्यांच्या दंडात्मक विचारास स्वप्नातही पात्र होऊ नये असेच आपले वर्तन असेल, याचा आपण आत्मविश्वास बाळगू या.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : गुरुवार** | **दिनविशेष - चांगला दिवस** |
| **दि. २० फेब्रुवारी २०२५** | **गजानन महाराज प्रकट दिन शेगाव** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | |
| **शके - १९४६** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - फाल्गुन** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **कृ. सप्तमी (०९.५७)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - विशाखा (१३.२९)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - ध्रुव (११.३२)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - बालव (२३.०१)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या :** लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निमर्ाण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

# मुख्यमंत्री फडणवीस करणार डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या महाअधिवेशनाचे उद्घाटन

**● राजा मानेंच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**



डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या दि. ६ एप्रिल रोजी सावंतवाडी (सिंधुदुर्ग -कोकण) येथील भोसले नॉलेज सिटी येथे होत असलेल्या तिसऱ्या महाअधिवेशनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

अधिवेशनाचे निमंत्रण देण्यासाठी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंत्रालयात मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली.त्यावेळी अधिवेशनात सहभागी होण्याची ग्वाही त्यांनी दिली. दरम्यान हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व विभागांसह गोव्यातील डिजिटल पत्रकारही सज्ज आहेत. महाअधिवेशनाचे स्वागताध्यक्षपद सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी तर सहस्वागताध्यक्षपद भोसले नॉलेज सिटीचे कार्याध्यक्ष अच्युत भोसलें यांनी स्वीकारले आहे.अधिवेशनाचे सन्माननीय मार्गदर्शक म्हणून माजी शिक्षणमंत्री आ.दिपक केसरकर आहेत. या अधिवेशनाचे निमंत्रण माजी मुख्यमंत्री खा.नारायण राणे, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्वीकारलेले आहे. अधिवेशनाचे संयोजन समितीचे प्रमुख म्हणून संघटनेचे कोकण विभागीय अध्यक्ष सागर चव्हाण व सिंधुदुर्ग जिल्हा अध्यक्ष भरत केसरकर हे कार्यरत आहेत. अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध व्यापक समित्या गठित होत असून विविध क्षेत्रातील मान्यवर व मंत्र्यांना निमंत्रित केले जाणार आहे. संघटनेचे अध्यक्ष राजा माने व उपाध्यक्ष सतीश सावंत यांनी संघटनेची वाटचाल व महाअधिवेशनाच्या कार्यक्रमांची माहिती दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे तत्वतः मान्य केले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

**अलक:- (५७) सावधान**


हिंदुस्तान हा त्यात राहणाऱ्या हिंदू मुसलमान ख्रिश्चन आदि सर्वांचा आहे; ही इंग्रजांनी व स्वातंत्र्यानंतरच्या सरकारने गळी उतरवलेली विकृत व राष्ट्रघातकी कल्पना जन-हृदयात इतकी दृढमूल झाली होती व आजही आहे की त्यांना हिंदूंचा हिंदुस्तान ही कल्पना वेडगळ वाटते तेव्हा हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना मांडणाऱ्या डॉक्टर हेडगेवार यांना हिटलर म्हणून हिणवत असत तेव्हा श्री. बाबासाहेब खापर्डे म्हणाले होते की डॉ. हेडगेवार जर हिटलर आहेत; तर खिलाफत वाले ही हिटलर आहेत; कारण खिलाफत वाल्यांचीही स्वयंसेवी पथके आहेत. मग यावर खूप आरडाओरडा झाला. तेव्हाही झाला व आताही अशाच तथाकथित गुलामी वृत्तीने आरडाओरडा होतो. म्हणजे गुलामी रक्तात किती भिनली आहे; हे आपल्याला कळते. डॉक्टरांनी सांगितलेल्या कितीतरी गोष्टी आज तंतोतंत खऱ्या ठरत आहेत. स्वातंत्र्यानंतर संघशाखेत जाणाऱ्याला सरकारी नोकरी मिळत नसे. 'नवरा मरो नाही तर नवरी मरो' आपल्याला पिंडाएवढा घास देणाऱ्या सरकारची गुलामी स्वीकारणे; नोकरदारांनी स्वीकारले होते. 'जे पेरावे तेच उगवते' हे त्रिकालाबाधित सत्य इंग्रजांनी ओळखले होते. त्यामुळेच इंग्रजांनी विकृत राष्ट्रीयत्वाचे बियाणे पेरले. ते आज असंख्य विकृत शाखांनी भारलेले आहे. आता ते मोडीत काढण्यासाठी खऱ्या देशभक्त भारतीय नागरिकांनीच गुलामी मनोवृत्तीतून जागे होऊन राष्ट्र सर्वप्रथम म्हणजे सर्वप्रथम मी भारतीय या न्याय्य हक्कासाठी लढले पाहिजे. व हक्क डावलणाऱ्याला शिक्षा झाली पाहिजे .तेव्हा ह्या स्वधर्माचा स्वीकार करा व गुलामीला तिलांजली द्या. तेव्हा वेळेत सावध व्हा. सावधान सावधान दक्ष तू सदा रहा.

**- क्रमशः**

# सोलापूर कॅन्सर सोसायटीच्या सचिवपदी डॉ. व्यंकटेश मेतन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**





सोलापूर कॅन्सर सोसायटी या संस्थेच्या वार्षिक सभेमध्ये मा. मनीषा कुंभार निवासी उपजिल्हाधिकारी सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये डॉ. व्यंकटेश मेतन यांची संस्थेच्या सचिवपदी व डॉ. ज्योती चिडगुपकर यांची संयुक्त सचिवपदी निवड करण्यात आली. या संस्थेचे चेअरमन मा. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, व्हाईस चेअरमन डॉ. बी एस बिराजदार व खजिनदार श्री. उत्तम राव दोहिजडे हे आहेत.

या वार्षिक सभेत सुरुवातीला या संस्थेच्या संस्थापक सचिव दिवंगत डॉ. सुशीला पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या संस्थेच्या व्यवस्थापन समिती व वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सचिव डॉ. शिरीष कुमठेकर यांनी या संस्थेचे मागील वर्षाचे काम काज अहवाल, विविध कार्यक्रम, उपक्रम, वार्षिक आर्थिक अहवाल तसेच पुढील वर्षाचे अंदाजपत्रक सादर केले. ते सर्व संमतीने मान्य करण्यात आले. डॉ. अनिश देखणे यांची व्यवस्थापन समितीवर निवड करण्यात आली. डॉ. अरविंद देखणे यांनी या संस्थेसाठी केलेले उत्तम कार्य व योगदानासाठी त्यांचा सत्कार करण्यात आला. या सभेस संस्थेचे आजीव सभासद, पियुषा देशपांडे, संगीता पारशेट्टी हजर होते. सभेचे आभार सचिव डॉ. शिरीष कुमठेकर यांनी मानले.




## पात्र संस्थांनी अनुदानासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**सोलापूर, दि.१८ फेब्रुवारी-**

डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेंतर्गत सन २०२४-२५ या वर्षासाठी अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील शासन निर्णयातील अटी व शर्ती पात्र संस्थांनी परिपूर्ण प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांचे मार्फत जिल्हाधिकारीकार्यालय (नियोजन शाखा), सोलापूर यांचेकडे दि. २२ फेब्रुवारी २०२५ पूर्वी सादर करावेत, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी, तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी, दिलीप पवार यांनी केले आहे.



# मेहता शाळेत शिवजन्मोत्सव सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी च्या जयघोषात शिवजन्मोत्सव सोहळा पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माऊली झांबरे, गणेश नांदवटे, रजनी कुलकर्णी, मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

इयत्ता ४ थी मधील विद्यार्थ्यांनी गणेश माने, भारती शिंदे व मयुरी दुरुगकर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रसंगांचे उत्कृष्ट असे नाट्यमय सादरीकरण केले. या नाट्यामध्ये ६० विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या भूमिका साकारत जिवंत देखावा सर्वांसमोर उभा केला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन जालीमिंचे यांनी केले तर आभार योगेश सरवदे यांनी मानले.

# रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे व्यावसायिक पुरस्कार जाहीर

### उद्या होणार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर द्वारा गेल्या ५० वर्षांपासून अविरतपणे सुरु असलेल्या व्यावसायिक पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले आहे.

याचे वितरण शुक्रवार २१ फेब्रुवारी रोजी रोजी सायंकाळी ६:३० वाजता रंगभवन शेजारील हॅच फ्री मेसन्स हॉल येथे होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग रजपूत हे उपस्थित राहणार आहेत. पुरस्कार वितरणानंतर ॲड. रजपूत यांचे कोर्ट, पोलीस आणि जनता ह्या विषयावर व्याख्यान होणार असून हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे, असे सचिव ब्रिजकुमार गोयदानी यांनी कळविले आहे.

## विजापूर नाका सर्वोत्कृष्ट पोलिस स्टेशन




**जाहीर झालेले सर्वोत्कृष्ठ पुरस्कार असे**

पोलीस स्टेशन (विजापूर नाका पोलीस स्टेशन), पोलीस कर्मचारी (अमृत सुरवसे), सर्वोत्कृष्ठ पोस्टमन (लक्ष्मण किसन पवार)रेल्वे लोको पायलट (एल. जी. सगर), सर्वोत्कृष्ठ एम.एस.आर.टी.सी. ड्रायव्हर (फरहद हुसेन दाऊद शेख), जनमित्र (एमएसईबी, किरणकुमार इरनाळे)



# चाँदतारा उर्दू शाळेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

फिरदोस महिला शिक्षण व समाज सेवा संस्था संचलित चाँदतारा उर्दू प्राथमिक शाळा सोलापूर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज यांची माहिती शेख यास्मिन यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख शमीम यांनी केले व आभार नदाफ आयेशा यांनी मानले. मुख्याध्यापिका सौदागर गजाला व सर्व शिक्षक कार्यक्रमात उपस्थित होते.

# कस्तुरे असोसिएट्स, सॅमसंग ठरले सर्वोत्कृष्ट स्टॉल पारितोषिकाचे मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

होम मैदानावर १२ ते १८ फेब्रुवारी पर्यंत सुरू असलेल्या इलेक्ट्रो या भव्य प्रदर्शनाचा सांगता समारंभ बँक ऑफ महाराष्ट्राचे असिस्टंट जनरल मॅनेजर संजीव कुमार व सोलापूर एअरपोर्टचे व्यवस्थापक चंद्रेश वंजारा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

याप्रसंगी इलेक्ट्रो २०२५ चे सर्वोत्कृष्ट स्टॉलचे बक्षिस कस्तुरे असोसिएट्स -सॅमसंगचे मंगेश कस्तुरे यांना प्रदान करण्यात आले. त्याप्रसंगी मंचावर सेडाचे अध्यक्ष आनंद येमुल, चेअरमन दीपक मुनोत, उपाध्यक्ष डॉ. सुरजरतन धुत, सचिव भूषण भुतडा, खजिनदार सुयोग कालाणी, सहसचिव हरीश कुकरेजा उपस्थित होते. प्रारंभी सोलापूर इलेकट्रोनिक्स डिलर्स असो. चे सचिव भूषण भुतडा यांनी सर्वांचे स्वागत केले. अध्यक्ष आनंद येमूल यांनी प्रास्ताविक करताना सर्व संचालक मंडळ व इलेक्ट्रो समितीचे सभासदांनी घेतलेल्या परिश्रमाबद्धल आभार व्यक्त केले.

इलेक्ट्रो चे चेअरमन दीपक मुनोत आपल्या भाषणात नागरिकांनी या प्रदर्शनास दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसाद तसेच मुख्य प्रायोजक प्रायोजक शार्प, सहप्रायोजक हायफा इलेकट्रीकल्स व एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी यांचे विशेष आभार व्यक्त केले. समस्त स्टॉलधारक, विद्यार्थी व सहभागी कंपन्यांचेही विशेष आभार मानले. सात दिवसांत सुमारे एक लाख लोकांनी यंदा प्रदर्शनास भेट दिल्याचे त्यांनी आवूर्जन उल्लेख केला. संजीव कुमार यांनी हे प्रदर्शन अत्यंत नियोजनबद्ध असल्याचे सांगत सेडाचे सर्व पदाधिकार्यांच्या एकात्मतेचे कौतुक केले. मुंबई दिल्ली सारख्या मोठ्या शहरातील प्रदर्शना बरोबरीचे हे प्रदर्शन होते . असल्याचे त्यांनी विशेष कौतुक केले. श्री चंद्रेश वंजारा यांनी सुद्धा या उपक्रमबद्दल संपूर्ण सेडा टीमचे अभिनंदन केले.याप्रसंगी इलेक्ट्रो २०२५ साठी संयोजन करणाऱ्या आर्कि . नीरज मेहता , भिंगारे मंडपचे श्री. सुधीर भिंगारे, जव्हेरी ॲडव्हर्टायझिंग चे संदीप जव्हेरी, सिद्धनाथ पाटोळे, आनंद कोंगे, राजेश दैवज्ञ आदींचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर विविध गटातील पारितोषिक ईश्वर मालू, खुशाल देढिया यांनी जाहीर केले.या स्टॉलचे परिक्षण प्रा. आरती माने, आर्की. रोहन राठी व लक्ष्मीकांत सोमाणी यांनी केले. प्रा. आरती माने यांनी परिक्षणविषयी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी परिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

शेवटी दि.१८ रोजीचे भाग्यवंत क्रमांक काढण्यात आले. सर्वांचे आकर्षक ठरलेल्या सात दिवसाचा एकत्रित्त बंपर लकी ड्रॉ ५५५४४ तिकट क्रमाकांस बक्षिस जाहीर करण्यात आला. ह्या भगवंतास आयएफबीची ५१,९९० किमतीची किचन चिमणी भेट मिळणार आहे. शेवटच्या दिवशीचे काढण्यात आलेल्या लकी ड्रॉ चे भाग्यंत क्रमांक - ७२९१९, ७४०८५ व ७४०६२ आहेत. विजेत्यांनी सेडा कार्यालय, सुराणा मार्केट येथे स.१० ते १२ यावेळेत १५ दिवसांत संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. खजिनदार सुयोग कालाणी यांनी आभार प्रदर्शन केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आरती अग्निहोत्री यांनी केले.

या कार्यक्रमास संचालक संदेश कोठारी, यल्लप्पा भोसले ,बसवराज नवले, चंद्रकांत शहापुरे, राजेश जाजू, रविंद्र पाचलग, गणेश सुत्रावे, तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष केतन शाह, सतीश मालू, शिवप्रकाश चव्हाण, समीर गांधी, विपीन कुलकर्णी, कौशिक शाह, खुशाल देढिया, ईश्वर मालू सह सूर्यकांत कुलकर्णी, विजय टेके ,विश्वजीत कुलकर्णी, सचिन करवा, सतिश मुंदडा, दत्तात्रय अंबुरे, जॉय छाब्रिया, सुनिल भांजे, घनश्याम चव्हाण , रवींद्र कोळी, अंगद चव्हाण ,गणेश दरक, संतोष बुरबुरे, सौरभ राजमाने,राजेंद्र बिराजदार ,ईरफान शेख आदी उपस्थित होते.




**● पारितोषिकाचे मानकरी (प्रथम व द्वितीय)**

- इलेक्ट्रॉनिकस, होम अप्लायन्सेस (कंपनी फीटेड विभाग) : बदामीकर अँड सन्स (हायर); राठी डिस्ट्रिब्युटर्स (बॉश).
- इलेक्ट्रॉनिकस, होम अप्लायन्सेस (सेल्फ फिटेड विभाग): महेंद्र इलेक्ट्रॉनिक्स; किचन किंग.
- इलेक्ट्रॉनिकस, होम अप्लायन्सेस (कंपनी टाईप सेल्फ फिटेड विभाग) : सुयश एंटरप्रायझेस; पवन ट्रेडर्स.
- इलेक्ट्रॉनिकस विभाग (कंपनी फिटेड विभाग) : सुयोग डिजीटल (सोनी).
- इलेक्ट्रॉनिक्स विभाग (सेल्फ फिटेड विभाग) : विजय इलेक्ट्रॉनिक्स (अकाई)
- इलेक्ट्रोनिक्स् विभाग (कंपनी टाईप सेल्फ फिटेड विभाग) : एकबोटे ब्रदर्स
- होम अप्लायन्सेस (कंपनी फिटेड) : चव्हाण सेल्स (आयएफबी); ओपल कॉम्प्युटर्स (कॅरियर ए सी)
- होम अप्लायन्सेस (सेल्फ फिटेड विभाग): सर्वोदय ट्रेडर्स (बॉस), आनंद ट्रेडिंग.
- होम अप्लायन्सेस (कंपनी टाईप सेल्फ फिटेड विभाग): मोनिका इलेक्ट्रॉनिक्स; बालाजी आटा चक्की.
- आय. टी. व कॉम्पुटर्स विभाग : (कंपनी फिटेड विभाग): दर्शन इलेक्ट्रॉनिक्स.
- आय. टी. व कॉम्पुटर्स विभाग : (सेल्फ फिटेड विभाग): प्राईम डिजिटल फोकस.
- सोलर सिस्टम्स (कंपनी विभाग) : चैतन्य आदित्य सोलर शॉपी.
- सोलर सिस्टम्स (सेल्फ फिटेड ) : एलग्रीस सोलर.
- फिटनेस (कंपनी फिटेड ) : फिटनेस मॉल.
- फिटनेस (सेल्फ फिटेड ) : गौरव एजेन्सीस.
- वॉटर प्युरियर : (कंपनी फिटेड) : सर्वोदय ट्रेडर्स (हॅवेल्स).
- वॉटर प्युरिफायर : (सेल्फ फिटेड): दोशीबा वॉटर ट्रीटमेंट फूड स्टॉल जगदंबा केटरर्स, लाईम ट्विस्ट कॅफे

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्ह्यात शिवजयंतीचा उत्साह



### पांडुरंग परिवार, पंढरपूर

येथील पांडुरंग परिवाराचे वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त माजी नगराध्यक्ष लक्ष्मणभाऊ शिरसट,अर्बन बँकेचे चेअरमन सतिश मुळे यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार घालण्यात आला. यावेळी माजी उपनगराध्यक्ष इब्राहिम बोहरी, अनिल अभंगराव, भाजपा शहराध्यक्ष विक्रम शिरसट, माजी नगरसेवक गुरुदास अभ्यंकर, अमोल डोके, सुजितकुमार सर्वगोड, तम्मा घोडके,नवनाथ रानगट,नारायण सिंघण, संजय जवंजाळ,बंटी वाघ, विकास वाघमारे,दिपक येळे व सहकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



### श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य वीरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पूजनानंतर प्रशालेतील काही विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांतून व काव्य गायनातून राजेंची कार्याविषयी माहिती सांगितले. तदनंतर कलाशिक्षक अजय माणकोजी यांच्या मार्गदर्शनाखाली समृध्दी साळे व तिच्या सहकाऱ्यांनी मिळून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडा सादर केले. याप्रसंगी श्रीमंत भोसले यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी माहिती सांगितले. कार्यक्रमास संजयकुमार धनशेट्टी, सिद्धाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड,सिद्धारूढ हिरेमठ,गंगाधर बिराजदार,संतोष कस्तुरे,बसवराज दुधगी, विरेश थळंगे, विजय प्याटी, प्राध्यापक संतोष शिंदे, शिवराज अष्टगी,विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, विनोद दुधगी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी मानले.



### करकंब मध्यवर्ती मंडळ

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्रीमंतयोगी छत्रपती राजे शिवाजी महाराजांची जयंती प्रतिवर्षाप्रमाणे श्रीमंत राजे छत्रपती शिवाजी महाराज मध्यवर्ती मंडळ थोरली वेस यांच्यावतीने साजरी करण्यात आली. प्रथमतः आई जिजामाता, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीचे व प्रतिमांचे करकंब येथील योगा स्पर्धेमध्ये भारतात प्रथम आलेली सुवर्ण पदक विजेती अमृता सरगुले,एशियन तायक्वांदो स्पर्धेत आशिया खंडात प्रथम आलेली मानसी अशोक भोसले, लेकीच झाड संकल्पक शिवश्री ज्ञानेश्वर दुधाणे, प्रतिबिंब सामाजिक प्रतिष्ठानचे शिवश्री बाळासाहेब घाडगे, शिवप्रेमी, शिवश्री भागवत पलंगे यांच्या हस्ते व मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष शिवश्री विवेक शिंगटे, उपाध्यक्ष शिवश्री बंडू खपाले यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी करकंबमधील विविध क्षेत्रात सातत्यपूर्ण उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींमुळे करकंब गावच्या नावलौकिकात भर पडत आहे. त्यांच्या या समाजउपयोगी कार्याबद्दल अमृता सरगुले, मानसी भोसले, ज्ञानेश्वर दुधाणे, बाळासाहेब घाडगे, भागवत पलंगे यांना मान्यवरांच्या हस्ते सचित्र शिवचरित्र भेट देऊन सन्मानित करण्यात आले.



### जिव्हाळा विद्यालय, कुर्डूवाडी

जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी येथे शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. प्रारंभी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ व मुख्याध्यापिका सारिका गोटे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवगर्जना सादर केली. छत्रपती शिवरायांबद्दल विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा परिचय करून दिला. छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते यावर आधारित सर्व विद्यार्थ्यांना पोवाडे ऐकविण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ, सचिव अजित वायचळ, उपस्थित होते.



### पंढरपूर नगर परिषद

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने साजरी करण्यात आली. उपविभागीय अधिकारी प्र. विजया पांगरकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, उपमुख्याधिकारी अँड.सुनील वाळूजकर, प्रशासकीय अधिकारी रविंद्र सूर्यवंशी,नगर अभियंता नेताजी पवार, उपअभियंता प्रकाश केसकर,पाणी पुरवठा अभियंता राज काळे,आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर खरेदी पर्यवेक्षक विजय शहाणे, कृष्णात जगताप, सुवर्णा हाके, करुणा शेळके, संभाजी देवकर,जयंत पवार,दर्शन वेळापूरे, चेतन चव्हाण उपस्थित होते.



## वैराग येथे विविध ठिकाणी शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १९ फेब्रुवारी-**

वैराग व परिसरात ३५ ठिकाणी शिवजंयती निमित्त तुळजापूर येथून भवानी मातेची शिवज्योत घेऊन मोठ्या उत्साहात प्रतिष्ठापणा करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने परिसर दुमदुमला होता. वैराग परिसरातील शिवजन्मोत्सवसोहळ्यातभगवेझेंड्यामुळेपरिसरशिवमय झाला होता.

वैराग येथे आण्णा ग्रुप शिवजन्मोत्सव जयंती उत्सव समितीच्या वतीने वैराग ते तुळजापूर अशी 'दुचाकी शिवरॅली' काढण्यात आली. शिवज्योत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची स्थापना शिव प्रतिमेचे पुजन माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष निंबाळकर व पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, आण्णा ग्रूपचे संस्थापक वैजिनाथ आदमाने, मेजर जगन्नाथ आदमाने यांच्या हस्ते करण्यात आली, यावेळी नगसेविका राणी आदमाने यांच्या उपस्थितीत रात्री १२ वाजता महिलांच्या हस्ते शिवजन्मोत्सव पाळणा साजरा करण्यात आला. रक्तदान शिबिर, शिव व्याख्यान आयोजन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे . यावेळी नगरसेवक प्रफुल्ल भालशंकर, नाना धायगुडे, सतीश करंडे, इस्माईल पटेल,आण्णासाहेब पौळ, महेश पन्हाळे ,जिन्नस उमाप, संग्राम शिखरे, किरण वाघमारे यांच्यासह असंख्य शिव भक्त उपस्थीत होते. सूत्रसंचालन सचिन पानबुडे यांनी केले तर आभार राहुल पालकर यांनी मानले. श्रीमंतयोगी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर व नगरसेवक शाहुराजे निंबाळकर या मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाली. रक्तदान शिबीर व्याख्यान पैठणीचा कार्यक्रम आधी होणार असल्याचे सांगितले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष किरण डिसले, उमेश साठे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. शिवछत्रपती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतीमेचे पुजन पोलिस निरीक्षक कुंदन गावडे, माजी जि प सदस्य संतोष निंबाळकर, माजी सभापती मकरंद निंबाळकर, उपनगराध्यक्ष निरंजन भुमकर, महेंद्र निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आली.



## ओन्ली समाजसेवा संस्थेतर्फे सायकल वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने महाराष्ट्र विद्यालयातील गरजू विद्यार्थीनींना पाच सायकलीचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बार्शी न. प. शिक्षण मंडळाचे प्रशासकीय अधिकारी अनिल बनसोडे प्रमुख पाहुणे म्हणून बार्शी टेक्सटाईल मिलचे जनरल मॅनेजर अजय बोरवणकर, प्राचार्य दीपक गुंड सर, मुख्याध्यापिका श्रीमती के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर. बी. सपताळे, ओन्ली समाज सेवा संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, सचिव विजयकुमार दिवाणजी व इतर मान्यवरांच्या उपस्थित सायकल वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. संस्थेचे सहसचिव नागनाथ सोनवणे यांनी संस्थेच्या कार्यबद्दल माहिती दिली.

यावेळी सहसचिव नागनाथ सोनवणे, खजिनदार मानकोजी ताकभाते, प्रा. चंद्रकांत उलभगत, रतिकांत हमने, सुरेंद्र स्वामी, सचिन मस्के, अजय तिवारी, सागर घंटे, सुनील नवले, प्रतीक खंडागळे, सायरा मुल्ला, कोमल वाणी, सुजाता अंधारे, सारिका जाधवर, रेखा सुरवसे, रागिनी झेंडे, रेखा सरवदे, राजश्री गवळी, पोलीस जाणीव सेवा संघाच्या भाग्यश्री घोडके, अलका हाडगे, अनुसया आगलावे, मोनिका सोनवणे, आशा स्वामी, सुनिता गायकवाड, त्रिशाला मिसाळ, पार्वती जाधवर हे उपस्थित होते. सूत्रसंचालन ए. एन. कसबे यांनी तर आभार एस.एल शिंदे यांनी मानले.

## अ‍ॅड. प्रियंका लवटेची महसूल सहाय्यकपदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १९ फेब्रुवारी-**

मांडवे येथील अ‍ॅड. प्रियंका बापूराव लवटे हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत महसूल सहाय्यकपदी निवड झाली आहे. प्रियंका हिने प्राथमिक शिक्षणापासूनच अधिकारी होण्याच स्वप्न उराशी बाळगून पुणे येथे कठोर मेहनत करून यश संपादन केल. प्रियांकाचे प्राथमिक शिक्षण जि. प. शाळा सदाशिवनगर येथे पूर्ण झाले. तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय सदाशिवनगर येथे झाले. पुढे BSc gri चे शिक्षण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे पूर्ण केल. पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुणे येथील ILS Low College येथे वकिलीचे शिक्षण पूर्ण केले. २०२३ मध्ये एमपीएस मार्फत निघालेल्या महसूल सहाय्यक या पदाची परीक्षा देत तिने पहिल्या प्रयत्नात मध्येच हे यश संपादन केले. प्रियंकाच्या वडीलांचा ऊसतोडीचा व शेतीचा व्यवसाय असून आई गृहिणी आहे.

## संग्राम मध्यवर्ती मंडळातर्फे शिवरायांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १९ फेब्रुवारी-**



माढ्यातील संग्राम मध्यवर्ती मंडळाच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती छत्रपती शिवाजी महाराज चौकात साजरी करण्यात आली. यावेळी माजी आ. बबनराव शिंदे, माजी आमदार धनाजीराव साठे शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत नगराध्यक्षा मिनल साठे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मंडळाचे आधारस्तंभ माजी जि.प. सदस्य झुंजारनाना भांगे संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे राजाभाऊ चवरे गुरुराज कानडे उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे नगरसेविका संजीवनी भांगे अनिता भांगे शितल मस्के कल्याणी ढेकळे प्रमिला भांगे आदी मान्यवर उपस्थितीत होते. संग्राम मध्यवर्ती मंडळाच्या वतीने शिवजन्मोत्सवा निमित्त अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे यामध्ये १९ फेब्रुवारी रक्तदान शिबिर सायंकाळी ६ वा शिवजन्मोत्सव पाळणा २० फेब्रुवारी पुणे येथील शिवगर्जना शिवगीते स्फूर्ती गीते गोंधळ संबळ इत्यादी २१ फेब्रुवारी खुल्या डान्स स्पर्धा तसेच २२ फेब्रुवारीला मिरवणुकीचे ही आयोजन करण्यात आले आहे. शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी दिनेश जगदाळे, अजित भांगे, बाबा मस्के, सुरेश भांगे, बाळकृष्ण गायकवाड, जिवन ढेकळे, उमेश केदार, भैय्या कांबळे, दर्शन कदम, रणजीत भांगे, निशांत पालकर, दिगंबर भांगे, राजू भांगे, मंगेश मस्के, अमर पालकर, मारुती भांगे, स्वप्नील खरात, अनिकेत चवरे, गाडेकर, प्रदीप भांगे, भैय्या खरात, विवेक मुळे हे परिश्रम घेत आहेत.

### भव्य मोटरसायकल रॅली

शंभू साठे यांच्यावतीने शिवजन्मोत्सवानिमित्त मध्यवर्ती मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच भव्य मोटरसायकल रॅलीचेही आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये शेकडो मोटरसायकल स्वारांनी सहभाग नोंदला होता.



## भारतीय बौद्ध महासभेकडून शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ फेब्रुवारी-**

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा राजमाता जिजाऊ मंगल कार्यालय बागेहळ्ळ रोड येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास कमलाकर कांबळे, दिलीप कदम, राजकुमार बनसोडे, श्रीशैल शिवशरण, सिद्धाराम घटकांबळे, दत्ता कांबळे, शंभू देव सूर्यवंशी, मुख्याध्यापिका सिद्धवा शिवशरण, भीमाशंकर घटकांबळे, आकाश गायकवाड तालुका संस्कार प्रमुख, दिलीप शिवशरण, अनिल बनसोडे, कृष्ण धोडमणी, सैदप्पा झळकी जिल्हा उपाध्यक्ष आर पी आय, चंद्रकांत शिंदे, मालकांण्णा सोनकांबळे, दोडमनी सरपंच आंदेवाडी, मेहंदिमिया जिडगे आरपीआय शहराध्यक्ष दुधनी, शिवशंकर गुंजले आदींची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवराच्यां हस्ते छत्रपती शिवरायाच्यां मुर्तीचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मेहंदिमिया जिडगे, सैदप्पा झळकी, मुख्याध्यापिका सिध्धव्वा शिवशरण यांनी मार्गदर्शन केले.



## कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात शिवाजी महाराजांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ फेब्रुवारी-**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालय व मराठा एकता मंडळ,छत्रपती कॉलनी बहुद्देशीय मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने रयतेचे राजे,कुळवाडी भूषण हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती साजरी करण्यात आली.

प्रथमता सुप्रसिद्ध धन्वंतरी डॉ.भरत गायकवाड, कर्मवीर ग्रंथालयाचे अध्यक्ष जयकुमार शितोळे यांचे हस्ते छत्रपतीच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला व त्यानंतर छत्रपतींची सामुहिक आरती घेण्यात आली. त्यावेळी मधुकांत ठोकळ, सुखदेव दिवटे, राजू राऊत, संजय राऊत, बाळासाहेब पवार, हेमंत जाधव, प्रा. किरण गाढवे, नितीन गव्हाणे उपस्थित होते. यावेळी छत्रपतींच्या इतिहासावर सार्थक मस्के, श्लोक मस्के, सोहम देशमुख, उत्कर्ष उमाकांत ठोकळ, सुश्रूत राऊत या बालमावळ्यांनी भाषणे केली. कार्यक्रमासाठी प्रेम अग्रवाल, प्रसाद बारबोले, राहुल लोंढे, विवेक कदम, सौरभ घाडगे, अक्षय पोकळे, अंश देशमुख, मंथन घावटे उपस्थित होते. यावेळी कर्मवीर ग्रंथालयाचे सभासद चि.विवेक विठ्ठल कदम यांची सरळ सेवेमधून सांगली जिल्हा परिषद येथे लेखा अधीक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल ग्रंथालयाचेवतीने मोत्याची माळ व ग्रंथभेट देवून सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी तर आभार सुखदेव दिवटे यांनी मानले.

## संगीत शिक्षक प्रसाद सहस्त्रबुद्धे शिवश्री पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ फेब्रुवारी-**

सोजर इंग्लिश स्कूलच्यावतीने शिवजन्मोत्सवाचा सोहळा संपन्न झाला. यावेळी जनस्वराज्य फाऊंडेशन संस्था पुणे संचालक दशरथ उकिरडे उपस्थित होते.

सोजर इंग्लिश स्कूलच्या शिवजन्मोत्सव कार्यक्रमामध्ये जनस्वराज्य फाऊंडेशन पुणे या संस्थेमार्फत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना शिवश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावेळी शिक्षक प्रसाद सहस्त्रबुद्धे यांच्या संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे प्रतिपादन संचालक दरथ उकिरडे यांनी केले. या कार्यक्रमात शिवश्री २०२५ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच पुढील सर्वोत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष अरुण बारबोले, संस्था सदस्य उमाकांत राऊत, मोहन लोहार तसेच माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संदीप पोळ, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रिटा नेटके यांनी अभिनंदन केले.



## वागदरी जि.प. शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट,दि. १९ फेब्रुवारी**

जि. प. प्राथमिक मराठी शाळा, वागदरी (ता.अक्कलकोट) या शाळेत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोष पोमाजी होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटोचे पूजन संतोष पोमाजी व मारुती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. पार्थ कलबुर्गी, वेदांत अवताडे, श्रावणी सुरवसे, मनिषा यादव या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज यांच्याविषयी माहिती सांगितली. संग्राम पोमाजी हा महाराजांच्या वेशभूषेत आला होता. मारुती शिंदे या पालकांनी छत्रपती शिवाजी महाराजाबद्दल माहिती सांगितली.

अनुसया कलशेट्टी व अर्चना गिरी यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गाण्यावर नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले यावेळी मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे, अनुसया कलशेट्टी, बनसोडे, अर्चना गिरी. मनिषा कुणाळे, कविता फड उपस्थित होते. कविता फड यांनी सूत्रसंचालन केले तर आभार मनिषा कुणाळे यांनी मानले

## आर्या महाविद्यालयात शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.१९ फेब्रुवारी-**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी संलग्न आणि विठ्ठल प्रतिष्ठान, निमगाव (टे.) संचलित आर्या कृषी महाविद्यालयात शिवजयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे मार्गदर्शक रणजीतसिंह शिंदे आणि महाविद्यालय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिवकालीन वेशभूषा परिधान करून पालखी सोहळा काढला.

जय भवानी, जय शिवाजी च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर शिवआरतीने वातावरण भक्तिमय झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन उबाळे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आर्या पब्लिक स्कूलचे प्राचार्य सागर थोरात आणि शिवचरित्र अभ्यासक दत्तात्रय चव्हाण उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. तृप्ती राठोड आणि प्रा. ज्ञानेश्वरी झोळ यांनी केले. प्रा. तुषार नामदे यांनी आभार मानले. संस्थेचे प्रतिनिधी संभाजी पाटील, अरुण माने, तुषार तोडकरी यांच्यासह महाविद्यालयातील प्रा. संदीप मुरुमकर, प्रा. खंडेराव वाघे, प्रा.अमोल माळी, प्रा.हनुमंत निगुडे, रोहित घळके, कुमार शिंदे उपस्थित होते.



## मंत्री भरत गोगावलेंनी घेतले विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ फेब्रुवारी-**

राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी गुरुवारी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते रोजगार हमी मंत्री गोगावले यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी आ. राजू खरे, उपजिल्हाधिकारी अंजली मरोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधिन शेळकंदे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकासाची अधिकारी सुशील संसारे उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मोडनिंब येथे पालखी सोहळा, पाळणा




मोडनिंब (ता. माढा) येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. सार्वजनिक शिवजन्मोत्सव मंडळ, राजवाडा परिसर, भगव वादळ आदी मंडळांकडून ठिकाणी शिवमूर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली. ग्राम पंचायत कार्यालयात प्रतिमा पूजन करण्यात आले. लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात प्रतिष्ठापना झाली. सकाळी ९ वाजता शिवतीर्थावरून पालखी सोहळ्याला सुभेदार तानाजी मालुसरे चौकातून प्रारंभ झाला. श्रीराम चौक, शिवशक्ती चौक, जय भवानी चौक, तानाजी चौक, स्वामी समर्थ चौक, छत्रपती शिवाजी महाराज नगर येथून छत्रपती संभाजी महाराज नगर येथे सांगता करण्यात आली. झुलवा पाळणा पाळणा बाळ शिवाजीचा.. म्हणत महिलांनी पाळणा गायला. त्यानंतर आरती करण्यात आली. यावेळी सर्वज्ञा तोडकरी, नक्षत्रा पुरवत, अक्षरा लादे,शौर्या गडेकर, गार्गी पाटणे, स्वरा मुळे, यांनी पारंपरिक शिवकालीन वेशभूषा साकारली होती.



# जिल्ह्यात शिवजयंतीचा उत्साही जल्लोष

## शिवजयंती उत्साहात



### न्यू. इंग्लिश स्कूल, करकंब

श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती न्यू.इंग्लिश स्कूल करकंब येथे विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. शिवजयंती उत्सवानिमित्त प्रशालेमध्ये शिवचेतना प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेमध्ये करकंब व करकंब परिसरातील १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे,सचिव देवकते, स्कूल कमिटी अध्यक्ष प्रशांत वेळापूरकर, मुख्याध्यापिका संगीता करमाळकर उपस्थित होते.




### अणदूरमध्ये शिवाजी महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

येथील वत्सला नगर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवा निमित्त आज सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अणदूर गावचे उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, तर प्रमुख अतिथी म्हणून माझी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे, ग्रामपंचायत सदस्य डॉक्टर विवेक बिराजदार, बालाजी घुगे, नळदुर्ग पोलीस स्टेशनचे बीट अंमलदार शिंदे, पोर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्थेच्या सचिव बाबई चव्हाण, धर्मवीर संभाजीराजे तरुण मंडळाचे अध्यक्ष विष्णू कदम उपाध्यक्ष पांडुरंग जाधव, सचिव दिनकर मोठे, मिरवणूक प्रमुख नागनाथ लक्ष्मण चव्हाण उपस्थित होते. यावेळी बालाजी बोर्डे, बालाजी जाधव, प्रवीण जाधव, मिलिंद कदम, दिनेश चव्हाण, पुष्पा मातोळे ,माया चव्हाण, सुरेखा तोग्गी जयश्री ढेपे, सचिन चव्हाण उपस्थित होते.



### वळसंग अंगणवाडी

वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथील अंगणवाडी क्रमांक १ मध्ये महाराष्ट्राचे स्वाभिमान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वेशभूषा परिधान केलेले राजमाता जिजाबाई श्रीशा व बाल शिवाजी राजे अथर्व यांच्या हस्ते छत्रपती राजेंचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अंगणवाडी चिमुकल्याने जय भवानी जय शिवाजी जयघोष देत छत्रपती राजांचे जयकार केले. श्री शंकरलिंग प्रशालेचे शिक्षक बसवराज दुधगी यांनी बाल शिवाजी जीवनाचे मार्गदर्शन केले. पालक धानम्मा बणगार,साक्षी कारीमुंगे, ऐश्वर्या कलशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी सेविका भागीरथी बिराजदार व मदतनीस मंगल कोळी यांनी परिश्रम घेतले.



### मंगळवेढा आगार

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मंगळवेढा आगारात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आगार व्यवस्थापक संजय भोसले, वाहतूक निरीक्षक योगेश गवळी, सहाय्यक वाहतूक निरीक्षक रावसाहेब चव्हाण तसेच संज्योत भोसले उपस्थित होते. तसेच वरिष्ठ लिपिक अमोल काळे, परमेश्वर भालेकर, धनाजी पाटील, उमेश ननवरे, भिमराव कदरकर, सचिन माने, वाहतूक नियंत्रक संतोष चव्हाण, श्रीमती सविता काटकर,कीर्ती घंटे, वेदिका सूर्यवंशी, सागर माने, वाहक लोखंडे, सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक श्री साहेबराव इंगोले, सिद्धेश्वर पवार, संघटना प्रतिनिधी अनिल बेदरे, अमोल बड्डे, गणेश गवळी, गणेश हजारे तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे प्रशिक्षणार्थी अभय बंडगर, समर्थ गवळी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील विविध शाळा, संस्थांतर्फे शिवजन्मोत्सवाचा पाळणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

**जिल्ह्यातील विविध शाळा, संस्था, महाविद्यालय, संघटनांतर्फे महाराष्ट्राचे आराध्य दैवत व जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती विविध उपक्रमांनी साजरी करुन शिवरायांना मानवंदना देण्यात आली. योवळी विविध मंडळांच्यावतीने शिवजन्मोत्सव पाळणा, रॅली, स्वच्छता अभियान आदी विविध उपक्रमांमधून शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**

### पंढरपुरात मनसेच्या वतीने मिठाईवाटप; रिक्षा रॅली

शहरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. अभिजीत पाटील, मनसे नेते दिलीप धोत्रे, नागेश भोसले, क्नागेश गंगेकर, नगरसेवक लखन चौगुले, दत्ता काळे, अनिल बागल, गणेश पिंपळनेरकर, दिनेश चव्हाण, मधुकर फलटणकर,पप्पू भालेराव, संजु भालेराव, दत्ता भालेराव, पिंटू वाठारकर, बंडू वाठारकर, धनु देशमाने, नवनाथ रोकडे, दत्ता वाठारकर, दिपक वाखरकर, राजु खाडाखाडे, रमेश चव्हाण, मोहन भालेराव, सतिश झेंड, अशोक बिराजदार, सचिन भालेराव, भागवत मेटकरी, बंडु शिंदे, पांडु होनकळस, सोमा महारनवर, प्रभु चौहान उपस्थित होते. याप्रसंगी नवी पेठ परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दिलीप धोत्रे यांच्या हस्ते शिवभक्तांना मिठाई वाटप करण्यात आली. यावेळी फटाक्याची आतषबाजी करण्यात आली. यानंतर शहरात रिक्षा रॅली काढण्यात आली.




छावा चित्रपट पाहण्यासाठी प्रोत्साहन म्हणून छावा चित्रपटाचे तिकीट दाखवा आणि हॉटेल ग्रँड, हॉटेल श्रीयश रेस्टॉरंट येथे जेवणाच्या बिलावर २५ टक्के सूट मिळवा. महाराष्ट्र निर्माण सेनेच्या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी केले आहे.

## ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती साजरी

### मंद्रुपमध्ये डाल्बीमुक्त मिरवणूक

मंद्रुपमध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत व जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मंगळवारी १८ फेब्रुवारी रोजी रात्री दहा वाजल्यापासून मध्यवर्ती छत्रपती शिवजन्मोत्सव मंडळाचे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडल्यानंतर रात्री बारा वाजल्यानंतर हनुमान मंदिरासमोर पाळणा कार्यक्रम पार पडला. सरपंच अनिता कोरे व राष्ट्रमाता जिजाऊ सेवासंघाच्या अध्यक्षा सुजाता नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत पाळणा कार्यक्रम पार पडला. यावेळी मध्यवर्ती छत्रपती शिवजन्मोत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रदीप ख्याडे, अपाध्यक्ष प्रदीप कोळी, नागेश साठे, रोहीत सावंत, अरविंद नरूटे, समर्थ साठे, अतुल नवले, रतिकांत हजारे, रवि केवटे, शेखर भागवत, बसवराज घाटे, गणेश नवले उपस्थित होते. बुधवारी सकाळी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच अनिता कोरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुरेश टेळे, शिवपुत्र जोडमोटे, सूर्यकांत मेंडगुदले, ग्रामपंचायत अधिकारी नागेश जोडमोटे, अनिल जाधव, ज्योतीर्लिंग सावंत, सचिन साठे, दयानंद ख्याडे, इरण्णा म्हेत्रे , मलकारसिध्द शेंडगे, युवराज साठे, रविराज हेसे, दत्तात्रय साठे, ओंकार झेंडेकर, सोमनाथ नवले, सोमनिंग कांबळे, विशाल केवटे उपस्थित होते.



#### शुक्रवारी डॉल्बीमुक्त मिरवणूक

मध्यवर्ती शिवजन्मोत्सव मंडळाची शुक्रवारी दि. २१ फेब्रुवारी रोजी पर्यावरण संवर्धनासाठी डॉल्बीमुक्त मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी नाशिक ढोल व पारंपारिक वाद्यांचा वापर करण्यात येणार आहे. शिवभक्तांनी मोठया प्रमाणा सहभागी व्हावे.

**-सचिन साठे, प्रमुख,**
**मध्यवर्ती छत्रपती शिवजन्मोत्सव मंडळ, मंद्रुप**

### महर्षी संकुल, अकलूज

शंकरनगर येथील महर्षि शंकरराव मोहिते-प्रशाला, लक्ष्मीबाई कन्या प्रशाला व महर्षि प्रशाला प्राथमिक विभागाच्यावतीने संयुक्तपणे महर्षि संकुल येथे संस्थापक छ.शिवाजी महाराज यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे युवा नेते सयाजीराजे मोहिते-पाटील हे होते तर प्रमुख उपस्थिती इतिहास अभ्यासक प्रा. रोहीत देशमुख, ॲड. नितिन खराडे, लेखक प्रा. तुळशीराम मिसाळ. डॉ. सावन पालवे, राष्ट्रीय स्वयंसेविका पुरस्कार प्राप्त प्रभावती लंगोटे, प्रशाला समिती सदस्य अनिल जाधव, नितिन इंगवले-देशमुख, विनोद जाधव उपस्थित होते. छ.शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त प्रशालेतील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने प्रशालेचे माजी विद्यार्थी व अकलूजमध्ये नव्यानेच चालू केलेल्या रुद्रा डेंटल क्लिनीकचे डॉ. सावन पालवे, स. म. शंकरराव मोहिते-पाटील साहित्य पुरस्कार कार्यक्रमामध्ये प्रकाशित झालेल्या दोन पुस्तकांचे लेखक प्रा. तुळशीराम मिसाळ,राष्ट्रीय स्वयंसेविका पुरस्कार प्राप्त प्रभावती लंगोटे यांना सयाजीराजे मोहिते-पाटील यांचे हस्ते याप्रसंगी सन्मानित करण्यात आले. प्रस्ताविक मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी केले. यावेळी प्रशालेतील रूद्रा घाडगे, देवगिरी चुंगे, विश्वतेज लोकरे, वृंदा बाबर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन नाजिया मुल्ला यांनी केले तर आभार प्रथमिक विभाग मुख्याध्यापक शिवाजी पारसे यांनी मानले.



### स्विमिंग ग्रुप, अक्कलकोट

छत्रपती शिवरायांचे शौर्य येणाऱ्या प्रत्येक पिढीसाठी प्रेरणास्रोत असल्याचे मनोगत श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व स्विमिंग ग्रुपचे संस्थापक महेश इंगळे यांचे सुपुत्र प्रथमेश इंगळे यांनी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त स्विमिंग ग्रुपच्या वतीने संस्थापक महेश इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रथमेश इंगळे बोलत होते. याप्रसंगी ग्रुपचे सदस्य संतोष पराणे, सचिन किरनळ्ळी, शिवशरण अचलेर, शैलेश राठौर, अमर पाटील, सुनिल पवार, विश्वनाथ देवरमनी, शेखर आडवितोटे, मल्लिनाथ माळी, अरविंद पाटील, अमर पाटील, भासगी, स्वामीनाथ मुसळे,अशोक कलशेट्टी, हनुमंत माळी, विश्वनाथ शिंदे, बाबा सुरवसे, श्रीकांत झिपरे, श्रीशैल गवंडी, सुनिल पवार, गिरीश पवार, खाजप्पा झंपले, संतोष जवळगे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, तुषार मोरे, ज्ञानेश्वर भोसले, मनोज जगताप उपस्थित होते.

### सायक्लर्स ग्रुपचे स्वच्छता अभियान, पंढरपूर

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने पंढरपूर सायकलर्स क्लब यांनी भंडीशेगाव येथील श्रीमंत बाजीराव पेशवे विहीर येथे स्वच्छता अभियानाचे आयोजन केले होते. यावेळी पंढरपूर येथून ६५ सायकल स्वाराने या स्वच्छता अभियानात आपला सहभाग नोंदवला असल्याचे क्लबचे अध्यक्ष अभिजीत कुलकर्णी यांनी यावेळी सांगितले. पंढरपूर सायकलर्स क्लब या ग्रुपचे स्वागत गणेश पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन निवेदिका रेखा चंद्रराव केले. यावेळी आफ्रिका मॅरेथॉनमध्ये सहभाग असलेले मुसाक काझी, डॉ. सदानंद पाटील, प्रकाश शेटे,सुरज अष्टेकर, विठ्ठल पाटील, श्रीकांत बडवे, सतीश चंद्रराव, अनिकेत गोजारी, महेश भोसले, किरण हंडोरे, प्रशांत मोरे, संतोष पाटोळे, संतोष कवडे, विवेक कुलकर्णी, भंडशेगाव येथील डॉ. हेडगेवार वाचनाचे अध्यक्ष महेंद्र येलपले, विठ्ठल विभुते, बिभीषण अंपाळकर, अशोक येलपले, बाळासाहेब येलमार, कॅप्टन शामराव लोकरे, अभ्यासिकेचे अध्यक्ष डॉ. श्रीधर यलमार, वर्षा येलमार आदी उपस्थित होते.



### यमाईदेवी आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांची मिरवणूक

संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर संचलित यमाई देवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी (ता. उत्तर सोलापू येथील आश्रम शाळेत महाराष्ट्राचे आराध्य दैवत जाणता राजा शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे पत्रकार उज्वलकुमार माने यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक लांबतुरे, संस्थेच्या अध्याक्षा सुरेखा लांबतुरे, सचिव मधुकर, मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे-गवळी, ज्येष्ठ शिक्षक नानासाहेब लोखंडे, महादेव करे, तानाजी तानगावडे, संगीता व्हनकोळे-जाधव, विद्या हराळे- लांबतुरे, अशोक देशमुख, विनोद कोळेकर, अमोल गुरव, बसवराज तुळजापुरे, संदीप चव्हाण उपस्थित होते. यावेळी मार्डी गावातून भव्य भगवी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी उपसरपंच युवराज पवार, शिवाजीराव सोनार, विष्णू जगताप, मनोहर जगताप नामदेव गवळी, हंबीर बोंगे, तानाजी गरड, जगताप, माने, डांगे उपस्थित होते. यावेळी ढोल-ताशाच्या गजरात लेझीम पथक, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्माचा पाळणा गीत, आम्हीं शिवकन्या, इगत मांडली या आशा शिव भक्ती गीतावर विदयार्थी - विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले. मिरवणुकीत दुर्गा बंडेवाड हिने माँसाहेब जिजाऊ यांची तर कृष्णा साठे याने छत्रपती शिवाजी महाराज यांची वेशभूषा करुन घोड्यावर बसून सर्व उपस्थितांची लक्ष वेधून घेतले होते. मिरवणूक पर्णकुटी, साठे नगर, एस टी स्टँड परिसर, शनिवार पेठ, माळी गल्ली येथून काढण्यात आली. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी नानासाहेब लोखंडे व विनोद कोळेकर यांचे सहकार्य लाभले.



### शिवजयंतीनिमित्त अकलूजमध्ये देखावे

अकलूज व परिसरात विविध सामाजिक संघटना, शिवजयंती उत्सव मंडळ शाळा महाविद्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेड यांच्या वतीने आयोजित केलेल्या शिवजयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील माजी सरपंच शिवतेसिंह मोहिते-पाटील, किशोरसिंह माने-पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, युवा नेते सयाजी राजे मोहिते-पाटील, पांडुरंग देशमुख, मराठा सेवा संघाचे उत्तम माने शेंडगे आदींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

सहकार महर्षी साखर कारखाना कार्यस्थळावर झालेल्या कार्यक्रमात चेअरमन शंकरराव माने-देशमुख यांच्या हस्ते अश्वारूढ पुतळ्याचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आला. अकलूज मधील महर्षी चौक, गांधी चौक, विजय चौक, जयसिंह चौक आदी ठिकाणी शिवजयंती उत्सव मंडळाच्या वतीने किल्ल्यांच्या प्रतिकृतीस शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. महर्षी चौकातील मंडळांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिषेक केले. अकलूज येथील किल्ल्यामधील शिवसृष्टीमध्ये नगर पंचायतच्या वतीने शिवजन्मोत्सव उत्साह साजरा करण्यात आला. शंकर नगर येथे उदयसिंह चौकातही देखावा उभा करून रक्तदान शिबिर घेण्यात आले. अर्जुननगर येथे देखावा उभा करण्यात आला होता अकलूज मराठा व्यावसायिक कल्याणकारी संघाच्या वतीने आयोजित केलेल्या शिबिरामध्ये ६७ जणांनी रक्तदान केले. या शिबीराचे उद्घाटन माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे, संघाचे अध्यक्ष ॲड. नितीन खराडे, उपाध्यक्ष विशाल गोरे, ज्येष्ठ संचालक डॉ. राजीव राणे, नवनाथ सावंत, डॉ. नितीन राणे, मनोज गायकवाड, नितीन देशमुख, डॉ. आनंद देशमुख, कृषी पर्यवेक्षक उदय साळुंखे, आण्णासाहेब शिंदे, मयूर माने आदी उपस्थित होते. रक्तदात्यांना ज्ञानदिप रक्त पेढीकडून प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी मुस्लिम बांधवासह युवक आणि महिलांनी रक्तदान केले. यावेळी गणेश महाडिक, विठ्ठल गायकवाड, इंद्रजित नलवडे, जगदीश कदम, कुंडलिक गायकवाड, दिलीप माने, योगेश देशमुख, विक्रांत माने-देशमुख,डॉ. सुरेश सुर्यवंशी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. प्रास्ताविक सचिव प्रा. धनंजय देशमुख यांनी केले तर आभार संचालक राम चव्हाण यांनी मानले.



धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नळदुर्ग येथे शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ फेब्रुवारी -**



भाजपचे माजी शहर अध्यक्ष पद्माकर घोडके यांच्या वतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी होळकर चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांची भव्य प्रतिमा प्रतिष्ठापना करण्यात आली होती. याठिकाणी माजी नगरसेवक उदय जगदाळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाचे आयोजक पद्माकर घोडके, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके,माजी नगरसेवक सुधीर हजारे, भाजपचे शहर अध्यक्ष धीमाजी घुगे, शहर व्यापारी मंडळाचे अध्यक्ष सतीश पुदाले, शहर चर्मकार समाज संघटनेचे अध्यक्ष शंकर वाघमारे, दीपक घोडके, विजय ठाकुर, मनोज मिश्रा, पत्रकार विलास येडगे, शिवाजी नाईक, सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव, बाबु टेलर, बंडप्पा कसेकर आदिजण उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



#### छत्रपतींच्या जयंतीनिमित्त मंडपाचे उद्घाटन

**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

जय भवानी तरूण मंडळ व जाणता राजा युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमानाने शिवाजीमहाराज जयंतीनिमित्त मंडपाचे उद्घाटन श्रीफळ फोडून व ध्वजारोहण करून ऊर्जामंत्र उच्चारून सभासद सुधीर महामुनी, वसंत कदम, नंदकुमार कुतवळ, प्रमोद देशमुख, बाळासाहेब मस्के, नंदकुमार मगर, हेमंत कणगरकर, भालचंद्र पाठक, विलास पुजारी, राजाभाऊ साळुंके, अमोल कुतवळ, आण्णा अमृतराव, संजय लोंढे, राजेश देशमुख, समाधान परमेश्वर, भैरवनाथ माडजे, नितीन मुर्तडक, प्रसाद कांबळे, सुनील देवळालकर, खंडु पोचले, रवि पाठक, प्रविण कदम, रवि मस्के, सुदर्शन वाघमारे, राजाभाऊ चोपदार, पृथ्वीराज मलबा, नागेश किवडे, गौरव साळुंके, प्रसाद प्रयाग, महेश पुजारी, शुभम खोले, प्रतिक प्रयाग, स्वप्नील पाठक, आदित्य बुरांडे, दादा मस्के, संकेत मस्के, महेश पुजारी असे अनेक ७३ वय वर्षापासून ते तरूण सर्व सभासद उपस्थित होते.

#### संत सेवालाल यांचे विचार आत्मसात करा

**उमरगा, दि.१९ फेब्रुवारी -**

संत सेवालाल महाराजांनी समाज प्रबोधनासाठी आपल्या बोलीभाषेतून अनेक भजने गायली, समाजातील प्रत्येक घटकांनी शिकावे, त्यांनी समाजातील तळागाळातील बांधवांना मदत करावी व त्याला मुख्य प्रवाहात सामील करावे असे ते नेहमी सांगत. घरची अत्यंत श्रीमंती असताना, लाखोचा व्यापार चालू असताना, त्यांनी आपले विचार राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचवले. म्हणूनच ते सर्वांसाठी पूजनीय आहेत असे प्रतिपादन व्यंकट वचने यांनी केले. संत सेवालाल महाराज यांची जयंती स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी सहशिक्षक व्यंकट वचने प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सविता लोहार होत्या.सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख संगीता भावसार यांनी तर आभार विवेक जाधव यांनी मानले.




#### ड्रग्ज माफियांचा बंदोबस्त करा : मोटे


**परंडा, दि.१९ फेब्रुवारी -**

परंडा शहरात आणि तालुक्यात मागील काही दिवसापासून ड्रग्स आणि अंमले पदार्थाची तस्करी आणि पुरवठा होत असून परंडा शहरात व तालुका परिसरात ड्रग्स माफिया गँग तयार झालेले आहेत, अशी लेखी तक्रार माजी आमदार राहुल मोटे यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली आहे. या दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले की, सध्या शहरात गँगच्या माध्यमातून एमडी ड्रग्स व तत्सम अंमले पदार्थाची वाहतूक विक्री आणि तस्करी होत आहे. तरुण वर्ग व्यसनाधीन होण्याची दाट शक्यता आहे यावेळी आवर घालून वेळीच बंदोबस्त करावा अन्यथा बंदोबस्त न केल्यास आपल्या राज्याचे व त्याचे भवितव्य असलेल्या तरुण पुढे उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. याकडे तातडीने लक्ष देवुन असे अवैध चालणारे बंद करण्यासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, असे निवेदनात म्हटले आहे.

## नळदुर्ग शहरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट, शिवसेनेचा पोलिसांना इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ फेब्रुवारी-**

नळदुर्ग शहर व पोलिस ठाण्याच्या हद्दीत ड्रग्स माफिया, चक्री जुगार, मटका, गांजा, गुटखा विक्री यासह अनेक अवैध धंद्यांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाला आहे. यामुळे युवापिढीचं भवितव्य धोक्यात आले असून, त्या पिढीचे कुटुंबही उध्वस्त होऊ लागले आहेत. या अवैध धंद्यांमुळे अनेक युवक कर्जबाजारी, व्यसनाधीन होऊन गरीब झाले आहेत. काही युवकांना आपल्या व्यसनांमुळे प्राण गमवावे लागले आहेत. अशा परिस्थितीत स्थानिक शिवसेनेच्या नेतृत्वाने पोलिस प्रशासनाला तात्काळ कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.



शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांनी १९ फेब्रुवारी रोजी नळदुर्ग पोलिसांना निवेदनात म्हटले की, नळदुर्गमध्ये अवैध धंद्यांचे प्रमाण वाढले आहे आणि त्याचबरोबर ड्रग्स माफिया सक्रिय झाले आहेत.

या सर्व अवैध धंद्यांमुळे शहरातील वातावरण दूषित होत असून, त्यामुळे युवा पिढीच्या भवितव्यासाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे. पोलिसांनी त्वरित या अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवून, ड्रग्स माफियांची मुस्कटदाबी करावी. तसेच, अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि पोलिस ठाण्यासमोर अमरण उपोषण केले जाईल.

निवेदनावर शिवसेनेचे शहर प्रमुख शिवाजी सुरवसे, दीपक घोडके, मनोज मिश्रा, व्यापारी मंडळाचे अध्यक्ष सतीश पुदाले, इरफान शेख, मुक्तार नदाफ, अफझल कुरेशी, गौस कुरेशी, बंडप्पा कसेकर, सचिन शिंदे आणि किशोर घोडके यांची स्वाक्षऱ्या आहेत.



**धाराशिव -** स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपचे तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी शहरासह जिल्हाभरातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी त्यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहारही अर्पण करण्यात आला.

## मध्यवर्ती शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शिवरायांची आरती



**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजीमहाराज जयंती जय भवानी तरूण मंडळ व जाणता राजा युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमानाने मध्यवर्ती शिवाजीमहाराज जयंतीनिमित्त आरतीसाठी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आले होते. मंत्री श्री.पाटील यांचा सत्कार मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अमोल कुतवळ यांनी केला. सोबत सुरेश बिराजदार, महेंद्र धुरगुडे, गोकुळ शिंदे, बबलु सुर्यवंशी, मंडळाचे अध्यक्ष सुदर्शन वाघमारे, समाधान परमेश्वर, प्रविण कदम, संजय लोंढे, नागेश किवडे, बाबा मस्के, किरण पाठक, अंबादास पोफळे मंडळाचे सभासद उपस्थित होते.

# 'जय शिवाजी, जय भारत' पदयात्रेत युवा वर्गाचा सहभाग

**भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन...शिवाजी महाराज की जय घोषणेचा गजर..**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त आज १९ फेब्रुवारी रोजी जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'जय शिवाजी,जय भारत' पदयात्रा काढण्यात आली.

सकाळी १० वाजता या पदयात्रेची सुरुवात श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुल येथून करण्यात आली. पदयात्रेच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाला खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर,आमदार कैलास पाटील,आमदार राणाजगजितसिंह पाटील,जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलीस अधीक्षक संजय जाधव,शिक्षणाधिकारी(माध्यमिक) सुधा साळुंके,जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे,नेहरू युवा केंद्राचे समन्वयक धनंजय काळे,शिवछत्रपती पुरस्कारार्थी डॉ. चंद्रसेन जाधव,व खो खो विश्वचषक स्पर्धेतील सुवर्ण पदक विजेती जिल्ह्याची कन्या अश्विनी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त मान्यवरांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला.भारतीय संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन उपस्थित विद्यार्थी,अधिकारी व नागरिकांनी केले.यावेळी खो खो विश्वचषक स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती खेळाडू अश्विनी शिंदे हिने पदयात्रेला हिरवा झेंडा दाखविला. यावेळी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथून सुरू झालेल्या पदयात्रेत शासकीय परिचारिका महाविद्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र, शासकीय तंत्रनिकेतन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भारत स्काऊट गाईड, नेहरू युवा केंद्र, तेरणा इंजिनिअरिंग कॉलेज, पोदार इंटरनॅशनल स्कुल, राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी व खो खो संघटना, सरस्वती विद्यालय,तेरणा हायस्कूल, भाई उद्धवराव पाटील प्रशाला, श्री.श्री.रवीशंकर विद्या मंदिर, भारत विद्यालय, शरद पवार विद्यालय, आर्य चाणक्य विद्यालय, सह्याद्री व बिल गेट्स नर्सिंग स्कुल यासह अन्य विद्यार्थी, शिक्षकवृंद, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. पदयात्रेत विद्यार्थ्यांनी दिलेल्या छत्रपती शिवाजी महाराज की जय या घोषणेने आसमंत दुमदुमून गेला.



अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी हे राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज व शिवाजी महाराजांचे मावळे यांच्या वेशभूषेत सहभागी होते. पदयात्रेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, त्यांचे पराक्रम, राष्ट्रप्रेमाची शिकवण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात मदत झाली.

## ड्रग्स संदर्भात काहीही आढळून आल्यास पोलिसांना माहिती द्यावी

**पोलीस प्रशासनाचे जनतेस आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ फेब्रुवारी -**

धाराशिव पोलीसांची अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई पोलीस ठाणे तामलवाडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मागील दोन महिन्यांपासुन छुप्या मार्गाने अंमली पदार्थ विक्री होत असल्याच्या बाबत काही तक्रारी पोलिसांकडे प्राप्त होत होत्या. तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस प्रशासनाने तामलवाडी येथे ड्रग्स तस्करी करणाऱ्यावर कारवाई करून तीन आरोपींना ताब्यात घेतलेल्या नंतर पोलीस प्रशासनाकडून सतर्क राहण्यासाठी आवाहन केले की, अशा कृत्यामध्ये शामील असलेल्या कोणत्याही व्यक्तीची गय केली जाणार नाही.

त्यांचेवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरीकानी अशा अंमली पदार्थाचे छुप्या विक्री, वाहतुक, व्यवसाय करणारे इसमांची माहिती पोलीसांना द्यावी. नागरीकांना विषेशत: युवकांना अवाहन करण्यात आले की अंमली पदार्थ तसेच व्यसनांपासून दूर रहावे. हे आरोग्यासाठी घातक आहे. व्यसनाधिनतेतून मनुष्य गुन्हेगारी कडे वळतो त्यामुळे त्याचे जीवन अंधकारमय होते.

अंमली पदार्थाचे व्यसन हे समाजासाठी घातक आहे. त्या पासून दूर रहावे. नागरीकांना आवाहन केले की, अंमली पदार्था बाबत कोणतीही माहिती मिळाल्यास पोलीस अधीक्षक कार्यालय मोबाईल नंबर ८००७३३१००० यावर माहिती देवून पोलीसांना सहकार्य करावे, त्यांचे नावे गोपनीय ठेवण्यात येतील.

## शिवजन्मोत्सव सोहळा नाचून नाहीतर वाचून साजरा करण्याची शपथ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

गडपाटी धाराशिव येथील डॉ. वेदप्रकाश पाटील एज्युकेशनल कॅम्पस मध्ये आयोजित चॅम्पियन्स अरेना २०२५ कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाने झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.बापूजी साळुंखे विधी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.इकबाल शहा आणि सोजर कॉलेज ऑफ फार्मसी बार्शीचे प्राचार्य डॉ.सुजित करपे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त डॉ.प्रतापसिंह पाटील आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शेख गाझी यांचे मार्गदर्शन लाभले.



अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी प्रणिता फाटक, भावेश्री वानखेडे आणि महादेवी वाघमारे यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याविषयी माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवजन्मोत्सव 'नाचून नाहीतर वाचून' साजरा करण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अविनाश शेरखाने, ऋषी डोंगरे, अनंत ढेकळे आणि इतर विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली. याशिवाय प्रा.मुझकीर पठाण यांनी मैदानी खेळाच्या स्पर्धांसाठी मेहनत घेतली.

## उद्भव विहिरींची कामे अपूर्ण असल्याने योजनेच्या अंमलबजावणीस विलंब

**कामे वेळेत पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदाराला दंड...जाणीवपूर्वक कामे टाळणाऱ्याचे कंत्राट रद्द करण्याचा प्रस्ताव...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

जिल्ह्यातील ६९ गावांमध्ये पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक असलेल्या जागेचा ताबा ग्राम पंचायतींकडून उशिरा मिळाल्याने योजनांच्या अंमलबजावणीत विलंब झाला. तसेच, महाराष्ट्र ग्रामीण पेयजल योजनेतील (म.प्रा.रो.ह.यो.) उदभव विहिरी अपूर्ण स्थितीत असल्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या.

३८ योजनांचे उदभव अयशस्वी झाल्याने नवीन प्रमाणपत्र मिळवून सुधारणा करावी लागली. त्यामुळेही कामांना उशीर झाला आहे.काही योजनांचे काम संथगतीने सुरू आहे. त्यांना निविदा अटींनुसार मुदतवाढ देण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या मार्गदर्शनात वेळोवेळी आढावा बैठक घेण्यात येत असून, कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. जल जीवन मिशन कार्यक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील ५९४ पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. या योजनांतर्गत ग्रामस्थांना प्रति माणशी ५५ लिटर दररोज पाणीपुरवठा केला जाणार आहे.२४६ योजना पूर्ण करून ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात आल्या असून, त्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

३४८ योजनाची कामे प्रगतिपथावर आहेत. त्यापैकी ११५ योजनांचे ७६ ते १०० टक्के काम पूर्ण, १३५ योजनांचे ५१ ते ७५ टक्के काम पूर्ण, ७० योजनांचे २६ ते ५० टक्के काम पूर्ण, २७ योजनांचे २५ टक्केपेक्षा कमी काम पूर्ण आहे.

ठरलेल्या मुदतीत काम पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांना ०.५ ते ६ टक्के दंड आकारण्यात आला आहे. जाणीवपूर्वक काम टाळणाऱ्या ठेकेदारांचे कंत्राट रद्द करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून,

त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाणार आहे.

पाणीपुरवठा योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी कठोर पावले उचलली जात असून, अपूर्ण योजनांचे काम गतीमान करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मोहन सरवदे यांनी दिली.

# सयाजी अ‍ॅग्रो प्रोड्यूसर कंपनी शेतकऱ्यांचा आधारवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होऊन त्यांच्या उत्पन्नात भर पडावी,यासाठी केंद्र व राज्य शासन विविध योजना राबवत आहे. कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन योजनेअंतर्गत कळंब तालुक्यातील शेळका (धानोरा) येथील सयाजी अ‍ॅग्रो प्रोड्युसर कंपनी लिमिटेड शेतकऱ्यांसाठी आधारवड ठरली आहे.

या कंपनीने कृषी विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या बियाण्यांची ३० हेक्टर क्षेत्रावर पेरणी केली.त्यानंतर सुतळी बारदान्यावर क्युआर कोड लावून सोयाबीन खरेदी केली. विशेष म्हणजे, बाजारभावापेक्षा अधिक ४,५०० रुपये प्रति क्विंटल दर दिल्यामुळे शेतकऱ्यांचा या कंपनीवरील विश्वास वाढला आहे.

सन २०१८ साली ८५० पुरुष आणि ६५० महिला, असे एकूण १५०० शेतकरी एकत्र येऊन सयाजी अ‍ॅग्रो प्रोड्यूसर कंपनीची स्थापना केली. पाच संचालकांमध्ये तीन पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे. सन २०२१ पासून कंपनीने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.






स्मार्ट योजनेअंतर्गत कंपनीने १ कोटी १५ लाख रुपये खर्चून १००० टन धान्य साठवणूक क्षमता असलेले गोदाम आणि ३० लाख रुपयांची मशनरी शेड बांधले. याशिवाय २५ लाख रुपयांची अत्याधुनिक यंत्रसामग्री बसवली असून ४७ किलोवॅटचा सोलर प्लांट उभारणीची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

सन २०२१-२२ मध्ये पोखरा योजनेअंतर्गत १३० टन क्षमतेचे गोडाऊन बांधण्यात आले. या गोडाऊनसाठी एकूण २० लाख रुपये खर्च आला असून यासाठी शासनाकडून १०.५ लाख रुपये अनुदान मिळाले आहे.

कंपनीकडून प्रमाणित बियाणे सभासद शेतकऱ्यांना पुरवले जातात.पिकाच्या काढणीनंतर चाळणी प्रक्रिया करून क्युआर कोड लावलेल्या सुतळी बारदान्यात पॅकिंग केले जाते. हमाली किंवा इतर कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय शेतकऱ्यांना एकरकमी रक्कम दिली जाते.

पूर्वी माल प्रक्रिया करण्यासाठी इतरांना प्रति क्विंटल १०० रुपये द्यावे लागत होते, परंतु आता ही प्रक्रिया कंपनी स्वतः करत असल्यामुळे खर्चात बचत होत आहे. संचालक आणि सदस्यांनी नियोजनबद्ध कामकाज करून कंपनीच्या पारदर्शक धोरणामुळे शेतकऱ्यांचा कंपनीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. सयाजी अ‍ॅग्रो प्रोड्यूसर कंपनीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि पारदर्शक व्यवहार यामुळे इतर शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी आदर्श निर्माण केला आहे.

# जय जिजाऊ...जय शिवरायाच्या घोषणांनी दुमदुमले शहर









**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, १९ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज शहरात उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण ओसंडून वाहताना दिसून आले.

शिवजयंती निमित्ताने प्रमुख मार्गासह अन्य रस्त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे बॅनर लावण्यात आले. छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यासाठी नांदेड शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिर, अन्नदान, व्याख्यान आदी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. दुचाकी रॅली, भगवे झेंडे हातात घेऊन छत्रपती शिवरायांचा जयघोष करत आपल्या राजाला अभिवादन करण्यासाठी त्यांच्या पूर्णाकृती अश्वारूढ पुतळ्याकडे जाताना दिसत होते. सकाळीच खा. अशोकराव चव्हाण, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार बालाजी कल्याणकर, आ. श्रिजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, महापालिका आ. आनंद बोंढारकर, माजी आमदार अमर राजूरकर, संतूक हंबर्डे, भाजपचे प्रवीण साले, प्रजासत्ताक पार्टीचे सुरेश गायकवाड, नंदकुमार बनसोडे यांच्यासह अनेकांनी अभिवादन केले. शहरात सर्वत्र भगवेमय वातावरण पसरले. या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, पोलीस निरिक्षक परमेश्वर कदम हे बारकाईने लक्ष ठेवून होते. मोठ्या प्रमाणात जागोजागी बंदोबस्त तैनात करण्यात आला.

# कुंडलवाडी कृउबा समितीत शेतमालाची खरेदी विक्री बंद ?

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. १९ फेब्रुवारी**

कुंडलवाडी कृषी उत्पन्न बाजार समितीतील सर्व आडत व्यापाऱ्याची शेतमालाची खरेदी विक्री बंद असल्यामुळे कुंडलवाडी कृषी उत्पन बाजार समिती बंद झाली काय? अशी चर्चा सुरू आहे.

कुंडलवाडी कृषी उत्पन्न बाजार समिती एके काळी प्रसिध्द होती हया ठिकाणची मिरची,भुईमूग शेंगा ,पुणे मुंबई पर्यंत जात होती व नावारूपास आलेली होती परंतु आज याचं मार्केट कमिटीची अवस्था अतिशय बिकट होत चालली आहे याला जबाबदार कोण? हया बाबी कडे प्रशासनाचे लक्ष नाही का? अशी चर्चा होत आहे. कुंडलवाडी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत अ वर्ग व ब वर्गाची मिसळून जवळ पास ८१ व्यापारी परवाना धारक आहेत. त्या पैकी काही अ वर्गाच्या व्यापाऱ्यांना कृषि उत्पन्न बाजार समितीत व्यवसाय करण्यासाठी लिज वर गाळे देण्यात आलेले आहे. परंतु काही दिवसापासून बाजार समितीतील आपली दुकाने बंद ठेवून काही व्यापाऱ्यानी शहरात इतर ठिकाणी शेतकऱ्याचा माल तुर, हरभरा, सोयाबिन मोठ्या प्रमाणात खरेदी करीत आहेत त्या मुळे कृषि उत्पन बाजार समितीचे आर्थिक नुकसान होत आहे .

व्यापाऱ्यानीं बाहेर माल खरेदी करीत असल्यामुळे मार्केट फीस बरोबर देत आहेत की नाही? हया बाबतीत शंका व्यक्त होत आहे. कुंडलवाडी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये आरळी, पिंपळगाव, बेलकोणी(खु.), गुजरी, कोल्हेबोरगाव, आदी गावचा सामावेश होतो.मार्केट कमिटीच्या बाहेर शेतं मालाची खरेदी व्यापारी करीत असल्याने समितीच्या कर्मचाऱ्याना मार्केट फिसची रक्कम जमा करण्यासाठी कार्यालय बंद ठेवून फिरावे लागत आहे.

हया बाबतीत दै.तरुण भारतशी बोलताना मार्केट कमेठीचे सचिव म्हणाले की, आम्ही व्यापारी यांना बोलावून चर्चा केली.तुम्हाला काय सोयी सुविधा हवे ते आम्ही पुर्ण करू तसेच मार्केट फिस मध्ये सवलत देवू, तुम्ही बाजार समितीत शेतकऱ्यांचा माल खरेदी करा तरी व्यापारी येण्यास तयार नाहीत मार्केटच्या बाहेर माल खरेदी करीत असल्यामुळे कर्मचाऱ्यांना मार्केट फिसची रक्कम जमा करण्यासाठी फिरावे लागत आहे. जमा होणारी रक्कम अपुरी पडत असल्यामुळे कर्मचाऱ्यांचें साठ महिन्या पासून पगार नसल्याचे सचिव यांनी सांगितले. ह्या बाबतीत शासनाने लक्ष घालून बाजार समितीत असणारे प्रश्न सोडवून बाजार समितीत खरेदी विक्री सुरू करण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### स्वातंत्र्यसेनानी राजारामबापू विद्यालयात शिवजयंती साजरी

**मुदखेड**-मुदखेड तालुक्यातील बारड येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित स्वातंत्र्यसेनानी राजारामबापू विद्यालय व श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली या कार्यक्रमासाठी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक रामकिशन चुबेवर, व कॉलेजचे प्राचार्य हेमंत इंगळे यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि शौर्य, न्याय व धर्म यांचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राध्यापक सावंत, माने, शिंदे, खानसोळे, ओसावार, कपाटे, फाजगे, चव्हाण, गोळेगावकर, कदम, आडगावकर, गोवंदे, देशमुख, राजेगोरे, रेड्डी, संतोष पवार, वाळके यासह महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षेतर कर्मचारी उपस्थित होते.

### इस्लापूर येथे मोटारसायकल रॅली



**इस्लापूर**-अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने इस्लापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते.यावेळी सर्व समाज बांधवांनी या अभिवादन कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी इस्लापूर व परीसरातील नवतरुणांनी भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करुन इस्लापूर ते शिवणी परीसर छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणाबाजी करत परीसर दणाणून सोडले. या भव्य मोटार सायकल रॅली मध्ये शेकडो गाड्यांचा सहभाग होता. तर ईस्लापूर, शिवणी, जलधारा अपारावपेठ परिसरातील अनेक ठिकाणी आज छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास इस्लापूर येथील पोलिस निरीक्षक व परिसरातील सरपंच, उपसरपंच, व्यापारी बांधव, पत्रकार बांधव, महिला, पुरुष, नवयुवक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

### अखंड हिंदुस्थानच्या दैवताला फुलवळ येथे ठिकठिकाणी अभिवादन

**फुलवळ**-अठरा पगड जाती-धर्माला एकत्रित घेऊन मावळे ही समान पदवी देत पर नारी ला मातेसमान दर्जा देण्याची शिकवण देणारे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक कुळवाडी भूषण श्रीमंत योगी राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त फुलवळ येथे ठिकठिकाणी प्रतिमेचे, पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समस्त ग्रामस्थांच्या वतीने सार्वजनिक जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक अभिवादन करण्यात आले. काही दिवसांपूर्वी याच चौकाच्या चबूतऱ्याला एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने चबुतरा जमीनदोस्त झाला होता . परंतु त्याच ठिकाणी नव्याने चबुतरा उभारण्यात यावा अशी अनेक शिवप्रेमी बांधवांची इच्छा होती. तेंव्हा त्याच ठिकाणी नुकताच नव्याने डौलदार चबुतरा उभारून छत्रपती शिवाजी महाराज चौकाचा फलक लावण्यात आला याच ठिकाणी शिवजयंती सोहळा पार पडला.यावेळी आनंदा पवार, राजकुमार फुलवळकर, रामलिंग मठपती, संजय फुलवळे, दत्ता डांगे, नवनाथ बनसोडे, प्रवीण मंगनाळे, परमेश्वर डांगे, होनाजी शेळगावे, शहाबुद्दीन शेख, सादख शेख, सौरभ बोरगावे, शाहू तेलंगे, रंगनाथ पांचाळ, शिवानंद मंगनाळे, अक्षय पवार, तानाजी पवार, बसवेश्वर शेळगावे, केदार देवकांबळे, संदीप मंगनाळे, गणेश मंगनाळे सह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.तसेच ग्रामपंचायत कार्यालय फुलवळ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच विमलबाई नागनाथराव मंगनाळे, ग्रामपंचायत सदस्य चंदबस आप्पा मंगनाळे, प्रवीण मंगनाळे, पत्रकार मधुकर डांगे, विश्वांभर बसवंते, धोंडीबा बोरगावे, संतोष सोमासे, हिरकांत मंगनाळे, सूर्यकांत जेलेवाड, विठ्ठल मंगनाळे, बंडू कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### शिवजयंती निमित्त दिप नगर भाजी मार्केटच्या वतीने अन्नदान




**नांदेड**-छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दिप नगर भाजी मार्केटच्या पदाधिकाऱ्यांनी अन्नदान वाटप केले. दिप नगर भाजी मार्केटची कार्यकारीणी नुकतीच जाहीर करण्यात आली असुन नवीन कार्यकारणीच्या माध्यमातून नवीन उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजे जयंती निमित्त आज अन्नदान वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा महानगर चिटणीस क्षितीज जाधव, दिप नगर मार्केट कमिटीचे अध्यक्ष सुरेश पवार, उपाध्यक्ष रवी थोरात, उपाध्यक्ष संगीता पारवे, शरद सातोरे, तथागत कांबळे, संभाजी पाटील, बालाजी वानेगावकर, कैलास गाडगीळ पावडे, रब्बनी शेख, तौफिकभाई, शेख रहीम, उत्तम तिडके, स्वप्नील ठोके आदी उपस्थित होते.

# नांदेड गोळीबार प्रकरणात आणखी दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १९ फेब्रुवारी**

शहरात दि. १० फेब्रुवारी रोजी झालेल्या गोळीबार प्रकरणात एटीएसच्या पथकाने आज बुधवारी आणखी दोघांना अटक केली. दुपारी या दोघांना न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर त्यांना न्यायालयाने २४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत पाठविले आहे.

गोळीबार करणाऱ्या आरोपीला मदत करणाऱ्यांची संख्या आता पाच झाली असून, त्यात चार जण नांदेडचे आहेत. तर एक पंजाब येथून आणला आहे. १० फेब्रुवारी रोजी शहिदपूरा भागात सकाळी नऊ ते साडेनऊ वाजेच्या दरम्यान गोळीबार झाला होता. या गोळीबारात गुरमितसिंग सेवादार हा जखमी झाला. तर रविंद्रसिंग राठोड याचा मृत्यू झाला. नांदेड पोलिसांना हवा असलेल्या बब्बर खालसा संघटनेचा हरविंदरसिंघ उर्फ रिंधा याचा भाऊ सत्येंद्रसिंग उर्फ सत्या याचा खून केल्याप्रकरणी गुरमितसिंघ सेवादार याला जन्मठेपेची शिक्षा झाली. तो पॅरोल रजेवर आल्यानंतर सराईत आरोपींनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यात त्याचा मित्र रविंद्रसिंग राठोड हा मृत पावला. तर सेवादार हा रुग्णालयात उपचार घेत आहे. वजिराबाद पोलिसांनी हल्लेखोराला मदत करणाऱ्या मनप्रितसिंग उर्फ मन्नू गुरुबक्षसिंग ढिल्लो आणि हरप्रितसिंग उर्फ हॅप्पी बाबूसिंग कारपेंटर या दोघांना अटक केली. त्यानंतर हा तपास दहशतवाद विरोधी पथकाकडे वर्ग झाला. पंजाबला गेलेल्या पोलीस पथकाने कालच अर्शदीपसिंग भजनसिंग याला अटक केली. त्याला न्यायालयाने काल १ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. गोळीबार करणाऱ्या आरोपीला मदत करणाऱ्या नांदेड येथील दलजितसिंग करमसिंग संधू आणि हरजितसिंघ उर्फ राजू अमरजितसिंग गील या दोघांना एटीएसच्या पथकाने नांदेड येथून अटक केली. एटीएस पथकाचे पोलीस उपअधीक्षक रामेश्वर रेंगे, पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, माणिक बेदरे यांनी ही कामगिरी बजावली.

# धर्माचे अधिष्ठान आणि ईश्वराच्या प्रेरणेतुन विकासाची दिशा प्राप्त होते : आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १९ फेब्रुवारी**

धर्माचे अधिष्ठान आणि ईश्वराच्या प्रेरणेतुन विकासाची दिशा प्राप्त होत असते.आपण निमित्तमात्र असतो. भगवंताच्या आशीर्वादाने आमदार म्हणून मला दुसऱ्यांदा जनतेची सेवा करण्याची संधी उपलब्ध झाली या संधीचे विकास कामाच्या रूपाने सोने करून किनवट माहूर तालुक्याचे मागासलेपण दूर करण्याचा माझा संकल्प आहे असे मौलिक प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी यांनी केले आहे.

गजानन बाबा मंदिर येथे प्रगट दिनानिमित्त ६ दिवसापासुन हभप दिनेशगुरु संभाजीनगरकर महाराज यांच्या अमृतवाणीतून आयोजित केलेल्या कीर्तनाची आज सांगता झाली असून यानिमित्त श्री गजानन महाराज उत्सव समिती व माहूरगड पदयात्रा समितीच्या वतीने आमदार भीमराव केराम यांच्या सहकुटुंब सत्काराचे आयोजन केले होते त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी संस्थानचे अध्यक्ष नामदेवराव केशवे ,सचिव दारमवार,,माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, शंकरराव अमिलंकठवार मुकुंद लोखंडे जेष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर,विजय जोशी,स्वागत आयनेनिवार अभय महाजन,



सुनील मच्छेवार, आगरमोरे, विजय जोशी,आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

धर्माच्या अधिष्ठानावर समस्त मानव जातीचा विकास होणे आवश्यक असते ईश्वराच्या प्रेरणेतून विकासाचीदिशा प्राप्त होते असते आपण निमित्त मात्र असतो.त्यादृष्टीने मानवाला सुखदायक जिवन जगण्यासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा संकल्प आहे. कोरोना काळात अडीच ते तीन वर्ष मला अपेक्षित विकासाचे ध्येय साध्य करता आले नाही.त्यानंतर १४ दिवस मी दवाखान्यामध्ये ऍडमिट होतो. परंतु भगवंताच्या आणि तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळे माझ्या आरोग्यात अमुलाग्र सुधारणा झाली एवढेच नव्हे तर ईश्वराने आमदार म्हणून दुसऱ्यांदा मला तुमची सेवा करण्याची संधी दिली. विकास कामाच्या माध्यमातून या संधीचे सोने करून किनवट माहूर तालुक्याचे मागासले पण दूर करण्याचा माझा संकल्प आहे. कीर्तनातुन ईश्वराचे नामस्मरण आणि अशा पवित्र प्रसंगी साक्षात ईश्वराच्या दरबारात माझा आणि माझ्या कुटुंबाचा सत्कार होणे हे माझे सौभाग्य आहे असे आमदार भीमराव केराम यावेळी म्हणाले. गजानन महाराज मंदिर तसेच किनवट माहूर तालुक्यातील देवस्थानाच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी शास्वतीही त्यांनी दिली.

प्रगट दिनानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेत प्रथम आलेली कुमारी अगरमोरे हिचा आमदार केराम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दारमवार तसेच माहूर पदयात्रा समितीची राकेश बोंम्पीलवार यांनी केले आहे .सूत्रसंचालन ड.दिलीप काळे यांनी केले. हभप दिनेश संभाजीनगरकर महाराज यांनी आरती केल्यानंतर महाप्रसाद वाटपाने कीर्तनाच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# नांदेड शहरातील शुक्रवार ते रविवार पर्यंतचे आठवडी बाजार राहणार बंद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १९ फेब्रुवारी**

राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा येत्या २१, २२ व २३ फेब्रुवारी रोजी नांदेड शहरात पार पडणार आहेत. त्याअनुषंगाने नांदेड शहरात शुक्रवार २१, शनिवार २२, रविवार २३ फेब्रुवारी रोजी भरणारे आठवडी बाजार बंद राहणार आहेत. हे आठवडी बाजार सोमवार २४ फेब्रुवारी रोजी भरणार आहेत. याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज आदेश निर्गमीत केला आहे. श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियम तसेच यशवंत कॉलेज मैदान या परिसरात या स्पर्धा होणार आहेत.

# सदस्य नोंदणी पुर्ण केल्याबद्दल भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्याकडुन क्षितीज जाधव यांचे अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १९ फेब्रुवारी**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत असून प्रत्येक पदाधिकारी सदस्य नोंदणी कामात व्यस्त आहेत. यात भाजपा महानगर चिटणीस यांनी अल्पावधीतच १ हजार सदस्य नोंदणी पुर्ण केली आहे. याबद्दल भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



भारतीय जनता पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. कार्यकर्त्यांपासून ते पदाधिकारी सदस्य नोंदणी कामत लागले आहेत. यात भाजपा महानगर चिटणीस क्षितीज जाधव यांनी अल्पावधीतच १ हजार सदस्य नोंदणी पुर्ण केली आहे. भारतीय जनता पार्टीचे सक्रीय आणि उपक्रमशील पदाधिकारी असलेले क्षितीज जाधव यांनी अल्पावधीतच एक हजार सदस्य नोंदणी केल्याने भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे पत्राव्दारे अभिनंदन केले आहे. तसेच भाजपाच्या अनेक पदाधिकाऱ्यांकडून त्यांचे कौतूक होत आहे.

# विजय कांबळे सारख्या होतकरू तरुणांना मदत करताना आत्मिक समाधान मिळतो : प्रशांत राठोड

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १९ फेब्रुवारी**

आर्थिक दृष्ट्या गरीबांना मदत करताना मला आत्मिक समाधान मिळतो, विजय कांबळे सारख्या एका होतकरू तरुणाला त्याच्या तुटपुंज्या व्यवसायाला उभारी देण्यासाठी मदत करुन त्याच्या कुटुंबाला आधार मिळावा या माणुसकीच्या भावनेतून आज एका भव्य अशा श्री दत्त कृपा टी स्टॉलचे उद्घाटन करताना मला मोठे समाधान मिळाले आहे.यातून कांबळे यांचेही जीवनमान नक्कीच उंचावेल! अशा सद्भावना प्रशांत राठोड यांनी व्यक्त केल्या.



तालुक्यातील पालाईगुडा येथील स्व.पिपळीबाई पुरसिंग राठोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे पुत्र प्रशांत पुरसिंग राठोड यांच्या हस्ते माहूर तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील श्री दत्त कृपा टी स्टॉल चा उद्घाटन सोहळा प्

मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

जवळपास तीस वर्षांपासून आपल्या मनमिळाऊ व गोड स्वभावाप्रमाणेच चहा प्रेमी नागरिकांना आपल्या लज्जतदार गरमागरम चहाची माफक दरात सेवा देत असलेले विजय कांबळे यांचे आजपर्यंत तहसीलच्या प्रशासकीय इमारतीसमोरील मुख्य प्रवेशद्वाराजवळील बाजुच्या जागेवर एक छोटेशे ताटव्याचे चहाचे दुकान होते.ज्याचे आज दि.१७ फेब्रुवारी रोजी तालुक्यातील पालाईगुडा येथील रहिवासी व सध्या मुंबई येथे राहत असलेले प्रशांत पुरसिंग राठोड यांनी मोठ्या मनाने दातृत्वभावना दाखवत पुढाकार घेऊन केलेल्या भरीव आर्थिक मदतीने एका भव्य टी स्टॉल मध्ये रुपांतर झाले आहे. त्याचे उद्घाटन आज दि.१७ रोजी त्यांच्याच हस्ते अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी डॉ.निरंजन केशवे,कॉ.शंकर सिडाम यांनीही विजय कांबळे या होतकरू टी स्टॉल चालकाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या.

तर अध्यक्षीय समारोप नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केला. श्री दत्त कृपा टी स्टॉल चे उद्घाटनानंतर झालेल्या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष फिरोज दोसानी हे होते. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपनगराध्यक्ष नाना लाड, भाजपाचे ओबीसी प्रदेश सचिव अनिल वाघमारे, डॉ.निरंजन केशवे, डॉ.अभिजीत अंबेकर,कॉ.शंकर सिडाम, कॉन्टॅक्टर विजय राठोड, गौतम महामुने,राकाँ.अजित पवार पक्षाचे ता.अ. अमित राठोड, पत्रकार बजरंगसिंह हजारी, दत्ता शेरेकर या प्रमुख पाहुण्यांसह पत्रकार विलास आडे, इलियास बावानी,गजानन भारती, वसंत कपाटे, नंदकुमार जोशी,राज ठाकुर, बाबाराव कंधारे, गणेश खडसे यासह प्रतापसिंह हजारी, अजयसिंह हजारी, विजयसिंह हजारी,रोहनसिंह हजारी,पवन शर्मा, समाधान पाऊलबुद्धे,किनवट येथील सागर हजारी,कपिल हजारी, दयाराम जाधव, वसंत जाधव यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सुत्रसंचलन अर्जुन जाधव यांनी तर आभार प्रदर्शन टी स्टॉल चालक विजय कांबळे यांनी केले.यावेळी किनवट,माहूर तालुक्यातील स्व.पिपळीबाई पुरसिंग राठोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या सन्मानार्थ बंजारासमाजातील नागरिकांसह सर्वधर्मीय जनसमुदाय व विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुणवंत विद्यार्थी हे शाळेचे देशाचे वैभव : साहित्यीक बालाजी पेटेकर

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. १९ फेब्रुवारी**

शाळा हे उत्तम विचाराचे विचारपीठ आहे. या विचार पीठातून अनेक गुणवान विद्यार्थी घडत असतात आणि असे गुणवान विद्यार्थी हे शाळेचे गावाचे आणि इथल्या मराठी मातीचे वैभव असतात. ही मोठे होण्यासाठी शिक्षकांबरोबर गुणवंत विद्यार्थीही असणे आवश्यक आहे. त्यामुळे शाळेचे नाव, गावाचे नाव, सर्वत्र नावारूपाला येत आसते. त्यामुळे शिक्षक हे महत्त्वाचे आहेत असे प्रतिपादन प्रख्यात साहित्यिक कथा कवी बालाजी पेटेकर खतगावकर यांनी केले. ते कुन्मारपल्ली ता. देगलूर जिल्हा नांदेड या कर्नाटकच्या सीमेवरील वरील हे गावा तील शांती वर्धक हायस्कूल कुन्मारपल्ली येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रमा निमित्त प्रमुख पाहुणे व प्रमुख वक्ते म्हणून बालाजी पेटेकर खतगांवकर बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीतांनी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पी. के. पवार होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षक वड्डे एम. व्ही.सर



होते. यावेळी स्नेहा शिंदे सविता म्हेत्रे, संजना म्हेत्रे, शाहू बिरादार, वैशाली शेरीकर, अर्चना राठोड, वेदिका धर्मवाड, अंकिता डोंगरे, इत्यादी जणांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर बालाजी पेटेकर सर यांनी विविध कवितांनी मुलांना मनमुराद आनंद दिला. त्याच बरोबर त्यांची 'काजळमया' ही कथेचे सादरीकरण करून उपस्थित विद्यार्थ्यांना खूप हसवले आणि शेवटी अंतर्मुख व्हायला भाग पाडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चव्हाण एस.टी यांनी केले तर आभार प्रदर्शन कलाध्यापक सुंकेवार बालाजी यांनी मांडले. या निरोप समारंभावेळी अर्चना गंदिगुडे, हलबुर्गे श्रावणी, भाईदोडे, मुकपोगले सुमन, पवार इशाका, धर्मवाड शाहूबाई, जोळदापके प्रतीक्षा, बासे शाहू, वेदांती केरे, संध्याराणी शेरीकर, राजश्री म्हेत्रे, बिरादार अंजली, डोंगरे रेवती, कांबळे आखिला, पाटील लिंगराज, काळे आशिष, गंगाजी रेणुका, गंगाजी अंजली, बालूरे दीपिका, गनिमे शुभांगी, म्हेत्रे संध्या, जडगे शुभांगी, अपाने सिंधू, डोंगाले साक्षी, शिंदे रेणुका, मसूरे पौर्णिमा, पाटील श्रीकांत, आर्या सरपंच, संतोष इबितवार, उमाकांत बंडे, गंगाजी युवराज इतर अनेक विद्यार्थी, गावातील पालकांची ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पाया भक्कम करा;जीवनात उन्मळून पडणार नाहीत: डॉ.भट्टड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** शालेय जीवनात मिळालेले संस्कार व मूल्य यांवरच जीवनाची इमारत उभी असते.त्यामुळे विद्यालयात मिळालेलै हे संस्कार व मूल्य आत्मसात करुन पाया भक्कम करा, त्यामुळे जीवनात कधीच उन्मळून पडणार नाहीत,असे प्रतिपादन डॉ.सुशिल भट्टड यांनी केले.ते देशिकेंद्र विद्यालयात आयोजित दहावी विद्यार्थ्यांच्या शुभेच्छा कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रूपसिंग सगर हे होते. डॉ. सुशिल भट्टड पुढे म्हणाले, सकारात्मक विचार दहावी बोर्ड परीक्षेला सामारे जा. शिवाय,कसलाच ताण-तणाव घेऊ नका. यावेळी कु.शर्वरी बंगाळे व तसेच अभय मिसाळ या विद्यार्थ्यांना देशिकेंद्र भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विद्यालयात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचाही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी दहावी वर्गातील अनेक विद्यार्थी-विद्यार्थींनी आपल्या मनोगतात शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक रुपसिंग सगर यांनी,प्रास्ताविक उपमुख्याध्यापक शिवानंद स्वामी यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका पुष्पा पाटील यांनी केले. या कार्यक्रमास विद्यालयातील



सर्व शिक्षक -शिक्षिका शिक्षकेत्तर व विद्यार्थी -विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

## व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे रयतेचे राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. हरिहर गायके, अंकुश थडकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अंगद कोते यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाला डॉ.अभिजीत बादाडे, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ.सुरेशकुमार कांबळे, डॉ. शाहूराज मुळे, डॉ. महावीर कटके, प्रा. चंद्रकांत मोरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. दशरथ भिसे, डॉ. मा.ना. गायकवाड, डॉ.अजित भांजी, प्रा. संदिपान चेवले, प्रा. सोपान डोपे, प्रा. महारुद्र बिडवे, प्रा. रणजीत जाधव, दत्ता फुलगामे, राजकुमार कांबळे, प्रा. विवेक कदम, प्रकाश मेहरकर यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## अण्णा भाऊ साठे चौकातील जागा सभागृहासाठी आरक्षित करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चौकातील खुली जागा अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह व साहित्य संग्रहालयासाठी आरक्षित करण्यात यावी, जागेत सांस्कृतिक सभागृह व्हावे, जेणेकरून सांस्कृतिक सभागृह मातंग समाजातील विविध सामाजिक कार्यासाठी उपयोगात आणता येईल, अशी मागणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे कृती समितीच्या वतीने मनपा आयुक्तांकडे करण्यात आली. यावेळी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने भव्य सांस्कृतिक सभागृह तयार होऊन मातंग समाजातील विविध सामाजिक कार्यासाठी त्याचा वापर करता येईल अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह व वाचनालय समाजाला दिशादर्शक होईल. मातंग समाज हा आजही हलाखीचे जीवन जगत असून, त्यांच्या मुला मुलींचे सांस्कृतिक कार्य, विवाह सोहळे उघड्यावर होतात. त्यामुळे या रिकाम्या जागेत सांस्कृतिक सभागृह उभारावे, असे आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर नंदकुमार राऊत, नारायण डोंगरे, नागनाथ कांबळे, लहू शिंदे, दिलीप शिंदे, अंगद गायकवाड, आदर्श राऊत, अभिषेक माने, अंगद वाघमारे, सुभाष रकटे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यालगत असलेल्या खुल्या जागेत सांस्कृतिक सभागृह करण्यात यावे, यानुषंगाने गेल्या अनेक दिवसांपासूनची मागणी आहे.

## आशादेवी होळकुंदे यांचे मरणोत्तर देहदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** शहरातील नारायणनगर येथील आशादेवी विश्वनाथ होळकुंदे (वय ७३) यांचे सोमवारी पहाटे निधन झाले. त्यांचे पार्थिव येथील एमआयटीच्या एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयास देहदान करण्यात आले. आशादेवी होळकुंदे या मनमिळावू व धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्या इच्छेनुसार निधनानंतर त्यांचे पार्थिव दफनविधी न करता वैद्यकीय महाविद्यालयास दान करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्या सेवानिवृत्त सहशिक्षक तथा 'अंनिस'चे कार्यकर्ते विश्वनाथ होळकुंदे यांच्या पत्नी होत.

## भांडणाची कुरापत काढून मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** विनाकारण भांडणाची कुरापत काढून शिवीगाळ करून प्लास्टिकच्या पाइपने मारून एकास जखमी केल्याची घटना रेणापूर तालुक्यातील पोहेरेगाव येथे घडली.

याबाबत सुकुमार चेपट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किरण ऊर्फ गणेश चेपट याच्याविरुद्ध रेणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# लातुरात जय शिवाजी, जय भारत पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

### ढोल-ताशांचा नाद घुमला; लेझीम आणि झांज पथकाने जिंकली मने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या जय शिवाजी, जय भारत पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दयानंद महाविद्यालयाच्या मैदानातून सुरु झालेल्या या पदयात्रेत विद्यार्थी, अधिकारी-कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या तालावर विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या लेझीम पथक, झांज पथकाने केलेल्या सादरीकरणाने यावेळी उपस्थितांची मने जिंकली. तसेच यावेळी जय भवानी, जय शिवाजी या घोषणेने सर्व परिसर दुमदुमून गेला. आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून पदयात्रेला सुरुवात झाली.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.), जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, महानगरपालिका उपायुक्त पंजाबराव खानसोळे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, योजना शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे आदिंची उपस्थिती होती. जय शिवाजी, जय भारत पदयात्रेमध्ये जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले होते. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत जवळपास दीड ते दोन हजार विद्यार्थी, नागरिक यांच्यासह अधिकारी, कर्मचारी या पदयात्रेत सहभागी झाले होते. यामध्ये अनेक विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज, मावळे, वारकरी आदी पारंपारिक वेशभूषा केल्या होत्या.

यावेळी ढोल-ताशांच्या गजरात विविध शाळा, महाविद्यालयांच्या लेझीम, झांज पथकांचे सादरीकरण सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. दयानंद महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांनी सादर केलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यावरील पोवाडा आणि उपस्थितांकडून देण्यात आलेल्या 'जय भवानी, जय शिवाजी' या घोषणांमुळे संपूर्ण परिसरात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.



# फेरीवाल्यांनी केली खरेदी बंद

### भाजीपाला व फळांचा प्रश्न होणार गंभीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** गेली तीन-चार दिवसांपासून सुरू असलेले फेरीवाल्यांचे आंदोलन आणखीन तीव्र होत असून फेरीवाल्यांनी मंगळवारी भाजी मार्केटमधून भाजीपाला आणि फळे खरेदी करायचेच नाही, असा निर्णय घेतला आहे. मंगळवारी विवेकानंद चौकात भाजीपाल्याचा आठवडी बाजार होता. या बाजाराला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे शहरात भाजीपाला व फळांचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

वाहतुकीस अडथळा होत असल्याचे कारण सांगत महापालिका प्रशासनाने फेरीवाल्यांना गंजगोलाई व दयानंद गेट परिसरातून हटवत शहराच्या विविध भागात आठवडी बाजाराचे नियोजन केले आहे. मात्र, आठवडी बाजारात ग्राहक येत नसल्याने आठवडी बाजार ग्राहक व विक्रेत्यांसाठी गैरसोयीचा आहे, असे सांगत आम्हाला पूर्वीच्याच ठिकाणी व्यवसाय करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी करीत फळ व भाजीपाला विक्रेत्यांनी सोमवारी महापालिकेत ठिय्या आंदोलन केले. पथविक्रेता समितीच्या झालेल्या पहिल्या बैठकीत मस्जिद रोड हा 'हॉकर्स झोन' निश्चित करण्यात आला होता.

तरीही तेथून फेरीवाल्यांना हटविण्यात येत आहे. तसेच दयानंद गेट भागातील व्यावसायिकांना पर्यायी जागा उपलब्ध करून देत नाही, तोपर्यंत रोडच्या एका बाजूने व्यवसाय करू द्यावा, असे ठरलेले असतानाही त्या ठिकाणीही एकतर्फी कारवाई करण्यात आली. हे सर्व प्रकार थांबवावेत, अशी मागणी फेरीवाले व नगर पथविक्रेता समितीने आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्याकडे केली. जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्याशी या प्रश्नी चर्चा करण्यासाठी दोन दिवसांचा वेळ द्यावा, असे आयुक्तांनी सांगितले.

दरम्यान, मंगळवारी बहुतांशी फेरीवाल्यांनी भाजी मार्केटमधून भाजीपाला आणि फळे खरेदी केलीच नाहीत. महापालिकेने ठरविल्याप्रमाणे मंगळवारी विवेकानंद चौकात भाजीपाल्याचा आठवडी बाजार होता. या बाजाराला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे शहरातील भाजीपाला व फळांचा प्रश्न गंभीर होणार असल्याचे बोलले जात आहे.

## राहुलकुमार मीना यांची जि.प.च्या सीईओपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांची बदली झाल्याने नव्या सीईओंची उत्सुकता लागली होती. मंगळवारी शासनाने राज्यातील काही आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्यात लातूरला नवे सीईओ म्हणून राहुलकुमार मीना यांची बदली झाली.

आयएएस अधिकारी राहुल मीना हे मूळचे राजस्थानमधील सवाई माधोपूर जिल्ह्यातील आहेत. ते सन २०२१ च्या बॅचचे आहेत. ते दीड वर्षापासून गडचिरोली येथील आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी तथा गडचिरोलीचे सहायक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांची ही दुसरीच पोस्टिंग आहे.जिल्हा परिषदेतील सर्व विभागांचा आढावा घेऊन सर्व विभागांच्या योजना, कामांना गती देण्याचा प्रयत्न राहणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या विकासासाठी योजना अधिक प्रभावीपणे राबवू. विशेषतः आरोग्य आणि शिक्षण या दोन विभागांकडे अधिक लक्ष केंद्रित करून मिना म्हणाले.

## तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेवून संकटाचा सामना करायला शिकावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन संकट आली तरी मागे फिरायचं नाही, अडचणी आल्या म्हणून वाट बदलायची नाही, थांबायचं नाही. लढत रहायचं. ध्येयाचा पाठलाग करत राहायचं. अंधाराच्या पखाली वाहणाऱ्या माणसांनी सूर्य निर्माण करण्याची ताकद निर्माण करायची. असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक डॉ. संदीपान जगदाळे यांनी केले. ते दयानंद कला महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शिवजयंती कार्यक्रमात बोलत होते.

प्रारंभी दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व उपप्राचार्य डॉ.दिलीप नागरगोजे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता लेझीम, झांजपथक व ढोल ताशाच्या जयघोषात झाली.

डॉ. संदिपान जगदाळे पुढे म्हणाले की, सतराव्या शतकाचा प्रारंभ होताच पाच सुलतानी शाह्या महाराष्ट्राच्या डोक्यावर नाचत होत्या. अशा कठीण प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक संकटांचा सामना केला. अफजल खान महाराष्ट्रवर चालून आला. त्याच वेळी सईबाईंचे निधन झाले. पत्नीच्या मृत्यूचे दुःख अंतर्यामी असताना स्वराज्याची तारणाची ओढ त्यांच्या मनात होती. लाल महालात शाहिस्तेखान घुसला परंतु जीवाची पर्वा न करता त्याची बोटे छाटली. साडेतीन लाखाची फौज घेऊन मिर्झा जयसिंग राज्यावर चालून आला. त्यावेळेस पुरंधर किल्याच्या माचीवर होत असलेला रयतेचा छळ व खुलेआम कत्तली पाहवेनाशा झाल्यामुळे पुरंदरासह २३ किल्ले द्यावे लागले. अशा स्थितीत राजांनी सामर्थ्याने तोंड दिले. कठीण परिस्थितीतही मनाचा समतोल कसा साधावा हे महाराजांचे चरित्र पाहिल्यानंतर लक्षात येते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड हे होते.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** छत्रपती शिवाजी महाराज हे द्रष्टे राजकारणी आणि आदर्श व्यवस्थापन गुरु होते. पर्यावरण वेळेचे व्यवस्थापन, मनस्थितीचे व्यवस्थापन, विज्ञाननिष्ठा, जलव्यवस्थापन मानवी संस्था व्यवस्थापन आणि न्याय व्यवस्थापन नेतृत्व गुण अधिक विकासात महाराजांचा हातखंडा होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे रूपांतर स्वराज्यात केले. स्वराज्यावरील अनेक संकटावर मात करून शिवरायांनी नवा मार्ग काढला. त्यामुळे त्यांच्या विचाराची प्रत्यक्ष कृती दैनंदिन जीवनात होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन इतिहास अभ्यासक डॉ. सदाशिव दंदे यांनी केले.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ जयंती प्राचार्य दालनात उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

सर्वप्रथम प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून विनम्रपणे अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, स्टाफ सचिव डॉ. रत्नाकर बेडगे, उत्सव समितीचे समन्वयक डॉ. धोंडीबा भुरे, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, प्रा. शैलेश कानडे, प्रा. ठाकूर, विनायक लोमटे, यशपाल ढोरमारे, रत्नेश्वर स्वामी, योगीराज माकणे, संभाजी लातूरे, संगमेश्वर मुळे, शुभम बिरादार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नामदेव बेंदर्गे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवन परिचय आपण अभ्यासला तर असे लक्षात येते की, ते सर्वसामान्याचे राजे होते त्यांनी आपल्या सैन्यामध्ये समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींना सहभागी करून घेऊन त्यांनी अनेक लढाया कुशाग्र बुद्धिमत्ता आणि कौशल्याद्वारे जिंकल्याचे आपणास माहिती आहे. या कार्यक्रमाचा अध्यक्षिय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला .

## मंजूर पाणंद रस्त्याच्या कामासाठी शेतकऱ्यांचे लातुरात आमरण उपोषण



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** निलंगा तालुक्यातील शिऊर ते नदीवाडी हा पाणंद रस्ता मंजूर असूनही या रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडले आहे. रस्त्याचे काम न झाल्यास गटविकास अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक, तांत्रिक सहायक यांनात्यांची पगार न काढण्याचे आदेशीत करूनही सदर रस्त्याचे काम अद्याप झालेले नाही. त्यामुळे नदीवाडी व शिऊर या दोन्ही गावच्या ग्रामस्थांना ये -जा करण्यासाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

या रस्त्याचे काम तात्काळ करून देण्यात यावे, व मंजूर असलेल्या रस्त्याच्या कामाला विलंब लावणाऱ्या सरपंच, ग्रामसेवक व तांत्रिक सहायक यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी, या मागणीसाठी १८ फेब्रुवारी पासून आठ शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालसमोर आमरण उपोषण सुरु केले आहे. उपोषणकर्त्यामध्ये तीन महिला शेतकऱ्यांचा समावेश आहे.

मातोश्री योजने अंतर्गत शिऊर ते नदीवाडी हा पाणंद रस्ता दोन वर्षाचा कालावधी उलटला. निलंगा पंचायत समिती समोर अनेकवेळा अर्ज, विनंत्या केल्या. २४ सप्टेंबर २०२४ ला उपोषण केले असता एक महिन्याच्या आत रस्त्याचे काम पूर्ण करतो म्हणून बिडीओने लेखी आश्वासन दिले. मात्र अद्याप रस्त्याचे काम झालेले नाही. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप, दडपशाहीची भूमिका दिसून येत असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.

या रस्त्याचा प्रश्न तात्काळ सोडवावा आणि रस्त्याचे काम पूर्ण करणत यावे, या मागणीसाठी अरुण अष्टुरे, भरत सूर्यवंशी, दिलीप सूर्यवंशी, आत्माराम सूर्यवंशी, संजय सूर्यवंशी, नामदेव तुगावे, श्रीमंत काथे, गणेश काथे, सुशीलाबाई अष्टुरे, रामदास सूर्यवंशी, भारतबाई काळे, बालाजी तुगावे, सुलोचना तुगावे, सरोजा अष्टुरे, शिवराज अष्टुरे आदी शेतकरी लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालसमोर आमरण उपोषणाला बसले आहेत.

## बेलेश्वर मठ संस्थानात पारायण सोहळ्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** तालुक्यातील पाखरसांगवी ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या पठाणवाडी येथील बेलेश्वर मठ संस्थानात महाशिवरात्रीनिमित्त २३ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व शिवलीलामृत पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून रविवारपासून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला आहे.



२३ फेब्रुवारी रोजी मठाधीपती शिवयोगी अनंत महाराज व रामकृष्ण पांचाळ महाराज, कोल्हेगाव यांच्या हस्ते कलश पूजन होऊन सप्ताहास प्रारंभ होणार आहे. सप्ताहात काकडा, हरिजागर, पारायण, कीर्तन, भजन होणार असून, २३ रोजी महादेव महाराज, हरंगुळ, २४ रोजी धोंडिराम महाराज, २५ रोजी खंडू महाराज, २६ रोजी रामकृष्ण पांचाळ महाराज यांची कीर्तनसेवा होणार आहे. २७ फेब्रुवारी रोजी शिवयोगी अनंत महाराज पांचाळ यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होणार आहे. २६ रोजी महाशिवरात्रीनिमित्त शैलेश पाटील चाकूरकर यांच्या हस्ते महापूजा होणार आहे. परिसरातील भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बेलेश्वर मठ संस्थानचे मठाधीपती शिवयोगी अनंत महाराज यांनी केले आहे.



## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्याकडून भिसे कुटुंबाचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१९ फेब्रुवारी -** मांजरा साखर कारखान्याचे माजी संचालक तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मदन भिसे यांच्या मातोश्री कुसुमबाई हणमंतराव भिसे यांचे वृध्दापकाळाने निधन झाले.

माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी लातूर तालुक्यातील गादवड येथे जावून भिसे कुटुंबाची भेट घेतली. तत्पूर्वी कुसुमबाई भिसे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली, भिसे कुटुंबाचे सांत्वन केले.

यावेळी मदन भिसे, संभाजी भिसे, राजाराम भिसे, धनंजय भिसे आणि भिसे कुटुंबातील सदस्यांसह माजी आमदार ॲड. त्रिंबक भिसे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रवींद्र काळे, संभाजी सूळ, मांजरा साखर कारखान्याचे संचालक बंकट कदम, राजकुमार पाटील, कैलास पाटील, ज्ञानेश्वर भिसे, सचिन दाताळ, बाळासाहेब कदम, चांदपाशा इनामदार तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माऊली ग्रुपतर्फे रक्तदान व मोफत तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ फेब्रुवारी -**

उदगीर येथील माजी सभापती शिवाजीराव हुडे यांच्या वाढदिवसानिमित्त माऊली ग्रुपच्या वतीने आयोजित रक्तदान, नेत्र, दंत व मधुमेह तपासणी शिबिरास नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले, तर ७१ जणांची नेत्रतपासणी करण्यात आली.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी माऊली ग्रुपचे अध्यक्ष चंद्रकांत डोईजोडे, प्रिती भोसले, रमेश अंबरखाने, डॉ.आर.एन. लखोटिया, श्रीधर बिरादार, प्रा. शिवाजी मुळे, प्रदीप पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपण व महाआरतीने झाली. तसेच अक्षरनंदन मराठी शाळा, संग्राम स्मारक, सुवर्णमाता कन्या विद्यालय आणि अहिल्यादेवी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शिबिरात आडत बाजारातील हमाल, मापाडी, शेतकरी आणि नागरिकांसाठी मोफत नेत्र, दंत आणि मधूमेह तपासणी करण्यात आली. रक्तदान शिबिराचे आयोजन कै. नागप्पा अंबरखाने ब्लड बँकेच्या सहकार्याने करण्यात आले. उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालय आणि मधूर हॉस्पिटलतर्फे तपासणीसाठी विशेष सुविधा पुरवण्यात आल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भरत कोयले यांनी केले. सूत्रसंचालन नागेश अंबेगावे यांनी तर आभार राम मोतीपवळे यांनी मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### अध्यक्ष भालेराव तर उपाध्यक्षपदी मुंडे

**अहमदपूर, दि.१९ फेब्रुवारी -**

येथील अजय भालेराव यांची नुकतीच डिजीटल मिडीया संपादक पत्रकार संघटनेच्या अहमदपूर तालुकाध्यक्षपदी तर गणेश मुंडे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील जेष्ठ संपादक तथा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या हस्ते नुकतेच त्याना नियुक्ती पत्र देण्यात आले. तसेच तालूका सचिव पदी पत्रकार भिमराव कांबळे यांची निवड करण्यात आली. डिजीटल मिडीया संपादक पत्रकारांच्या प्रश्नावर मात करत संघटनेच्या धेय्य धोरणानुसार सर्वांना सोबत घेवून पूढील काळात काम करणार असल्याचे अजय भालेराव यांनी यावेळी सांगितले. या निवडीबद्दल अजय भालेराव आणि गणेश मुंडे व भिमराव कांबळे त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.



### कुशल अंगणवाडी सेविका प्रमाणपत्र वाटप

**शिरूर अनंतपाळ, दि.१९ फेब्रुवारी -**

शिरूर अनंतपाळ येथे पंचायत समिती सभागृहात तालुक्यातील अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांची महिला व बालविकास विभागामार्फत बैठक व तालुक्यातील प्रत्येक अंगणवाडी आठवड्याचा ई आकाराचा नेमून दिलेला दैनंदिन शिकवणी उत्कृष्टपणे कामकाज केल्यासंबंधी व शंभर टक्के दिलेला उपक्रम परिपूर्ण केल्यामुळे कुशल अंगणवाडी सेविका प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तसेच बालशिक्षण अभ्यासक्रमाच्या दैनंदिन कृती अंगणवाडी पूर्ण करून त्यांच्या परिपूर्ण नोंदी निश्चित दिलेल्या ग्रुपवर घेणे व अंगणवाडी केंद्रात बालशिक्षण दिन साजरा करणे यामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती शिरूर अनंतपाळ पंचायत समितीचे कर्तव्य दक्ष गटशिक्षणाधिकारी बी.टी. चव्हाण, निकम, मुख्य सेविका खलंग्रे, बिडवे व राहुल शिरूरे प्रमुखाच्या उपस्थितीत उजेड अंगणवाडी क्र.३ च्या कार्यकर्त्या कदम संगीता, उजेड अंगणवाडी क्र.४ च्या कार्यकर्ती दंतराव जानकी व इतर कार्यकर्तींना व मदतनीसांना प्रमाणपत्र देण्यात आले.



### गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा


**उदगीर, दि.१९ फेब्रुवारी -**

उदगीर येथे इच्छापूर्ती कोचिंग क्लासेसच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व ११ वी व १२ वीच्या क्लासेसचा भव्य शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकारमहर्षी चंद्रकांतआण्णा वैजापूरे होते, तर उद्घाटन माजी आमदार गोविंद केंद्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी बसवराज पाटील नागराळकर, मुन्ना पाटील, भरत चामले, बापूराव राठोड, नवनाथ गायकवाड यांसह मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार मिळाल्याबद्दल कुणाल बागबंदे व बापूराव पटणे, तसेच यंग लीडर अवॉर्ड मिळविल्याबद्दल वैष्णवी पाटील यांचा सत्कार करण्यात आला. ३४० विद्यार्थ्यांना विविध परीक्षांतील यशासाठी गौरवण्यात आले. प्रास्ताविक प्रा. सिद्धेश्वर पटणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संजय जामकर यांनी, तर आभार प्रदर्शन इंजि. परमेश्वर भोकरे यांनी केले. हजारो विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

### लोहार यांची सहाय्यक पदी निवड

**औसा, दि.१९ फेब्रुवारी -**

सन २०२३ च्या एमपीएससी परिक्षेत औसा तालुक्यातील किल्लारी येथील अक्षय विद्यासागर लोहार यांनी यश संपादन



केले असून राज्यात एमपीएससी एनटी-बी मधून ४१ वी रँक पटकावत त्यांनी महसूल सहाय्यक या पदाला गवसणी घातली आहे. जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर अक्षय यांनी यश संपादन केले आहे. औसा तालुक्यातील किल्लारी येथून ९२ टक्के गुण मिळवून अक्षय लोहार दहावी उत्तीर्ण झाले. यानंतर किल्लारी येथेच विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर पदवीचे शिक्षण बीएससी कृषी मधून कराड (जि. सातारा) येथे पूर्ण केले. पदवी पुर्ण झाल्यानंतर २०२२ पासून एपीएमसी साठी तयारी सुरू केली. एपीएससीच्या पहिल्या प्रयत्नात यश मिळाले नाही, पण खचून न जाता पुन्हा जिद्दीने तयारी सुरू केली. व २०२३ च्या एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन अक्षय यांची महसूल सहाय्यक या पदी निवड झाली.

### शिष्यवृत्तीसाठी २५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करा

**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

अल्पसंख्यांक विकास विभागाकडून अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी परदेशात पदव्युत्तर पदवी व पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्ज मागविण्यात येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता अर्ज करण्याची अंतिम २५ फेब्रुवारी असून, पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज पोस्टाने किंवा प्रत्यक्ष समाज कल्याण आयुक्तालय, चर्च रोड, पुणे - ४११०११ येथे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

# रानडुक्करच्या धुमाकूळीमुळे बागायतदार शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१९ फेब्रुवारी -**

तालुक्यातील थेरगाव येथील सर्वे नं १९९ व २००० मधील ज्ञानोबा व्यंकटराव चामले यांच्या शेतातील आंबा व नारळ झाडांचे रानडुकराने एकुण १८ झाडांची नासधूस केली आहे.

रात्रंदिवस शेतकऱ्यांना झाडांची लागवड केल्यापासून रात्री उशिरापर्यंत गस्त घालावी लागत आहे. त्या झाडांची देखरेख करण्यासाठी येथील शेतकरी ज्ञानोबा चामले यांनी महिना १५ हजार रुपये देऊन शेतावर कामगार ठेवला आहे.

परंतु रात्री बेरात्री कळपाने येणाऱ्या रानडुक्कराची राखण एकटा कामगार करणार कसा त्यामुळे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

एकट्या रखवालदारावर जर का या कळपाने हल्ला केला तर याला जबाबदार वनविभागाचे अधिकारी राहतील अशी चर्चा शेतकरी वर्गातून ऐकावयास मिळते आहे.

त्यासाठी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात पिकांचे नुकसान करणाऱ्या वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा व पीकविमा देण्यात यावा, यासह विविध मागण्यांसाठी काही दिवसांपूर्वी रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ओबीसी नेते शिवाजी पेठे व शेतकऱ्यांच्या वतीने येरोळमोड येथील उदगीर नळेगाव लातूर राज्य महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.

हरीण व रानडुक्कर या प्राण्यांचा बंदोबस्त करावा, १०० टक्के सबसिडीवर तारांचे कंपाऊंड देण्यात यावे, अशी मागणी परिसरातील शेतकरी वर्गातून केली जात आहे.

> सद्यस्थितीत रब्बी हंगामातील पिके काढणे चालू आहे वावरात पिकं नसल्यामुळे उभ्या असलेल्या कोवळ्या झाडावर रानडुक्करांनी मोर्चा वळवला आहे असं वाटतं इतके भितीदायक मोठ मोठी रानडुक्करं पाहताच घामाच्या धारा वाहू लागतात अशी भली मोठी रांग येवून कोवळ्या झाडावर लोळण घेत उकरून नासाडी करतात यासाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देवून झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी.
>
> **- विश्वनाथ वाघमारे**

# शिरूर अनंतपाळमधील जनतेला सभापती करा

**राष्ट्रवादी काँग्रेसची एस.पी गटाची मागणी..**



**तभा वृत्तसेवा**
**शि. अनंतपाळ, दि.१९ फेब्रुवारी -**

शिरूर अनंतपाळ नगरपंचायत मध्ये बहूमताने सत्ता असून सुद्धा नगरपंचायतीच्या सभापती निवडीबाबत दि.१३ फेब्रुवारी रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस एकही नगरसेवक उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या शिष्टमंडळाने जर शिरूर अनंतपाळचे नगरसेवक यांची सभापती होण्याची इच्छा नसेल तर शिरूर अनंतपाळ शहरातील नागरिकांना नगरपंचायतचे सभापती करावे जेणेकरून शहरातील नागरिकांची गैरसोय होणार नाही अशी मागणी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली.

या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, जिल्हा उपाध्यक्ष बाबुराव बिराजदार, जिल्हा सरचिटणीस प्रमोद धुमाळे, शिवसेनेचे शहरप्रमुख सतीश शिवणे, शहराध्यक्ष मुकेश गायकवाड, संभाजी पारशटे, विशाल गिलचे यांच्या स्वाक्षरी आहे.

# निलंगा तालुक्यात रिक्त पदांमुळे प्रशासन ठप्प

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१९ फेब्रुवारी -**

निलंगा तालुक्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये प्रमुख पदे रिक्त असल्याने प्रशासनावर मोठा परिणाम झाला आहे. नगर परिषदेचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवक पदे ३२ महिन्यांपासून रिक्त असून प्रशासक नियुक्त आहे. मुख्याधिकारी व विविध विभागांत रिक्त पदांमुळे नागरी समस्या वाढल्या आहेत.

उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक पद दोन वर्षांपासून रिक्त असून आरोग्य सेवेला फटका बसला आहे. दुय्यम निबंधक कार्यालयात मुख्य पद रिक्त असल्याने ग्राहकांना अडचणी येत आहेत. भूमी अभिलेख कार्यालयात कामे रखडली असून पंचायत समितीचे सभापती व उपसभापती पद ३० महिन्यांपासून रिक्त आहे.

महावितरणच्या अभियंता पदाच्या अनुपस्थितीमुळे वीजपुरवठा, बिले व दुरुस्तीविषयक तक्रारींचे निराकरण होत नाही.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुख्याध्यापक, शिक्षक व केंद्रप्रमुख पदे रिक्त असल्याने शिक्षणावर परिणाम झाला आहे. वनविभागाचे कार्यालय असूनही अधिकाऱ्यांचा ठावठिकाणा नाही.

तालुक्यात प्रभारी व अतिरिक्त भार असलेल्या अधिकाऱ्यांमुळे प्रशासन विस्कळीत झाले असून, रिक्त पदे त्वरित भरावीत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी ५ मार्चपर्यंत अर्ज पाठवावेत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

एकात्मिक बाल विकास सेवा ग्रामीण प्रकल्प, धाराशिवअंतर्गत अंगणवाडी सेविका पदाच्या ४ आणि अंगणवाडी मदतनीस पदाच्या ४ पदांसाठी ३ मार्च २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

अंगणवाडी सेविका पदासाठी तेर, कौडगाव (बावी), येवती, कोंबडवाडी, ढोकी तर अंगणवाडी मदतनीस पदासाठी ढोकी (२ पदे), कोलेगाव, क.तडवळा येथील पदांचा समावेश आहे. तरी ५ मार्चपर्यंत अर्ज प्रकल्प कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळून सादर करावे, असे तेरचे बाल विकास प्रकल्प अधिकारी एम.एल. डांगे यांनी कळविले आहे.

# सोयाबीन हमी भावाने खरेदी करा

**शेतकऱ्यांचे तहसीलदारामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन...**

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१९ फेब्रुवारी -**

हमी भावाने सोयाबीन खरेदी करा व नाफेड अंतर्गत सोयाबीन खरेदी करण्यासाठीची मुदत वाढ देण्यात यावी, तसेच सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना फरकाची रक्कम तात्काळ देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन सोयाबीन उत्पादक शेतकरी व रयत क्रांती संघटनेच्या वतीने तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले.



महाराष्ट्रासह लातूर जिल्ह्यातील शेतकरी शेतमालाला भाव मिळत नाही म्हणून व शेतीतील उत्पादन खर्च वाढला आहे. त्या प्रमाणात शेतमालाला भाव मिळत नाही. सोयाबीन हमी भावाने खरीदी सरकारने चालू केली त्या खरेदीला शेतकऱ्यांनी लाईन लावून माल घातला. परंतू आपण सरकार म्हणून शेतकऱ्यांच्या सोयाबीनला सहा हजार रूपये भाव देऊ असे आश्वासन दिले होते. ते द्यायचे राहीले परंतु अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी विना आणखीन घरीच आहे. ते खरेदी करा किंवा आपण २०१७-१८ मध्ये तूर व हरभरा खरेदी न करता फरकाची रक्कम दिली त्या प्रमाणे फरकाची रक्कम देण्यात यावी व ४ हजार ८९२ हमी भावाचे व ११०० रूपये बोनस देवून सोयाबीनला ६००० रूपये देऊन आपण दिलेला शब्द पाळावा, असे ही निवेदनात म्हटले आहे. सरकारने लवकरात लवकर निर्णय नाही घेतल्यास रयत क्रांती संघटना शेतकऱ्यांना सोबत घेऊन विविध मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

याप्रसंगी रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ओबीसी नेते शिवाजी पेठे, गुंडेराव चौसष्ठे, राजकुमार खांडेकर, तुकाराम कोकरे, सचीन महाके यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## महात्मा पब्लिक स्कूलच्या स्नेहसंमेलनात बालकलाकारांचा कलाविष्कार



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ फेब्रुवारी -**

येथील महात्मा पब्लिक स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी लोककला, भक्तिगीते, नृत्य आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमात प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वास पडीले होते. तर प्रमुख पाहुणे सत्यवान बोरोळकर, अभिषेक शिंदे, सुधीर भोसले, मनोज पुदाले, दीपक नेत्रगावेपाटील, नंदा स्वामी आदी उपस्थित होते. शाळेच्या गुणवत्तेचा व उपक्रमशीलतेचा परिचय देणाऱ्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी लावणी, लोकगीते, राष्ट्रगीते व नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

विशेष आकर्षण ठरले तीन वर्षीय साक्षी नेत्रगावेपाटील हिचे सादरीकरण झाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक आनंद चिंचोले व शिक्षकवृंद यांनी मेहनत घेतली. संचालिका संगीता नेत्रगावे-पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन मुख्याध्यापकांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्यांनी केले. पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागाने कार्यक्रम रंगतदार ठरला.

## महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसीत राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१९ फेब्रुवारी -**

निलंगा येथील महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दापका येथे युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरेसी या उद्देशाने सात दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. १ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान राबविण्यात आलेल्या या शिबिराचा समारोप संस्थेचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.



समारोप कार्यक्रमाला कामगार कल्याण केंद्राचे केंद्रसंचालक जिरगे, संजय गांधी योजनेचे शेषराव मम्माळे, राधाकृष्ण बेघर बेवारस संघटनेचे अध्यक्ष आकाश साळुंके, अल्पसंख्याक विभागाचे तालुकाध्यक्ष लालासाहेब पटेल, दापका सरपंच आफरीन पटेल, प्रतिष्ठित व्यापारी अंकुश भोपी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून झाली. शिबिरात स्वच्छता अभियान, औषधीय वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे (माणसे व जनावरे), व्यावसायिक संधी, डिजिटल साक्षरता, अंधश्रद्धा निर्मूलन, आहारतज्ज्ञांचे मार्गदर्शन व व्यसनमुक्तीबाबत जनजागृती, असे विविध उपक्रम राबविण्यात आले. विशाखा जांभळे यांनी या उपक्रमांचा अहवाल सादर केला. कार्यक्रमात प्रा. शेषराव मम्माळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांचे कौतुक करत सामाजिक बांधिलकी व ग्रामीण विकासाचे महत्त्व स्पष्ट केले.

जिरगे यांनी विद्यार्थ्यांनी पुस्तकी शिक्षणासोबतच समाजात उतरून राष्ट्रीय एकात्मता जोपासावी, असे मत व्यक्त केले.

### मदरसा आधुनिकीकरण योजना २२ फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव मागविले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ फेब्रुवारी -**

शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाकडून राज्यातील मदरसांच्या आधुनिकीकरणासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत पात्र मदरसांची शासनास अनुदानासाठी शिफारस करण्यासाठी जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

## उदयगिरी महाविद्यालयाच्या खेळाडूंची विद्यापीठ क्रीडा महोत्सव संघात निवड

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ फेब्रुवारी -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी आपल्या कौशल्याने महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा महोत्सव संघात महाविद्यालयाच्या चार खेळाडूंची निवड झाली आहे.

टेबल टेनिस क्रीडाप्रकारात ऋतुजा सूर्यवंशी आणि आदिती कुंडगीर, थलेटिक्समध्ये आरती जाधव, तर खो-खोमध्ये संकेत सुपेकर यांची निवड झाली आहे.



हे सर्व खेळाडू दि.१७ ते २२ फेब्रुवारी या कालावधीत गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे होणाऱ्या २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे आणि प्रा. रोहन एनाडले यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर, डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर तसेच सर्व संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस.जी. पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह आदिंनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.